शनिवार । १३ ऑगस्ट १९७७

७५ पैसे

# माणूस

विनापरवाना गिरणी हलवली.
बेकायदा वीज वापरली.
सरकारी सील तोडले.
जिल्हाधिकाऱ्यांना धाब्यावर बसवले.
तरी
मुख्यमंत्री म्हणतात
प्रकरण ‘ क्षुल्लक ’ आहे.
लोकआयुक्तांचा आरोप
तर्कविसंगत आहे.
हा ‘ दैवदुर्विलास ’ आहे.
! ! !

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक अकरावा

१३ ऑगस्ट १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
◻
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही
◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले
◻
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४३४५९


# भातगिरणी प्रकरणातील निवडणूक दुर्विलास


### माहितगार


लोकआयुक्तांच्या व्यवहाराची चौकशी करावी व त्यांच्यावरच एखादा ठपका ठेवता आल्यास पाहावे असा विचार मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे माडण्यात आला होता असे 'माणूस'च्या ९ जुलै १९७७ च्या अंकात मी म्हटले होते.

लोकआयुक्तानी ह. गो वर्तक व नाशिकराव तिरपुडे यांच्यावर ठपका ठेवला आहे असे वृत्त इग्रजी दैनिकात प्रसिद्ध झाले. त्या सुमारास मंत्रिमंडळामध्ये अहवालासंबंधी चर्चा झाली होती विधानसभेत लोकआयुक्ताचा अहवाल सादर करण्यात आला. त्याचबरोबर तिरपुडे व वर्तक यांचीही स्पष्टीकरणे त्यास जोडली आहेत.

लोकआयुक्ताशी माझा अर्थाअर्थी संबंध नसताना मला या प्रकरणात बळेच खेचले व त्यानी आकसाने हे केले असे म्हणावे लागेल असा ठपका आदिवासी विकासमंत्री तिरपुडे यानी लोकआयुक्तावर ठेवला आहे

लोकआयुक्त एस पी. कोतवाल याच्याविरुद्ध दुसरा आक्षेप घेण्याजोगी परिस्थिती नसल्यामुळे त्याच्याविरुद्ध आकसाचा ठपका ठेवला गेला काय हे समजण्यास वाव नाही.

भातगिरणी महाळगावला आणण्यासाठी १९६५ ते ७२ सात वर्षे वशिल्याचे काढण केले आणि निवडणुकी तोडावर असताना समाजाचा पाठिंबा मिळावा म्हणून परवाना देण्यात आला. चौकशी अहवालाच्या निष्कर्षावर मंत्र्यानी स्पष्टीकरणे दिली ती कोडग्यासारखीच नि सत्त्व आहेत.

ज्या कारणासाठी वर्तक-तिरपुडे याच्यावर लोकआयुक्तानी ठपका ठेवला आहे ते प्रकरण म्हटले तर किरकोळ स्वरूपाचे आहे; परंतु सरकारचा हस्तक्षेप, मंत्र्याची मर्जी अथवा गैरमर्जी काय करू शकते, सत्ताधीश निवडणुकीवर डोळा ठेवून शासनयंत्रणा कशी राबवितात यावर प्रकाश टाकणारी ती एक गभीर घटना मानावी लागेल! वरकरणी बाब अगदी साधी. भाताच्या गिरणीची! भडारा जिल्ह्यातील महाळगाव या ठिकाणी भय्यालाल लीलाहरे यांची भाताची गिरणी १९६४ पासून आहे. त्याच गावात पतिराम नागपुरे या इसमाने आपला अज्ञान मुलगा छत्रपती याच्या नावाने भातगिरणी काढण्यासाठी अर्ज केला होता कायद्यानुसार एकाच गावात दोन गिरण्या काढण्यासाठी परवानगी देण्याजोगी अनुकूलता नव्हती म्हणून अधिकाऱ्यानी नागपुरे याच्या गिरणीस परवाना देण्याचे नाकारले. या गिरणीसाठी नागपुऱ्यानी अनेक अर्ज केले होते व अधिकाऱ्यानी वेळोवेळी परवानगी नाकारली होती. परवानगी नाकारली तरी नागपुऱ्यानी महाळगावी १९६५ मध्येच केव्हा तरी विनापरवाना भातगिरणी सुरू केली असल्याचे फौजदारी कार्यवाहीच्या फायलीवरून आढळून आले. चौकशीमध्ये भातगिरणी विनापरवाना चालविली जात असल्याचे आढळून आले. म्हणून गिरणीला अधिकाऱ्यानी सील ठोकले; परंतु नागपुऱ्यानी ते सीलही तोडले. सील तोडल्याच्या प्रकरणी चौकशी झाली तेव्हा नागपुऱ्यांनी गिरणीसाठी वीजही विनापरवाना घेतली असल्याचे आढळून आले. नागपुरेविरुद्ध भारत सरक्षण कायद्याखाली गुन्हा नोदविला होता; परंतु नंतर तो कोर्टातून काढून घेण्यात आला

### हतबल जिल्हाधिकारी

नागपुरे-प्रकरणात भडाऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्याचेही काही चालत नव्हते गोंदिया तालुक्याच्या उपविभागीय अधिकाऱ्याना

पोलिसांकडून भातगिरणीचे सर्व कागदपत्र पाठवून द्या असे जिल्हाधिकारी वारंवार कळवीत होते; पण उपविभागीय अधिकाऱ्यानी जिल्हाधिकाऱ्याकडे कागदपत्रच पाठविले नाहीत. नागपुरे यांच्या पाठीमागे उच्चपदी असलेली व्यक्ती आहे याची खात्री झाल्यामुळेच पोलीस जिल्हाधिकाऱ्याचे आदेश धुडकावून लावीत होते. मधल्या काळात पतिराम नागपुरे यानी आपला अज्ञान मुलगा छत्रपती याच्या नावाने पायरी येथे महादेव भातगिरणी सुरू केली व ती महाळगावला हलविण्यास परवानगी मागितली. सचिवालयातील अवर सचिवाने २० जुलै १९७१ रोजी ही परवानगी नाकारली होती व २२ जुलै १९७१ रोजी परवानगी नाकारल्याचा आदेश दिला. हा आदेश अवर सचिव एम. आर. पाटील यानी दिला होता. भात पिकविणाऱ्या महत्त्वाच्या प्रदेशातील गिरणीची जागा बदलण्यासंबंधीच्या प्रकरणाची व्यक्तिशः व स्वतंत्रपणे तपासणी करण्यात यावी व ती आदेशासाठी सादर केली जावीत असे आदेश अन्न व पुरवठामंत्र्यानी दिले आहेत असे एम. आर. पाटलानी बरोबर वर्षाने म्हणजे १४ जुलै १९७२ रोजी म्हटले आहे.

ज्या अवर सचिवाने भातगिरणी हलवण्यास १४ जुलै १९७२ रोजी नकार दिला होता त्याच अवर सचिवाने ३१ जुलै १९७२ रोजी पधरा दिवसानी आपले पहिले मत बदलले आणि पायरीची भातगिरणी महाळगावला हलविण्याची परवानगी नागपुरेंना दिली. पंधरा दिवसात अवर सचिवाने मत बदलावे यासाठी कोणते कारण झाले? गिरणी हलविण्यास परवानगी मिळावी म्हणून केलेल्या अर्जावर देशमुख नावाच्या उपसचिवाने टिपणी केली आहे या टिपणीत असे म्हटले आहे, की परवाना द्यावा अशी मत्रिमहाशयाची इच्छा आहे. देशमुखाच्या टिपणीखाली ह. गो. वर्तक यानी समतिदर्शक सही केली आहे. त्यामुळेच उपसचिव व अवर सचिव यानी पंधरा दिवसामध्ये आपले मत बदलले. नागपुरे यानी महाळगावला भातगिरणी काढण्यासाठी पहिला अर्ज १८ ऑक्टोबर १९६५ रोजी केला होता. अनेक वेळा नकार मिळालेले प्रकरण, तीन प्रकारचे गुन्हे असलेली बाब, कोर्टातून खटला काढून घेतला जातो, हे कमी वाटूनच की काय, नागपुरेंच्या अर्जाच्या फाइलवर १९६५ ते ७२ सात वर्षे वेळोवेळी विचार केला जात होता. जबरदस्त व्यक्ती असल्याशिवाय एखादे प्रकरण सात वर्षे 'जिवत' कसे राहू शकते? सामान्य माणसाला हा अनुभव कधी आला आहे काय? मत्र्याचा पाठपुरावा असल्यामुळेच अशा गोष्टी होऊ शकतात हे उघड आहे.

## निवडणुकीचे हिशोब

सप्टेंबर १९७१ मध्ये नाशिकराव तिरपुडे मंत्री झाले. भडारा येथे पतिराम नागपुरे यानी तिरपुडे याच्याकडे भातगिरणी महाळगावला नेण्यासंबधीचा अर्ज दिला. आपण भडारा येथे महसूलमंत्र्याशी (वर्तक) काल चर्चा केली. त्यानी हे प्रकरण पाहावे असे तिरपुडे यानी नागपुरेंच्या अर्जावर म्हटले आहे त्यावर सही १० सप्टेंबर १९७१ ची आहे. त्याच अर्जावर मत्री तिरपुडे याच्या चिटणिसाची टिपणी आहे. या विनतीचा फेरविचार व्हावा अशी वनमत्र्याची इच्छा आहे अशी तिरपुडे याच्या चिटणिसाची अर्जावर टिपणी होती व हा अर्ज वर्तक याच्याकडे पाठविला गेला.

पतिराम नागपुरे याच्या गिरणीसाठी एवढे दळण का दळले जात होते? मार्च १९७२ मध्ये विधानसभेच्या निवडणुका आल्या होत्या. भडारा जिल्ह्यात लोधी समाज बराच आहे याच लोधी समाजातील पतिराम नागपुरे आहेत. ते श्रीमत सावकार व पोलिसपाटीलही आहेत. आपल्या समाजावर त्यांचे चागलेच वजन आहे. या समाजाचा निवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा मिळवावयाचा असेल तर त्या समाजातील प्रेंडाना खूप ठेवण्यासाठी त्याची कामे करण्याची आवश्यकता असते. या आवश्यकतेपोटीच नागपुरे याच्या अर्जाला वारवार नकार दिलेला असताही— इतकेच नव्हे तर त्यानी विनापरवाना गिरणी चालविणे, विना परवाना वीज वापरणे अशी बेकायदा कृत्ये केली असतानाही, त्याच्या म्हणण्याप्रमाणे गिरणी हलवण्यास परवानगी दिली जाते!

## बालिश बचाव

लोकआयुक्त एस. पी कोतवाल यानी वर्तक–तिरपुडे यांच्यावर ठपका ठेवला आहे. ज्या कारणासाठी कोतवालानी ठपका ठेवला त्या कारणावर तिरपुडे यानी स्पष्टीकरण देण्याचे टाळले आहे. उलट कोतवालानी आकसाने आपल्याविरुद्ध ठपका ठेवला असल्याचे म्हटले आहे वर्तक म्हणतात, माझे चारित्र्यहनन करण्याची सधी लोकआयुक्तानी साधली आहे तिरपुडे यांच्यावर लोकआयुक्ताचा आकस का? त्यासाठी तिरपुडे यानी १९५४ पूर्वीच्या घटनेचा दाखला दिला आहे. त्या वेळी नागपूरला वीजपुरवठा करणाऱ्या कपनीच्या कामगारांची सघटना तिरपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत होती आणि कपनीच्या मालकाची वकिली कोतवाल करीत होते. कोर्टात कामगारसघटनेचे पदाधिकारी व वकील कोतवाल याच्यात खटके उडत, कपनीचे मालक कासद व कामगार याचे कधीच पटले नाही असा युक्तिवाद तिरपुडे यानी कोतवालाचा आकस दाखवण्यासाठी केला आहे त्याचा युक्तिवाद अगदीच भुसभुशीत म्हणावा लागेल. कोर्टात सघटनेचे पदाधिकारी व वकील एस्. पी. कोतवाल याचा खटका उडाला. प्रत्यक्ष तिरपुडे व कोतवाल याचा कोर्टात खटका उडाला असता तरी ते समजू शकले असते. तोही उडालेला नाही. तिरपुडे याच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या कामगारसघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी खटके भूतकाळात उडाले तर ते तिरपुडे यांच्या विरुद्धचे आकसाचे कारण कसे होऊ शकते? जगामध्ये मालक–कामगार याचे कधीच पटलेले नाही. मालक-कामगार याचे पटलेले नाही म्हणून मालकाचे १९५४ पूर्वी वकीलपत्र घेणारे कोतवाल तिरपुडे याच्याविरुद्ध आकस धरून २३ वर्षांनी निर्णय देतात असे म्हणणे म्हणजे फारच झाले. तिरपुडे याना एवढा जुना इतिहास आकसासाठी आठवतो. त्यावरून तिरपुडे मनात आकस धरून वावरत असावेत असे वाटले तर ते चुकीचे ठरेल काय? कोतवालांचा आपल्याविरुद्ध आकस आहे हे दाखविण्यासाठी तिरपुडे यांनी पुढे केलेले कारण अगदीच बालिश आहे. दुसरा बचाव देण्याजोगा युक्तिवाद नाही म्हणून त्यानी हे कारण दिले असावे!

तिरपुडे याचे आणखी एक म्हणणे आहे.

आपल्याला बाजू मांडू दिली नाही असे ते म्हणतात. लोकआयुक्तांपुढे आलेली कागदपत्रे अधिक बोलकी तर आहेतच; पण कायद्यातील तरतुदीनुसार खाजगी व्यक्तींची साक्ष काढणे, वा त्यांच्याकडून पुरावे गोळा करणे कायद्याला धरून नाही. असे पुरावे लोकआयुक्त घेऊ लागले तर दुसरे हायकोर्ट होईल. मुख्य मंत्री वसंतराव पाटील यानाच लोकआयुक्त हे दुसरे हायकोर्ट व्हायला नको आहे ना ?

नागपुरे यांच्यामागे तिरपुडे होते म्हणूनच त्यांच्याविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यानाही कारवाई करणे जड जात होते. पोलिसअधिकारी हतबल झाले होते हे लोकआयुक्तानी अहवालात दाखवून दिले आहे. तिरपुडे म्हणतात त्याप्रमाणे लोकआयुक्त आकस ठेवून काम करीत असतील तर ती बाब अतिशय गभीर म्हटली पाहिजे. असा माणूस हायकोर्टाचा मुख्य न्यायाधीश बनत गेला, निवृत्तीनतर लोकआयुक्त झाला याची जबाबदारी कोणावर येते ? तिरपुडे व वर्तक, विशेषत. तिरपुडे यांनी यापूर्वी कोतवालाच्या आकसाच्या मनोवृत्तीबाबत वाचा का फोडली नव्हती ? वाचा फोडण्याची गोष्ट सोडा, पण एकदा तरी साधी नापसंती व्यक्त करावयाची होती? को·स्वत:ला अडचणीत आणणारा अहवाल दिल्यामुळे २३ वर्षांच्या मागची घटना तिरपुडे याना आठवली ? जनतेची मते मिळविण्यासाठी गटाच्या, समाजाच्या नेत्यावर कसा प्रभाव टाकला जातो व निवडणुकीला अनुकूल वातावरण कसे निर्माण केले जाते याचे हे लहानसे उदाहरण उजेडात आले. असे मोठे मासे वरच येत नसतील ! वरकरणी किरकोळ दिसणारे प्रकरण बाहेर आले त्याची गभीरता अहवालाच्या खोलात शिरल्याशिवाय जाणवणार नाही □

## लोकआयुक्तांचा आरोप तर्कविसंगत

मुंबई भंडारा जिल्ह्यामधील हलर भातगिरणी एका गावाहून दुसऱ्या गावी हलविण्याच्या प्रकरणी लोकआयुक्तानी केलेली शिफारस फेटाळून लावण्याच्या आपल्या निर्णयाचे मुख्य मंत्री श्री. वसंतरावदादा पाटील यानी शुक्रवारी विधानसभेत जोरदार समर्थन केले.

राज्यपालाकडे पाठविलेल्या आपल्या विशेष अहवालात लोकआयुक्तानी तेव्हाचे अन्न व पुरवठामत्री श्री. ह. गो. वर्तक आणि गृहनिर्माण मंत्री श्री नाशिकराव तिरपुडे याच्यावर या प्रकरणी ठपका ठेवला होता.

लोकआयुक्तांनी आपल्या अहवालात असा आरोप केला होता की, १९७२ च्या निवडणुकीत, त्या चार गिरण्याचा मालक पतीराम किसन नागपुरे याची कॉंग्रेसपक्षास मदत व्हावी म्हणून श्री तिरपुडे याच्या सागण्यावरून श्री. वर्तक यानी तो निर्णय घेतला होता त्याचप्रमाणे विधानसभेचे सदस्य श्री. रामचद्र तुळशीरामजी हरिणखेडे व विधानपरिषदेचे सभासद श्री. छेडीलाल गुप्त यानी श्री. नागपुरे याची विनंती मान्य करण्याची शिफारस केल्याबद्दल त्याच्यावरही या अहवालात ताशेरे झाडले होते.

### दैवदुर्विलास

मुख्य मत्री म्हणाले की, लोकआयुक्तासारखे उच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीने अशा क्षुल्लक प्रकरणाचा इतक्या हिरीरीने पाठपुरावा करावा व त्या सदर्भात तर्कविसगत आरोप करावा हा दैवदुर्विलास आहे.

या प्रकरणी तक्रार करणाऱ्या भय्यालाल धोंडू निहारे याच्याच शब्दावर लोकआयुक्तानी विश्वास ठेवला. श्री. वर्तक, श्री. तिरपुडे व दोघे आमदार याचे म्हणणेही ऐकून न घेता निर्णय दिला. हे न्यायपद्धतीशी विसगत होते, असे ते म्हणाले.

माजी मुख्य मत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी लोकआयुक्ताची याविषयीची शिफारस फेटाळून लावली होती. त्या वेळी एकदा दिलेली परवानगी कायद्यानेच रद्द करता येणार नाही असे त्यानी लोकआयुक्ताना कळविले होते. असे सागून ते म्हणाले, 'सप्टेंबर महिन्यात त्या प्रयत्नाची मुदत सपल्यावर तिचे नूतनीकरण करू नये अशी आग्रहाची शिफारस लोकआयुक्तानी केली होती. ती मान्य करावी म्हणून लोकआयुक्त आपणास भेटले व त्यासाठी अर्धा तास युक्तिवाद केला. त्या वेळी झालेल्या चर्चेत याविषयी त्याच्या मनात काही तरी राग आहे व त्या रागाच्या पोटी त्यानी आपली शिफारस केली आहे असे दिसून आले.'

श्री. पाटील म्हणाले की, त्या परवान्याचे नूतनीकरण न करण्याची शिफारस मान्य केली असती तर श्री वर्तक व श्री. तिरपुडे हे दोघे व दोन लोकप्रतिनिधि यानी त्या प्रकरणी सगनमत करून अप्रामाणिकपणाचे वर्तन केले हा आरोप मान्य केल्यासारखे झाले असते आणि त्याना सार्वजनिक जीवनामधून उठविण्यात त्याची परिणती झाली असती.

लोकआयक्ताचा अहवाल राज्यपालाना व विधानसभेला सादर करण्यापूर्वीच पत्रकारपरिषदेत त्याची वाच्यता केल्याबद्दल त्यापूर्वी चर्चेत मुख्य मत्र्यांवर टीका करण्यात आली होती. तिचा उल्लेख करून श्री. पाटील म्हणाले की, या प्रकरणी लाचलुचपतीचे फार मोठे घबाड हाती लागले असून त्यावरून मत्रिमंडळ उलथून पडेल अशा वार्ता प्रसिद्ध झाल्या होत्या; तसे वातावरण निर्माण झाले होते. शासनाची व पर्यायाने कॉंग्रेसपक्षाची बदनामी होत होती म्हणूनच पत्रकारपरिषदेत आपणास त्यासबधी बोलावे लागले.

या बाबतीत लोकआयुक्त व उपलोकआयुक्त याच्यासबधीच्या कायद्यात दुरुस्ती करून काही समन्वय साधणे आवश्यक आहे, असे सागून ते म्हणाले, 'केंद्र शासनाने ससदेत लोकपालाच्या नेमणुकीसंबधी विधेयक माडले आहे ते आता संसदेच्या चिकित्सासमितीकडे आहे.'

### चर्चेत भाग

या चर्चेत कॉंग्रेसचे श्री. शरद दिघे, श्री. विलास लोणारी, श्री. बाबुराव कोतवाल, श्री. एस्. एन्. देसाई, हरिणखेडे, श्री एस्. शाम यानी भाग घेतला विरोधी पक्षनेते श्री. गणपतराव देशमुख, वासुदेवराव देशमुख, श्री. एच्. एन्. त्रिवेदी, श्री. पी. बी. कडू, श्री. प्रमोद नवलकर, श्री. वि गो. प्रभुगावकर श्री. बी. जी. खताळ आदि विरोधी पक्षीयानी भाग घेतला. □

—दैनिक केसरी (दि. ६ ऑगस्ट)

# अवती–भवती

शरद कृष्णन्

## □ राजनारायण...जनतासरकारचे विक्षिप्तराव

आरोग्य आणि कुटुबकल्याणमंत्री नामदार राजनारायण यानी जनतासरकारचे विक्षिप्तराव असा लौकिक अपेक्षेप्रमाणे सपादन केला आहे. हे महाराज केव्हा काय उत्तर देतील याचा काहीही भरवसा देता येत नाही. त्याची विचित्र राहणी, चमत्कारिक पोशाख आणि अजब बोलणे या सगळ्या भोवती एक चमत्काराचे वलय निर्माण झाले असून राजनारायणजी मत्री झाल्यापासून या वलयाला विशेष तेज आले आहे. राजनारायणजी मत्री झाले तरी त्याच्यामध्ये काडीचा फरक पडणार नाही असे त्याच्या अनेक निकटवर्तीयाना वाटत असले, तरी जनतेला ते जास्त जबाबदारीने वागतील अशी जी अपेक्षा होती ती मात्र पूर्ण होऊ शकली नाही म्हणूनच 'सन्डे'च्या साप्ताहिक आवृत्तीवर राजनारायण ... जनतापक्षाचे दरबारी विदूषक ! असा मजकूर प्रसिद्ध झाला तरी कोणाला काही वावगे वाटले नाही.

राजनारायणजी हिंदीचे कडवे पुरस्कर्ते आहेत त्यामुळे लोकसभेमध्ये जरी इग्रजीतून प्रश्न विचारण्यात आला तरी राजनारायणजी उत्तर मात्र हिंदीतून देतात; पण अगदी कालपरवा त्यानी आणखीनच गम्मत केली. भूपेश गुप्ता याच्या एका प्रश्नाला त्यानी तामिळमधून उत्तर देण्यास प्रारभ केला आणि सभागृहामध्ये एकच गोधळ उडाला. नेहमी त्याच्यावर नाराज असलेल्या दक्षिणेकडील मडळीनीही त्याना टाळी दिली. प्रश्नाला उत्तर दिले जाईपर्यंत हा गृहस्थ तामिळ भाषेमध्ये उत्तर देईल, असे कोणालाही वाटले नव्हते, पण अनपेक्षितपणे काहीही करणे हेच तर त्याचे वैशिष्ट्य आहे एका जमान्यामध्ये कुस्ती खेळलेल्या राजनारायणजीना कुस्तीचा शौक कायम ठेवता येत नसला, तरी त्यानी स्वतःच्या देहाला मसाज करण्याची सवय लावून घेतली. दररोज सकाळी हा कार्यक्रम अगदी सार्वजनिकरीत्या चालतो पाचपचवीस मडळीच्या उपस्थितीमध्ये एकीकडे मसाज चालू असतो आणि एकीकडे राजनारायण जमलेल्या मडळीची करमणूक करीत असतात – नाना स्वरूपाचे प्रश्न विचारले जातात आणि विचारलेल्या प्रश्नाना क्रिकेटपासून ते रामायणामधील हनुमानपराक्रमापर्यंत सर्वांचे दाखले देत उत्तरे दिली जातात. राजनारायणजीच्या या खाजगी बैठकी किंवा त्याच्या देहाला मालिश करून घेण्याचा शौक याबद्दल कुणाला फारशी तक्रार करता येणार नाही, पण सरकारतर्फे बोलताना त्यानी जास्त जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. त्यातून ते केंद्रसरकारामधील कॅबिनेट–दर्जाचे मत्री असल्याने त्याच्या प्रत्येक विधानाचे सादपडसाद सर्वत्र उमटत असतात. विशेषतः हिंदीबाबतची त्याची आग्रही भूमिका अनेकाना त्रासदायक वाटते. अगदी जनतापक्षाच्या काही नेत्यानाही राजनारायण याची हिंदीबाबतची आग्रही भूमिका दक्षिणेमध्ये त्रासदायक ठरेल असे वाटते. हिंदीबाबतची कर्पुरी ठाकूर याची मते आणि राजनारायण याची मते यामध्ये तसा फारसा फरक नाही, परंतु राजनारायण ज्या पद्धतीने आपल्या मताना प्रसिद्धी मिळवितात त्यामुळे त्याची मते सर्वत्र पोचून त्याबद्दलच्या तिखट प्रतिक्रिया सर्वत्र व्यक्त होतात. त्या प्रतिक्रियाबाबत स्वतः राजनारायण काहीसे उदासीन असतात. भाषा कोणावर लादता येत नाही असे आपले स्पष्ट मत असल्याचे सांगून राजनारायण म्हणतात,– माझ्या या विचाराना मिळावी तशी प्रसिद्धी मिळत नाही आणि लोकसभेमध्ये मी हिंदीतूनच उत्तर देण्याचा आग्रह धरतो याची भरपूर प्रसिद्धी केली जाते आपल्याला बदनाम करण्यासाठी काही मडळी सतत खटपट करीत असतात असाही त्याचा दावा आहे मात्र अशा प्रयत्नाना आपण फारसा धूप घालीत नाही असा लगोलग खुलासाही ते करतात राजनारायण यानी आविष्काराची एक विशिष्ट पद्धती का अवलबिली असावी, याची पाहणी केली तर असा निष्कर्ष निघतो की कधी काळी आपल्याला सत्तेची उबदार खुर्ची मिळू शकेल, असे त्याना कधी वाटलेच नसावे. सतत विरोधी बाजूने बोलावे लागल्याने ते उग्र–आक्रमक–नाटकी पद्धतीचा वापर करतात. आता दिवस फिरले आहेत. ते सत्तास्थानी येऊन बसले आहेत, परतु भाषणाची त्याची पद्धत मात्र जुनीच आहे. जवाहरलालजीच्या जमान्यामध्ये विरोधकाना आपले भाषण ऐकू जावे असे जर वाटत असेल तर टीपेत बोलावे लागत असे. तसेच भाषणाबरोबर विदूषकी चाळे करून लक्ष वेधून घ्यावे लागत असे तेव्हा कुठे चार–दोन ओळीची प्रसिद्धी मिळत असे. आता या जन्माच्या सवयी खुर्ची बदलली म्हणून जाणार का आहेत ? राजनारायण याची जॉर्जबरोबर तुलना करणारे जॉर्जवर अन्याय करतात. राजनारायण आणि जॉर्ज याच्यामध्ये मूलतःच भरपूर फरक आहे जॉर्जने प्रारभी जरी खळबळ केली तरी मत्रिपद स्वीकारल्यावर तो गभीरपणे कामास लागला. राजनारायणजीनी आपण जोरात कामाला लागल्याचा आव आणला; परतु तो टिकू शकला नाही कुटुनियोजनाबाबत ज्या मडळीवर सक्ती झाली आणि अशा सक्तीच्या शस्त्रक्रियेमुळे ज्याना मृत्यू आला त्याच्या कुटुबियाना पाच हजार रुपये द्रव्यसहाय्य देण्याची योजना त्यानी घोषित केली. त्या योजनेचे स्वागतही झाले; परतु अशा योजना खात्याच्या मागण्याच्या वेळीच निश्चित कराव्या लागतात व त्याला अर्थखात्याची पूर्वमजुरी घ्यावी लागते या दोन्ही गोष्टीचे भान पाळले गेले नाही. पुढे अर्थमत्रालयाने या योजनेला मजुरी देऊन आवश्यक ते द्रव्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली. याउलट जॉर्जने आपल्यावरील जबाबदारी

पृष्ठ ३० वर

# लोकशाही

## नव्या समस्या, नवी आव्हाने

वा. दा. रानडे

आणीबाणीचा काळा कालखंड संपल्यानंतर मुक्त, निर्भय वातावरणात यंदाचा स्वातंत्र्यदिन साजरा होत आहे. स्वातंत्र्याला तीस वर्षे पुरी झाली; पण गेल्या २९ वर्षांत झाल्या नाहीत एवढ्या महत्त्वाच्या घटना गेल्या एक वर्षात झाल्या. आणीबाणीमधून देशात हुकुमशाही चिरस्थायी होण्याचा धोका टळला. सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रित करू पाहणाऱ्या श्रीमती गांधींच्या नेतृत्वाचा अस्त झाला. जनतेने त्यांचे नेतृत्व झुगारले एवढेच नव्हे तर त्यांच्या पक्षालाही झुगारले. केंद्रातील काँग्रेसच्या सत्तेची गेल्या तीस वर्षांची मक्तेदारी गेली. काँग्रेसचा पराभव हा आणीबाणीचा निषेध तर होताच; पण त्याचबरोबर जनतापक्षाच्या रूपाने एकत्रित आलेल्या विरोधी पक्षांच्या संघटित शक्तीचा तो विजय होता. या पक्षाच्या स्थापनेमागे जयप्रकाशांचे प्रयत्न व प्रेरणा होती चार पक्ष एकत्र आले तेव्हा काँग्रेसला प्रभावी पर्यायी पक्ष स्थापन करावा एवढीच त्यांची माफक आकांक्षा होती; पण जनता आणीबाणीतील हुकुमशाहीला, अत्याचाराना आणि अतिरेकाना इतकी विटली होती की तिने जनतापक्षाला केवळ पर्यायी पक्षाची भूमिका बजावू न देता सत्ताधारी पक्ष बनविले आणि विरोधी पक्षाची भूमिका काँग्रेसकडे आली.

या स्वातंत्र्यदिनी करावयाचा पहिला निर्धार म्हणजे देशात पुन. एका व्यक्तीच्या हाती सत्ता केंद्रित होऊ द्यावयाची नाही. लोकशाही टिकवायची तर सर्व पातळीवर लोकशाही हक्क जपण्याबद्दल जागरूकता हवी. ही जागरूकता नव्हती म्हणून तर इंदिरा गांधी देशावर आणीबाणी लादू शकल्या. मंत्रिमंडळाच्या संमतीशिवायच हा निर्णय २५ जून १९७५ ला रात्री घेतला गेला होता आणि देशभर विरोधी नेत्यांची धरपकडही सुरू झाली होती. २६ जूनला सकाळी मंत्रिमंडळाची बैठक बोलाविण्यात आली आणि त्यांना आणीबाणी पुकारल्याचे फक्त कळविण्यात आले. या निर्णयाला मंत्रिमंडळाने संमती दिली कशी? विरोध करण्याचे व निषेधार्थ राजिनामा देण्याचे धैर्य एकाही मंत्र्यास कसे झाले नाही? आणीबाणीचा निर्णय हा मंत्रिमंडळाचा निर्णय आहे अशी खात्री करून घेतल्याशिवाय राष्ट्रपतींनी त्यावर सही केली कशी? काँग्रेसपक्षाच्या कार्यकारिणीने काय केले? सरकारी निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यापलीकडे काँग्रेस कार्यकारिणी आणि अखिल भारतीय काँग्रेसकमिटी याना स्थानच राहिले नव्हते. त्या वेळचे काँग्रेसमध्यक्ष देवकांत बारुआ तर इंदिरा गांधींचे एवढे भाट बनले होते की 'इंदिरा इज इंडिया' (इंदिरा म्हणजेच भारत) असे समीकरण मांडण्यापर्यंत त्यांची मजल गेली. पक्षात आणि सरकारमध्ये लोकशाही कार्यपद्धती पायदळी तुडविली जाऊन एका व्यक्तीच्या शब्दानुसार देशाचा कारभार चालू लागला! ही परिस्थिती चिरस्थायी न होता आपण त्यातून बाहेर पडून पुनः लोकशाहीच्या मार्गाने वाटचाल करू लागलो ते मतदारानी दाखविलेल्या जागरूकतेमुळे!

इंदिरा गांधींनी निवडणुका जाहीर केल्यानेच हे शक्य झाले. त्यांनी निवडणुका घेतल्या नसत्या तर अजून दीर्घ काळ त्यांची सत्ता राहिली असती असा युक्तिवाद केला जातो तो कितपत खरा आहे? निवडणुका घेतल्या नसत्या तर देशात असंतोषाचा भडका उडून क्रांती झाली असती असेही म्हटले जाते. आणीबाणीविरुद्ध सुरुवातीच्या काळात निदर्शने, सत्याग्रह झाले; पण पुढे हे आंदोलन थंडावले. वास्तविक १९४२ पेक्षा अधिक दडपशाही होऊनही १९४२ च्या आंदोलनाची तीव्रता या आंदोलनाला आली नव्हती हे मान्य करायला हवे. मधु लिमये यांच्यासारख्या नेत्यांनी त्याबद्दल खंतही व्यक्त केलेली आहे; पण भारतीय जनता सहनशील असली तरी सहनशीलतेलाही सीमा असते. ही सीमा सपत आली होती. वरून शांतता दिसत असली तरी आतून असंतोष खदखदतो आहे. त्याचा केव्हाही स्फोट होण्याचा आणि त्यात आपण सत्ताभ्रष्ट होण्याचा धोका इंदिरा गांधींनी ओळखला होता म्हणूनच त्यांनी निवडणुका जाहीर केल्या. निवडणुका तुम्ही प्रचंड बहुमताने जिंकाल असे अंदाज अधिकाऱ्यानी त्याना कळविले होते; पण केवळ तेवढ्यावर विसंबून त्यानी निवडणुकांचा निर्णय घेतला असे म्हणता येणार नाही. निवडणुका जाहीर केल्याने आपण लोकशाहीवादी असल्याची प्रतिमा जनमनात पुनः उभी करता येईल व आपण पुनः प्रचंड बहुमताने निवडून येऊ असा इंदिरा गांधींचाही आडाखा होता; पण तो चुकला. याचे कारण जनतेशी त्यांचा संपर्क राहिला नव्हता वृत्तपत्रांवर निर्बंध घातल्याने फक्त सरकारी प्रचाराच्या बातम्याच त्यात प्रसिद्ध होत होत्या. सरकारी अधिकारी आणि पक्षातील स्तुतिपाठक त्यांच्याकडे जे अहवाल पाठवीत त्यात इंदिरास्तोत्रच गाइलेले असे त्यामुळे खरे जनमत त्यांच्यापर्यंत पोचलेच नव्हते. अचूक निर्णय घ्यावयाचे तर अचूक माहिती मिळवायला हवी. हुकुमशाहीतील निर्बंधामुळे अशी माहिती उपलब्ध होत नाही फक्त एकतर्फी माहितीच प्रसिद्ध होते. त्यामुळे निर्णय चुकतात. हुकुमशहा स्वतःच उभारलेल्या जाळ्यात फसतात ते असे. इंदिरा गांधींच्या बाबतीत तेच घडले.

स्वातंत्र्याच्या ३१ व्या वर्षात आपल्यापुढे मुख्य आव्हान आहे ते लोकशाही टिकविण्याचे. निश्चित कार्यक्रमावर उभारलेल्या राजकीय पक्षाची त्यासाठी आवश्यकता आहे तशीच पक्षनिरपेक्ष कार्यकर्त्यांचीही आहे. पाच पक्षाच्या एकीकरणातून अजून एकजीव जनतापक्ष उभा राहिलेला नाही. घटकपक्षानी औपचारिकरीत्या स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाचे विसर्जन केले असले तरी खऱ्या अर्थाने विसर्जन झालेले नाही. मंत्रिमंडळ, पक्षाची कार्यकारिणी आणि पदाधिकारी निवडताना अजून घटकवारच विचार केला जातो. सभासदनोंदणी होऊन नव्या समित्या निवडल्या गेल्यावर तरी हे अंतर्गत ताण व संघर्ष संपायला हवेत. तसे झाले तरच प्रभावी शिस्तबद्ध पक्षाची उभारणी होईल.

काँग्रेसपक्षाची पुनर्बांधणी चालू आहे. इंदिरा गांधी पुन पक्षाची सूत्रे आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यातून पक्षांतर्गत संघर्ष वाढत आहे. काँग्रेस यातून सावरणार की दुभंगणार हे काही महिन्यातच स्पष्ट होईल. काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या सर्व गटानी एकत्र येऊन पुनः जुनी काँग्रेस स्थापावी या दिशेनेही हालचाली चालू आहेत. जनतापक्षातील संघर्ष वाढत गेले तर संघटनाकाँग्रेस व जगजीवनरामबाबूंच्या गटाला पुन आपल्यात आणता येईल असे काही काँग्रेसनेत्यांना वाटते. काँग्रेसपक्ष सुधारण्यासाठी नव्हे तर पुनः सत्तेवर येण्यासाठीच ही सारी धडपड आहे. त्यातून विशेष काही निष्पन्न होईल असे वाटत नाही, पण आपल्या अंतर्गत संघर्षाचा फायदा काँग्रेसला मिळू द्यायचा नाही हे ओळखून जनतापक्षाने आपली एकजूट टिकवायला हवी. □

## चक्रम्‌चक्री ( २१ )

# आपण स्वातंत्र्याला लायक आहो का ?

दीर्घस्मृति विश्वनाथ

शेतकऱ्याच्या वर्षात जशी एक तरी सुगी असते तशी प्रत्येक धंद्यात दरवर्षी सुगी असते. साप्ताहिकाना कमीत कमी तीन सुग्या असतात. पंधरा ऑगस्ट, सव्वीस जानेवारी आणि दिवाळी. या वेळेला त्याना नेहमीचेच अंक विशेषांक म्हणून जादा किंमतीत विकता येतात.

वा:, विशेषांक म्हटला म्हणजे खास लेख मिळवावे लागतात. ते प्रसंगाला उचित असावे लागतात. दोन दोन महिने अशा विशेषांकाची तयारी चालते, असं ऐकतो.

तयारी चालते म्हणजे ज्या नामांकिताना लेख लिहिण्यास सांगितलेले असते ते लोक किंवा ते ज्यांना आपल्या नावावर लेख लिहिण्यास सांगतात असे लोक, लेख लिहायला दोन महिने घेतात, इतकेच. बाकी लेखाचा विषय आणि त्यातले विचार यांची भट्टी कर्जतस्टेशनवरच्या बटाटेवड्यासारखी ठरून गेलेली असते. 'सत्तारूढ पक्षाची (म्हणजे, इतके दिवस काँग्रेसची ) वाटचाल' 'विरोधी पक्षाचे स्थान', 'स्वातंत्र्याला पंचवीस ( किंवा सव्वीस अगर सत्तावीस) वर्षे झाली, पुढे काय ?', 'औद्योगिक धोरण' वगैरे विषय आणि त्यावरचे लेख इतकी वर्षे वाचत आलो आहे की, ते उलटेसुद्धा म्हणून दाखविता येतील.

पण मग नवीन विषय काढणार तरी काय ? आपले भावगीतकार जसे कोळी–कोळीण–होडी–समुद्र ही चौकडी अनुक्रमे पालटून लिहून नवे भावगीत लिहिल्याचे समाधान मिळवतात तसेच हे स्तंभलेखक महागाई बेकारी-गरीब-श्रीमंतातील रुंदावणारी दरी– औद्योगीकरण असे ठरीव शब्द घोळवून लेख तयार करतात.

म्हणून मी एक ज्याला नवा म्हणता येईल असा विषय घेतलाय्– 'आपण स्वातंत्र्याला लायक आहो काय ?'

म्हणजे पुन्हा आणीबाणीचे कडू कारले निवडणुकीच्या निकालाच्या साखरेत घोळवून देणार म्हणायचे.

नाही नाही, आणीबाणी आणि त्या काळातील साऱ्या जनतेचे वर्तन एवढा व्यापक संदर्भ मला नाही घ्यायचा.

मग वर्तमानपत्राविषयी लिहिणार असाल?

आपल्या वर्तमानपत्राची स्वातंत्र्याच्या बाबतीतली लायकी नुकतीच सिद्ध झालीय् किर्लोस्कराच्या वारुणी–महोत्सवाची हकीकत छापायची हिम्मत नाही झाली या चिलटाची !

मग तुम्ही लिहिणार तरी कोणत्या संदर्भात ?

### महाविद्यालयीन शिक्षक

मी पुण्यातल्या कॉलेजशिक्षकाच्या आणीबाणीतील वर्तनाचा विचार करणार आहे.

का बरे कॉलेज-प्रोफेसर्सवर ही तुमची मर्जी ?

कारण अगदी साधे आहे. हे लोक आणीबाणीत कसे वागले याची बरीच माहिती मला आहे. बहुतेक विद्वान म्हणवणारे लेखक तरी काय करतात ? त्यांना जी काही एखाद-दुसऱ्या विषयाची माहिती असते, तीच निरनिराळ्या नावांखाली सजवून मांडतात.

खरे आहे. आपले विद्वद्वर्य विनायक महादेवच पहा. संघटितांनी असंघटिताची चालवलेली पिळवणूक हा एक विषय त्यांनी चांगला अभ्यासला. नंतर तीच गोष्ट ते 'वाढती महागाई', 'विद्यार्थी संघटना', 'आणीबाणी', 'भारताची संरक्षणक्षमता' या सर्व नावांखाली सांगत असतात. हा, पण हे तुमचे खरे कारण सांगून मात्र चालणार नाही.

'आपण स्वातंत्र्याला लायक आहोत काय ?' या प्रश्नाच्या संदर्भात तपासण्याला कॉलेजमधील शिक्षकवर्गच कसा समर्पक आहे हे दाखवायला अनेक कारणे देता येतील. पहिले असे की कॉलेज-शिक्षक हे मध्यमवर्गीय आणि शिक्षणाची परंपरा असलेले, असे असतात. इंग्रजांविरुद्धच्या स्वातंत्र्य-लढ्यात मध्यमवर्गीय लोकच आघाडीला होते. खेरीज पुण्यातील शिक्षणसंस्था या राष्ट्रीय प्रबोधनाची पीठे म्हणून काढल्या गेल्या. आणखी असे की, कॉलेज-शिक्षक हे पराकोटीचे पंडित नसले तरी भोवतालच्या परिस्थितीची अधिक जाण असलेले असावेत अशी अपेक्षा असते. तेव्हा या तिन्ही दृष्टीनी– म्हणजे वर्गाची परंपरा, संस्थांची परंपरा आणि समाजाच्या अपेक्षा– पाहिले तरी कॉलेज-शिक्षक हा आणीबाणीच्या काळात कसा वागला हे पाहणे महत्त्वाचे ठरते. काय, झाली की नाही भारदस्त सुरुवात ?

आणखी काय ?

दुसरे असे की, सरकार तोंडदेखले का होईना पण असे म्हणत आले आहे की, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाचे क्षेत्र स्वतंत्र आहे. आम्ही त्यात ढवळाढवळ करीत नाही. प्रत्यक्षात असेही दिसत होते की, या क्षेत्रातील घडामोडीवर वर्तमानपत्रात लिहिण्यातही बंदी नव्हती. तेव्हा सरकारी अमलापासून बऱ्याच प्रमाणात स्वतंत्र असलेल्या या शिक्षणक्षेत्रातील मंडळीनी त्या स्वातंत्र्याचा कसा वापर केला हेही पाहायला पाहिजे. या लोकानी आपले स्वातंत्र्य गबाळेपणाने संकुचित तर करून घेतले नाही ना ?

तिसरे असे की, आणीबाणी जाहीर होण्यापूर्वी या लोकानी इतिहासात प्रथमच लढाऊ वृत्ती दाखवून परीक्षावर बहिष्कार टाकला होता. त्याची फलनिष्पत्ती आणीबाणीच्या घोषणेनंतर व्हायला हवी होती. याच काळात नव्या शिक्षणक्रमाने महाविद्यालयात पाऊल टाकले. त्याचेही परिणाम आणीबाणीतच दिसून आले. या सर्व तंट्यात महाविद्यालयीन शिक्षकांनी सरकारला कसे तोंड दिले तेही तपासणे महत्त्वाचे आहे. तेव्हा या तीनही कारणांनी महाविद्यालयीन शिक्षकांचे आणीबाणीतील वर्तन पारखणे अगत्याचे आहे.

साधले की नाही त्रिकाराचे वजन ?

स्वातंत्र्यदिन-विशेषांकात लिहिणाऱ्या तथाकथित विद्वान लेखकाची ऐट तर तुम्ही बरीच आणलीत; पण विद्वत्तापूर्ण लेख ज्याच्येने सुरू होतो तुम्ही कॉलेज-शिक्षक म्हणजे कोण ते अजून स्पष्ट केले नाही

बरं विचारलंत मी जेव्हा कॉलेज-शिक्षक म्हणतो तेव्हा कॉलेजात असलेले पगारी शिक्षक, आजीव शिक्षक, प्रिन्सिपॉल याचा समावेश करतोच; पण सोयीनुसार कुलगुरु आणि विद्यापीठीय शिक्षक यानाही कॉलेज-शिक्षकातच घालतो. कारण या सर्वांचा कॉलेजशिक्षणाशी शिक्षक म्हणून नसला तरी अप्रत्यक्षपणे सबंध येतो.

## मुकी बिचारी कुणी हाका

या स्वतंत्र बाण्याची आणि लढाऊ वृत्तीची परंपरा असलेल्या कॉलेज-शिक्षकाची आणी-बाणीच्या घोषणेवर काय प्रतिक्रिया होती ?

थाबा, अशी घाई करू नका. या कॉलेज-शिक्षकामागे स्वतंत्र बाण्याची आणि लढाऊ वृत्तीची परंपरा आहे, असा समज आहे. हा समज तपासाला टिकणार नाही.

काय म्हणता ? अहो, टिळक-आगरकर-परांजपे असे ऋषितुल्य शिक्षक येथल्या शिक्षण संस्थातून झाले आणि पुण्यातील अशा शिक्षणसंस्थात स्वतंत्र बाण्याची परंपरा नाही असे म्हणता ?

उगीच अशी मोठी नावे घेतलीत म्हणून मी बुजणार नाही. टिळक-आगरकरांची गोष्ट सोडा; पण सावरकरानी परदेशी कपड्याची होळी केली म्हणून त्यांना परांजप्यानी होस्टेलमधून काढून टाकले हे तर खरे ? असहकारितेच्या चळवळीत स्वातंत्र्यवादी कार्यकर्त्यांनी सरकारी कॉलेजेसप्रमाणेच ह्या खाजगी कॉलेजेसवरही बहिष्कार टाकलाच होता ना ? राष्ट्रवादी पुढाऱ्यानी स्वातंत्र्याच्या विचाराचा प्रसार व्हावा म्हणून काढलेल्या शिक्षणसंस्था उपजीविकावादी शिक्षकानी सरकारजमा केल्या हा इतिहास आहे. पुढे तर असे झाले की, नाटककपनी-तल्या मुख्य नटाची भांडणे झाली की, प्रत्येक नटाची नवी कंपनी निघे, त्याप्रमाणे लाइफ मेंबर्सच्या गटाच्या लाथाळ्या झाल्या की, नवे कॉलेज निघू लागले. तेव्हा लढाऊ वृत्ती ही सरकारशी लढण्यासाठी वापरण्याऐवजी बहुताशी आपसात भांडण्याच्याच कामी येत होती.

पण निदान सरकारी नोकरीसारखा काच तर नव्हता ?

तसेही म्हणता येणार नाही. वर्षानुवर्ष दाखवायचा पगार एक आणि द्यायचा निराळा अशी स्थिती होती. सीनेटच्या निवडणुका असत तेव्हा प्रिन्सिपॉल मतपत्रिकाचा गठ्ठा स्वतःच्या टेबलावर ठेवीत आणि प्रत्येक शिक्षकाला स्वतःला हव्या असलेल्या उमेद-वाराच्या नावापुढे फुली करायला लावीत. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात पुण्यातील कॉलेज-शिक्षकाला स्वातंत्र्य होते ही भ्रामक समजूत आहे एकूण नोकऱ्याच त्या काळी इतक्या कमी होत्या की, मिळेल तो पगार घेऊन अपमान सोशीत कॉलेजशिक्षक या ना त्या आजीव सेवकाच्या उपरण्याचा आश्रय घेऊन दिवस काढीत. स्वातंत्र्यानंतरही ही परि-स्थिती फारशी बदलली नाही.

पण स्वातंत्र्य मिळाल्यावर लगेचच पुणे विद्यापीठ सुरू झाले. म्हणजे अन्यायाविरुद्ध जिथे दाद मागावी अशी संस्था अगदी दारातच आली.

कसले विद्यापीठ घेऊन बसलात ! तुम्हांला या विद्यापीठातल्या लोकाची लाचारी सागतो. विद्यापीठात एक विषयविभाग आहे. त्यात बहुतेक परदेश-पदवीप्राप्त पंडित आहेत; पण या विभागाचे मुख्य, विभागाच्या पत्त्या-वर शिक्षकाना आलेली सर्व पत्रे उघडून वाचतात आणि मगच ज्याची त्याला देतात. ही गोष्ट गेली वीस वर्षे चालू आहे. या मंडळीत आत्मविश्वास आणि स्वाभिमान याचा इतका तीव्र अभाव आहे की, संशोधन-पर प्रबंध गौरकाय विद्वानाने परीक्षिल्या-खेरीज पदवी मिळण्याला पात्र ठरत नाही. पुणे विद्यापीठ निघाले तेव्हा अशी अपेक्षा होती की, हे विद्यापीठ उच्च ज्ञान देखील मराठीतून दिले जावे या दिशेने प्रगती करील. आज या विषयाची चर्चादेखील हास्यास्पद ठरू लागली आहे.

अरेरे, स्वदेश–स्वधर्म–स्वभाषा याचा अभिमान विद्यार्थ्यांचे अंगी बाणवावा या हेतूने सरकारी आणि मिशनरी शिक्षण-संस्थाशी स्पर्धा करतील अशी शाळा–कॉलेजेस् स्वातंत्र्य–चळवळीत काढली गेली आणि त्याचा शेवट मेढवाड्यात झाला !

बरोबर बोललात. पुण्यातील शिक्षकाची परंपरा लढाऊ वगैरे काही नसून ‘मुकी बिचारी कुणी हाका’ अशा मेंढराची ती परं-परा आहे. त्याचे आणीबाणीतील वर्तन या परंपरेला साजेल असेच, किंबहुना अधिक लाजिरवाणे होते.

## आणीबाणीबद्दलची प्रतिक्रिया

असे का म्हणता ? पुण्यातील काही प्राध्यापक तुरुगात गेले होतेच ना ? आणी-बाणीच्या काळात पुण्यातल्या दोन कॉलेजेसवर सरकारी संचालक नेमावेत असा विचार चालला होता ना ?

जरा दमाने घ्या. काही–म्हणजे एका हाताच्या बोटावर मोजण्याइतके–प्राध्यापक तुरुगात गेले, पण ही मंडळी मुख्यतः संघाची किंवा विद्यार्थी–परिषदेची कार्यकर्ती होती आणि मग योगायोगाने शिक्षक झालेली होती. त्यांच्या तुरुगवासाचे क्रेडिट कॉलेज–शिक्षकाना घेता यावयाचे नाही. पुण्यातल्या एस्. पी. आणि एम्. ई. एस्. (गरवारे सायन्स) या कॉलेजेसवर सरकारची टाच येणार अशी दाट बातमी होती; पण त्याचाही संबंध शिक्षकाच्या आणीबाणीविरोधाकडे लावता येत नाही. या महाविद्यालयाच्या संचालकमंडळावर सरकारला नको असणारी माणसे होती आणि या कॉलेजातील विद्या-र्थ्यांनी सत्याग्रहात मोठ्या संख्येने भाग घेतला होता. पुढे सरकारच्या दृष्टीत सल-णाऱ्या व्यक्तींनी संचालकमंडळाचा राजी-नामा दिल्यावर ती वाचटल गेली, पण नतरची गमत पहा

तो कोणती ?

सरकारी संचालक येण्याची आपत्ती टळल्यावर एका कॉलेजच्या संचालकमंडळाने सर्व प्राध्यापकाकडून एक ॲफिडेव्हिट मागि-तले. ते असे की, माझा कोणत्याही बंदी घातलेल्या संघटनेशी संबंध नाही. वास्तविक हे प्रतिज्ञापत्र भरून दिलेच पाहिजे अशी सक्ती नव्हती; पण अपवाद सोडल्यास बाकी सर्वांनी–अगदी बंदी घातलेल्या संघटनेशी संबंधित असणाऱ्यानीसुद्धा–हे प्रतिज्ञापत्र निमूटपणे भरून दिले. अर्थात असे करताना हा गनिमी कावा आहे अशी स्वतःची समजूत ते घालीत होते !

पृष्ठ २७ वर

आर्थिक टिपणे

# आफ्रिकन देशांशी व्यापार

नारायण वैद्य । सभासद, पुणेमहापालिका

परराष्ट्रमंत्री श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने टांझानियाला सहा दिवसांची भेट दिली. दार–एस सलाम येथील इन्स्टिट्यूट ऑफ फायनान्स मॅनेजमेंटच्या सभागृहात भारत–टांझानिया संयुक्त आयोगाच्या बैठका झाल्या. तिसऱ्या आणि अंतिम बैठकीनंतर परराष्ट्रमंत्री श्री. वाजपेयी यांनी पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, 'दोन्ही देशांनी परस्परांना सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रात सहकार्य देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार कारखाने, शेती, विज्ञान; तंत्रज्ञान, आरोग्य, नागरी वाहतूक आणि हायड्रो–कार्बन्स या क्षेत्रात परस्परांच्या सहकार्याने विविध योजना आखण्यात येतील.'

याच पत्रकारपरिषदेत 'भारत–टांझानिया संयुक्त आयोगाने परस्परांच्या व्यापाराचे सिंहावलोकन केल्याचे व हा व्यापार वाढविण्याबाबत एकमत झाल्याचे' परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले. टांझानियासारख्या विकसनशील देशाला सहाय्य करण्याचे धोरण केवळ व्यापारापुरतेच मर्यादित न ठेवता सामाजिक, आर्थिक आणि तंत्रज्ञानक्षेत्राचाही त्यात समावेश केला हे अतिशय योग्य झाले. ज्या ज्या देशाला ज्या ज्या मालाची गरज असेल, आणि तो माल जो देश पुरवू शकेल त्यांच्यामध्ये व्यापारी संबंध प्रस्थापित होण्यास फारसा वेळ लागत नाही; परंतु आर्थिक संबंधांव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विविध देशांशी मैत्रीचेही संबंध असले पाहिजेत. ही मैत्री सहकार्याच्या भावनेतून सुरू होते आणि सहकार्याबरोबरच ती वाढत जाते. मित्रराष्ट्राला सहकार्य करताना त्या मैत्रीत स्वार्थ असलाच पाहिजे असे काही शास्त्र नाही. विशेषत: आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक लहान विकसनशील देशांना मैत्रिपूर्ण सहकार्याची फार आवश्यकता दिसते. ती पूर्ण करण्यात भारताने पुढाकार घ्यावयास पाहिजे.

### भारत–टांझानिया सहकार्य

टांझानियाच्या सोंगो–सोंगो बेटावर भारतीय तेल आणि नैसर्गिक वायुमहामंडळाने नैसर्गिक वायूचा शोध करण्यासाठी जे प्रयत्न केले त्याला चांगले यश आले आहे आणि तेथे भारत–टांझानियाच्या सहकार्याने नैसर्गिक वायूची निर्मिती आणि वितरण व्यापारी पद्धतीने करण्याच्या योजनेवर संयुक्त बैठकीत विचार झाला. टांझानियाकडून काजू आणि पशुखाद्य ( clover ) सर्वात अधिक प्रमाणात आयात करणारा देश म्हणजे भारत होय. १९७६ आणि १९७७ या काळात टांझानियाची पशुखाद्यनिर्यात पाच पटीने वाढलेली आहे. टांझानियाला केंगरा, साखरशुद्धिकरण कारखान्यासाठी लागणारी मशिनरी आणि इतर यंत्रसामुग्री आयात करण्यासाठी पुरेशी आर्थिक मदत देण्याचे भारताने कबूल केले आहे. हा साखरकारखाना १९८० मध्ये उत्पादनक्षम होईल. टांझानियामध्ये लघुउद्योगापासून ते सिमेंट उत्पादन करणाऱ्या कारखान्यापर्यंत अनेक विकासयोजना चालू आहेत, त्यात भारताचे सर्व प्रकारचे सहाय्य होत आहे. दार–एस–सलाम येथे भारताच्या सहकार्याने एक सायकली तयार करण्याचा कारखाना पूर्ण होत आला आहे एक सुताची गिरणी आणि मीठ शुद्धिकरण कारखाना यांचे काम वेगाने चालू आहे.

दार–एस–सलाम येथे पहिलेच आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शन भरले आहे. त्याचे उद्घाटन युगोस्लाव्हियाचे उपराष्ट्रपती यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनामध्ये भारतासह रशिया, फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी; मोझांबिक, उत्तर कोरिया, झांबिया, नायजेरिया आणि मादागास्करसह एकूण १२ ( बारा ) देशांनी भाग घेतला आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी सन्माननीय पाहुणे म्हणून श्री वाजपेयी उपस्थित होते. या प्रदर्शनात भाग घेतलेल्या ज्या नऊ स्थानिक व्यापारी संघटनांना बक्षिसे मिळाली, त्यापैकी भारताच्या सहकार्याने चाललेल्या स्मॉल स्केल इंडस्ट्रीज ऑर्गनायझेशन ऑफ टांझानिया या संस्थेचा समावेश आहे.

### फसवणूक ?

भारताचे अनेक आफ्रिकन देशांशी व्यापारी संबंध आहेत, पण अनेक प्रकारचा भारतीय माल प्रथम युरोपात जातो. त्यावर तेथील देशांची लेबले लावली जातात आणि नंतर तो माल आफ्रिकेत निर्यात होतो. त्यामुळे सदर माल युरोपातील देशामध्ये उत्पादित झाला आहे असा तर समज होतोच; परंतु भारतीय मालावर मोठा नफा बिनधास्तपणे युरोपातील देश कमावतात आणि भारतीय उत्पादकांना व व्यापाऱ्यांना फारच अल्प नफा मिळतो. तसेच टांझानियामध्ये तयार होणारा काही माल प्रथम इटली किंवा पोर्तुगालमध्ये जातो. तेथे 'मेड इन इटली' किंवा 'मेड इन पोर्तुगाल' अशी लेबले लावण्यात येतात आणि त्यानंतर तो माल आफ्रिकेतील इतर देशांकडे निर्यात केला जातो. ओ ए. यू. च्या एका अधिवेशनात आफ्रिका खंडातील देशांमधल्या परस्पर व्यापारावर चर्चा झाली असता असे सांगण्यात आले की, आफ्रिकन देशांचा इतर खंडातील देशांशी जो व्यापार चालतो त्याच्या जेमतेम ७ टक्के व्यापार परस्परांमध्ये प्रत्यक्ष चालतो.

म्हणून भारताचा आफ्रिकेतील अनेक देशांशी प्रत्यक्ष व्यापार ( direct trade ) कसा प्रस्थापित होईल हे पाहिले पाहिजे. आफ्रिकन देशांतील बाजारपेठांचा अभ्यास करणे, त्याच्याविषयीची सर्व माहिती येथील भारतीय व्यापारी संस्थांना पुरविणे, तेथील विविध देशांतून भारतीय उद्योगांना लागणारा कच्चा माल आयात करणे, तसेच आफ्रिकेतील अनेक देशांत जे औद्योगिक

आणि इतर विकासाचे प्रकल्प चालू आहेत; त्याना सहाय्य करणे यासाठी भारत सरकार, विविध चेंबर्स ऑफ कॉमर्स, उद्योगपती, कारखानदार यानी पुढाकार घेतला पाहिजे.

आफ्रिकन देशांना १९७३–७४ मध्ये भारताने केलेली निर्यात १०१·७३ कोटी रु. ची होती. १९७४–७५ मध्ये यामध्ये १०० टक्क्यानी वाढ होऊन ही निर्यात–व्यापार २३७·६१ कोटी रु. पर्यंत गेला. (मालाचे वाढलेले भाव हे एक याचे प्रमुख कारण होते.) १९७५–७६ मध्ये ही निर्यात २७०·४२ कोटी रु. पर्यंत गेली; परंतु भारताची आफ्रिकन देशाना होणारी निर्यात जरी वाढत असली तरी त्या देशातून होणारा भारताचा आयात व्यापार मात्र १९७३ पासून कमी होतो आहे हे लक्षण ठीक नव्हे. १९७३–७४ मध्ये आफ्रिकन देशाकडून भारताने १६७·२६ कोटी रु. ची आयात केली. ही आकडा १९७४–७५ मध्ये १५१·०१ कोटी व १९७५–७६ मध्ये ११२·८७ कोटी रु. इतका खाली आला. अशा प्रकारे आयात–निर्यात व्यापारामध्ये सतुलन राहिले नाही तर पुढील काही वर्षात भारताकडून माल आयात करण्याचे धोरण आफ्रिकन देश बदलतील आणि तिकडे होणारा आपला निर्यात व्यापारही घटेल अशी भीती आहे. १९७५–७६ मध्ये भारताने अल्जेरिया, कामेरुन, कॅनरी बेटे, लिसोथो, रि–युनियन, टोगो आणि राउडा या देशांतून काहीही आयात केली नाही. उलट भारताने सदर देशाना केलेल्या निर्यातीचे आकडे पुढीलप्रमाणे–(लक्ष रुपये)–

अल्जेरिया – १५४. कामेरुन – ९८
कॅनरी बेट – ६६. लिसोथो – २२
टोगो – १२. रि–युनियन – २
राउडा – १.

स्वतःच्या एकूण परदेशी व्यापारामध्ये ४५ टक्के हिऱ्याची विक्री, २५ टक्के कापसाची विक्री आणि १५ टक्के कॉफी अशा स्थितीत असलेल्या सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकशी भारताचे कोणतेही व्यापारी संबंध नाहीत ही गोष्ट खटकणारी आहे. रेल्वेची इंजिने, वॅगन्स, रेल्वेचे रूळ, डिझेल इंजिने, पेट्रोल–वाहने आणि सुटे भाग, सायकली, शिवणाची यंत्रे, बेसिक रासायनिक द्रव्ये, कीटकनाशके, रंग, औषधे, प्लॅस्टिकच्या वस्तू, वॉर्निश, कागद, कापड, खेळाचे साहित्य या गोष्टी विविध आफ्रिकन देशाना मोठ्या प्रमाणावर लागतात त्या अधिकाधिक प्रमाणामध्ये कशा पुरविता येतील आणि सर्व आफ्रिकन देशाशी आपला व्यापार कसा वाढेल हे भारताने पाहिले पाहिजे.

## जीवनावश्यक वस्तूंची निर्यात नको

अर्थात भारताचा परदेशाशी व्यापार वाढविण्यासाठी आणि तो व्यापार फायद्याचा व्हावा म्हणून ऊठसूठ सगळया वस्तू निर्यात करणे कसे धोक्याचे ठरले आहे हे सध्याच्या भाववाढीवरून लक्षात येते. व्यापारी नागरीपुरवठा आणि सहकार या खात्यावर लोकसभेमध्ये चर्चा चालू असताना केंद्रीय मत्री श्री. मोहन धारिया यांनी जीवनोपयोगी वस्तूंचा येथे तुटवडा निर्माण करून आणि जनतेला महागाईच्या भीषण गर्तेत लोटून अशा वस्तूंची निर्यात यापुढे केली जाणार नाही असे ठाम आश्वासन दिले आहे ते अतिशय योग्य आहे. आयात–निर्यात व्यापाराचे संतुलन राखण्यासाठी आणि हा व्यापार तोटयाचा होणार नाही हे पहाण्यासाठी निर्यात व्यापार वाढविणे आवश्यक आहेच; पण या व्यापारामध्ये चहा, भुईमूग, भाजीपाला, साखर यांचा समावेश केल्यानेच हा प्रश्न सुटेल हे सागणे ढोंगीपणाचे आहे. कांदा, बटाटा, तेल–बिया याच्या निर्यात व्यापाराला आतापर्यंत परवानगी द्यायला नको होती. कांद्याची भरमसाट निर्यात करण्याने येथे कांद्याचा भाव जो २०–२५ पैसे किलो होता तो एक रुपया किलोच्या पुढे गेला. तेव्हा येथील गरीब जनतेला महागाईच्या खाईत लोटून जर कांद्याचे दलाल लाखो रुपये कमावणार असतील तर ही शोषणवृत्ती जनतेने हाणून पाडली पाहिजे. ह्यामागील एका लेखात 'गोडे तेल अजून कडूच' या शीर्षकाखाली मी असे सुचविले होते की, 'वनस्पति-तूप उत्पादन करणाऱ्या कारखान्यानी परदेशातून आयात केलेले खाद्य तेल वापरावे. कारण ते येथील जनता वापरू शकत नाही. अशा तेलापासून वनस्पति तूप करताना (हायड्रोजनेशनमुळे) त्याच्या रगरूपात आणि वासामध्ये बदल होऊन तुपासारखा दिसणारा पदार्थ तयार होतो. भुईमुगाचे तेल किंवा इतर देशी खाद्य तेले वापरण्यास या कारखान्यांना बंदी करावी म्हणजे घरोघरी वापरण्यासाठी शेंगदाणा–तेल आणि इतर खाद्य तेले स्वस्त भावात आणि भरपूर उपलब्ध होतील. केंद्रसरकारने वनस्पति–तूप तयार करणाऱ्या आणि खाद्यतेलाचे शुद्धीकरण करणाऱ्या सर्व कारखान्यांना भुईमुगाचे तेल वापरण्याची बंदी केली आहे, अशा तऱ्हेचा निर्णय जनतासरकारने जो नुकताच घेतला आहे याचे देशभर निश्चितपणे स्वागत होईल.

## नारळ स्वस्त हवेत? थोडे थांबा!

आगामी सात वर्षांत नारळाचे उत्पादन वाढविण्यासाठी केरळ सरकारने एक प्रचंड योजना आखली आहे. या योजनेला ६२ कोटी १० लक्ष रुपये एकूण खर्च येईल. राज्यातील ३५ हजार हेक्टर जादा जमीन या कामासाठी उपलब्ध करून देण्याचा केरळ सरकारचा प्रयत्न आहे. जागतिक बँकेकडून २७ कोटी रु. कर्ज मिळेल अशी अपेक्षा आहे. आज केरळमध्ये नारळ–उत्पादनाखाली एकूण फक्त ७४८ हेक्टर जमीन असून नारळाचे केरळमधील एकूण उत्पादन ३ हजार ७३४ दशलक्ष नारळ झाले आहे आणि हे देशातल्या नारळाच्या एकूण उत्पादनाच्या ६५ टक्के आहे. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

। मॅक्झिम गॉर्की ।

। सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३०

# विषमतानिर्मूलन : पिरंगुटला काय घडले ?

रा. प. नेने । हेमलता राईलकर
विलास वाघ । मधु वाणी

विषमतानिर्मूलनसमितीचे वतीने मुळशी तालुक्यातील पिरंगूट या गावी गेलो होतो. गावची लोकसंख्या अदाजे २२००. पुण्यापासून सुमारे १४ मैल अतरावर. गावात सरकारी दवाखाना आहे, हायस्कूल आहे, पोस्टऑफिस आहे, वीज आहे आणि गावात प्रवेश करतानाच दारूचे सरळ सरळ कायदेशीर दुकानपण आहे म्हणजे गाव तसे आधुनिक. तर मग गावच्या दलितांना पाण्याची सोय काय आहे ? हा आमचा ठराविक पहिला प्रश्न.

सरळ बुद्धवस्तीतच गेलो. बहुतेक पुरुषमडळी बाहेर कामावर गेली होती. बायका होत्या, त्यानी आस्थेने झाडाखाली चादर पसरून आमचे स्वागत केले. थोड्याच वेळात पुण्यातील गरवारे कॉलेजमध्ये शिकणारा बाळू ओव्हळ आला. गावातील एका सार्वजनिक विहिरीवर सर्व दलित व सवर्ण पाणी भरण्यास सुरुवात झाल्याला सुमारे वर्ष झाले असेल असे तो म्हणाला. त्याच्या कॉलेजातील त्याचे सर्व मित्रही त्याच्याशी चागले वागतात असे त्याला वाटत होते. राष्ट्रीय स्वयसेवक सघाबद्दल त्याला आपुलकी होती. मग थोडा वेळ पुढील संवाद झाला.

आम्ही : तुझे मित्र व तू एकमेकाकडे जाता–येता का ?

ओव्हळ : पिरगूटहून रोज मी सायकलने जातो–येतो. त्यातच पुष्कळ वेळ जातो. बाकीचा वेळ कॉलेजात व कधीकधी घरची कामे करण्यात जातो. एकमेकाकडे जाण्या–येण्यास वेळ असतोच कुठे ?

आम्ही . पण सुटीत तरी जाता–येता का ?

ओव्हळ : तसे काही कारण पडत नाही, परतु आमचे सबंध चागले आहेत.

आम्ही : बरं, तुमच्या या विहिरीवर, गावातील मातग म्हणा किंवा इतर कोणी दलित पाणी भरतात का ?

बुद्ध भगिनी : हो भरतात की, तस इथल्या गावात काही वाईट नाही.

आम्ही : मातंगसमाजातल्या लोकाच्या घरी तुम्ही जाता का ? त्याच्या बायका तुमच्याकडे येतात का ? जेवण–खाण एकमेकाकडे घेता का ?

बुद्ध भगिनी : ( जरा अडखळत ) : जातो की ... पण त्याच कधीमधी येतात. त्यांच्याकडे जेवण आम्ही घेत नाही, पण त्यांच्यातले लोक आमच्याकडे कधीकधी चहा–पाणी करतात.

आम्ही : असे का ? तुम्हीही त्याच्या हातचे खावयास नको का ?

बुद्ध भगिनी : हव; पण ते हळूहळू होईल. आमची मुलं त्याच्याकडे जातात की. तस काही नाही, आमचे सगळ्याशी चांगले आहे. गावातील दलिताची सवर्णांशी फारशी तेढ नाही,

पण एक पाणवठा झाला आहे, म्हणून आम्हाला बरे वाटत होते; परंतु बुद्ध–भगिनीच्या मनावरील जुने सस्कार घट्ट नसले तरी टिकून आहेत हेही जाणवत होते. गावात दवाखाना असूनही, मुलांच्या अगावरील खरूज बरी करण्याकरिता कुठल्या तरी पानाचा चीक ( लेप ) लावण्यात येत होता व त्याने ती खरूज काही बरी होत नव्हती हेही दिसत होते. आमच्या विनंतीवरून सरकारी दवाखान्यातील डॉ. जाधव जवळच असलेल्या बावधन या गावी गेले होते व त्याच्या औषधोपचाराने त्या गावातील अनेक लहान–मोठयाची खरूज बरी झाली होती हा अनुभव आम्ही सांगितला व त्याप्रमाणे येथील मुलांसही दवाखान्यात न्यावे अशी विनती आम्ही भगिनीना केली. पावसाची चिन्हे दिसू लागली, दिवसही मावळावयास लागला होता, म्हणून आम्ही नमस्कार करून उठलो.

पुढे काही दिवस गेले आणि आमच्यापर्यंत एक बातमी येऊन धडकली. पिरगूट गावातील गोळे व पवळे या दोन सवर्ण घराण्यामध्ये काही वर्षांपासूनची तेढ. धोका मात्र निर्माण झाला आहे गौतम केदारी नावाच्या बुद्ध युवकाला. गोळेआळीचे बहिरोबाचे मदिर वेगळे, पवळेआळीचे वेगळे. एककमेक–एकमेकाच्या मदिरात जातही असत; परतु पवळेघराण्यात भाऊबंदकी सुरू झाली. बहुसख्य पवळ्यानी त्याच्यातील काही जणाना वाळीत टाकल्यासारखे केले. गावातील इतर लोकानीही तसेच वागावे अशी बहुसख्याक पवळ्याची अपेक्षा. त्याच्या घरातील आनदोत्सवाच्या प्रसगीही कोणी जाता कामा नये की त्याच्यातील कोणाच्या मयतीला दुसऱ्या कोणी जाता कामा नये.

गावातील उरूस साजरा करावयाचा तरी या पवळ्याना टाळले पाहिजे असे गोळेघराण्यातील लोकाना वाटे 'भाऊबदकी पवळ्याची, आम्हाला सर्व पवळे सारखेच. मग त्याच्यातील काही पवळ्याशीच आम्ही तुटकपणे का वागावे ? उरूस साऱ्या गावचा. मग काही लोकावरच बहिष्कार का म्हणून ?' गोळ्यानी बहुसख्याक पवळेगटाचे म्हणणे ऐकले नाही. इतर कारणाचीही भर पडून तेढ वाढत गेली. एकमेक एकमेकाच्या मदिरात जाण्याचे सहसा टाळू लागले. जास्त वाद नको म्हणून गावचा उरूसच बद पडला.

गौतम केदारी हा पुण्यातील कॉलेजात शिकणारा बुद्ध तरुण. गोळेघराण्यातील तरुणाशी त्याची जरा विशेष निकट मैत्री. पवळ्याशी त्याचे वैर नाही; पण गोळेयुवकाशी दोस्ती पहिल्यापासून जास्त होत गेली इतकेच.

एकादशीचा दिवस. पवळयांच्या बहिरोबामंदिरात भजनाचा कार्यक्रम होता दिवाबत्ती लागली होती. गौतम केदारी व त्याची गोळे दोस्तमडळी मदिरावरून सहज चालत जात होती. कार्यक्रम दिसला म्हणून त्यांना वाटले मंदिरात जावे. त्याप्रमाणे ते आत गेले. जरा वेळाने गाभाऱ्यापाशी गेले. पवळयांपैकी एकाने गौतमला बाहेर बोलाविले आणि मदिरात त्याने राहू नये असे सागितले. त्याच्यावर वाद सुरू झाला. तो अधिक तीव्र बनला. गौतमला राग आला. त्याच्या मित्रानाही ते आवडले नाही. रात्री सुमारे नऊची वेळ; परतु अस्पृश्यतापालनाविरुद्धचा कायदा रात्रदिवस चालू असतो हे गौतमला माहीत होते तो मित्राबरोबर पौड येथील पोलिसचौकीवर सायकलने गेला आणि मदिरात प्रवेशास विरोध केला गेल्याबद्दलची त्याने तक्रार नोदविली मित्रानी साक्ष दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी पोलिस आले आणि पवळयाच्यापैकी पाच-सहा जणाना त्यानी अटक केली. त्याबरोबर गावात तंगी निर्माण झाली. पवळे म्हणू लागले, 'गौतम दारू पिऊन व चपला घालून देवळात आला होता, म्हणून आम्ही त्याला बाहेर जावयास सागितले' पोलिसाकडे जाऊन सढळ हाताने, केविलवाण्या स्वरात बातचीत करून, अटक झालेल्याना सोडवून आणण्यात आले असे इतर काहीजण म्हणत होते म्हणून पुन्हा एकवार पिरगुटला जाऊन चौकशी करावी असे आम्ही ठरविले.

गौतम केदारीचे वडील काहीशा सचित मुद्रेने लहानशा झोपडीत बसले होते. आमचे स्वागत करून व आम्ही आमचा करून दिलेला परिचय ऐकून ते म्हणाले, 'बसा आणि बोला.'

आम्ही : तुमच्या गावात तर एक पाणवठा आहे असे आम्ही ऐकले होते, पुण्यातील कॉलेजमध्ये जाणाऱ्या तुमच्यातील युवकांना कोणताही वाईट अनुभव येत नाही असेही ऐकले होते; मग आताच नव्याने ही तगी का निर्माण झाली? खरे काय घडले? आम्ही गावोगावी जातीजातीतील तटे पेटविण्याकरिता जात नसतो, तर मिटविण्याकरिता जातो. तर खुल्या दिलाने बोला!

केदारी : मी काय बोलू? येवढेच सागतो की त्या दिवशी जर मी गावात असतो तर हे प्रकरण मी वाढू दिले नसते. लगेच मिटविले असते. माझे गावकऱ्याशी प्रेमाचे सबध आहेत तसेच ते राहिले पाहिजेत.

आम्ही . तुमचा मुलगा दारू पिऊन गोळेघराण्यातील त्याच्या मित्राबरोबर बहिरोबाच्या देवळात गेला म्हणून त्याला पवळेघराण्यातील कोणी तरी धक्काबुक्की करून बाहेर काढले असे म्हणतात हे खरे का?

केदारी : माझा मुलगा दारू पीत नाही हे मी तुम्हास देवा-शपथ खरे सागतो. त्याच्या वागणुकीबद्दल तुम्ही वस्तीत विचारा किंवा गावातील समजदार लोकांना विचारा. ते सागतील; पण त्याने देवळात जावयास नको होते.

आम्ही : का बरे? कोणालाही इच्छा असल्यास देवळात जाण्याचा अधिकार असावयास नको का?

केदारी : अहो, ते सगळं खरं. तो जर आपणहून हक्क म्हणून आमच्या वस्तीतील मुलाना घेऊन देवळात गेला असता ना, तर मला त्याचा अभिमान वाटला असता, पण उगाच दुसऱ्याच्या नादाने जावयाचे आणि मग बाचाबाची झाली की पोलिसात तक्रार देऊन वाद वाढवावयाचे. कशाला उगाच त्रास? आधीच गावात दहा-पाच घरे. गावाशी झगडा करून परवडेल का? म्हणून मी इन्स्पेक्टरसाहेबाचे जाऊन पाय धरले आणि त्याना म्हटल, 'साहेब, मिटवा हे प्रकरण!' पण साहेब म्हणाले, 'काही मागे घेणार नाही मी. तक्रार खरी असेल, तर उगाच गावाच्या दबावाखाली भिऊ नका! जाऊ दे कोर्टात आणि देऊ दे त्याना निकाल!' म्हणून मी काळजीत आहे बघा. आता तुम्ही बघा मिटवून मुलाला तर मी पुण्याला माझ्या नातेवाइकाकडे पाठवून दिला आहे इथे राहिला तर उगाच काय होईल आणि काय नाही

आम्ही : बर, एकूण गावातली परिस्थिती काय आहे? तुम्हाला मदिरात प्रवेश मिळतो की नाही? कोणी कधी जातो का देवळात?

केदारी : प्रवेश म्हणजे आत गेले तर विरोध नाही; पण गाभाऱ्यापर्यंत मात्र जावयाचे नाही, असा आहे रिवाज बघा! आम्ही तरी कुणी कधी फारसे जात नाही, पण आताची तरुण मुलं, ऐकतात का आपल? जात असतील कधीमधी माझा मुलगा माझ्या शब्दाच्या बाहेर नाही; पण मी नव्हतो ना त्या दिवशी गावात

आम्ही तुम्ही स्वत पोटापाण्याचा उद्योग काय करता? शेतीबिती आहे का तुमची?

केदारी अहो, कसली शेती घेऊन बसलात? दहा-बारा एकर आणि त्याचे वाटेकरी पाच-पन्नास काही जण गावात राहातात, काही जण बाहेर नोकरीला असतात म्हणून आम्ही ती जमीन खडाने देऊन टाकली आहे आणि वर्षाकाठी प्रत्येकाच्या वाट्याला दहा-वीस रुपये येतात, ते आपले घ्यायचे झाल मी कधी शेतमजुरी करतो, कधी रस्त्यावरची कामे करतो, कधी मजूर पुरविण्याची छोटी कंत्राटे घेतो. माझा मोठा मुलगा वायरमनची नोकरी करतो. धाकटा गौतम कॉलेजात शिकतो. या वर्षी तो नापास झाला आणखी तीन मुलगे आहेत आणि लग्न झालेली एक मुलगी आहे.

आम्ही : दुसऱ्याच्या नादाने मदिरात जाऊन, त्याने वाद उपस्थित केला असे तुम्ही मघाशी म्हणालात. म्हणजे काय? गोळयानी त्याला मदिरात जायला लावले आणि पवळयांनी अटक झाल्याचा आनद लुटला असे झाले का? पवळयाना अटकेतून सुटण्याकरिता विशेष प्रयत्न करावे लागले म्हणतात. खरे का?

केदारी आता उगाच जास्त कशाला मला बोलावयास लावता? मला सगळया गोष्टी माहीत नाहीत सुटले येवढं खर आणि ते बर झाल. मला काही विचारण्यापेक्षा ते समोर गोळयाच्यातले तरुण चालले आहेत त्यानाच जाऊन विचारा ना

आम्ही उठून रस्त्यावर आलो जवळच चहाचे दुकान होते. त्याच्या समोरून जाणाऱ्या गोळयाच्यातील तरुणाना आम्ही भेटलो आणि त्याना म्हटले,

आम्ही : चला की चहा घेत गप्पा मारू जरा. काय तुमचे नाव?

बाळू गोळे माझे नाव बाळू गोळे. मी पुण्यातल्या कॉमर्समध्ये शिकतो. हा विलास.

[आम्ही आमचा परिचय करून दिला.]

आम्ही : तुमच्या गावात मदिरप्रवेशावरून वाद निर्माण झाला आहे असे म्हणतात. गोळया-पवळयाचा जुना वाद. तो अधिक पेटविण्याकरिता तुम्ही गौतम केदारीला मदिरात जावयाला लावलेत

आणि भांडण सुरू करून दिलेत, हे खरे का? गौतम दारू पिऊन मदिरात गेला होता का?

बाळू गोळे : नाही, आम्ही काही सांगितले नाही. त्या दिवशी एकादशी होती. मंदिरात भजनाचा कार्यक्रम आहे असे कळले. लाइट–विइट दिसली. गौतम व आम्ही सहज हिंडत होतो. गौतम म्हणाला, चला, आत जाऊ, आम्ही गेलो. तो दारू प्यालेला नव्हता.

आम्ही : बर, मग काय झाल ?

बाळू गोरे : थोड्याच वेळाने पवळयाच्यातील एकाने गौतमला बाहेर बोलाविले आणि 'तू मंदिरात बसणे बरोबर नाही' असे सांगितले.

गौतम म्हणाला, 'का? मी माणूस नाही का? सगळी माणसं बसतात तर मी का बसू नये?'

तेव्हा पवळयाच्यातील म्हणाले, 'नाही, तसे बसू देणार नाही! बऱ्या बोलाने आपला बाहेर जा!' असे म्हणून त्यांनी गौतमला बाहेर लोटले.

ती रात्री नऊची वेळ होती. आम्ही हे सगळे पाहात होतो व ऐकत होतो. गौतमला पण राग आला. तो म्हणाला, 'तुम्ही येता का माझ्याबरोबर? आपण पौडच्या पोलिसठाण्यावर जाऊन तक्रार नोंदवू!'

*आम्ही सायकली बाहेर काढल्या आणि पौडच्या पोलिसस्टेशनवर* गेलो तोपर्यंत जवळजवळ रात्रीचे अकरा वाजले होते. इन्स्पेक्टरांनी गौतमचे म्हणणे ऐकून घेतले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी तक्रार नोंदवून घेतो असे सांगितले. गौतम आमचा मित्र असल्यामुळे, त्याच्या विनंतीवरून आम्ही साक्ष दिली एवढाच काय तो या प्रकरणाशी आमचा संबंध.

आम्ही : याच्या पूर्वी कधी त्या देवळात गौतम व तुम्ही गेला होतात का?

बाळू गोळे : सगळे एकत्र असे गेलो नाही; पण कधी मी व गौतम गेलो आहो. कधी तो आणखी कोणाबरोबर गेला असेल क्वचित्.

आम्ही : मग नेमके या एकादशीला तुम्ही आत गेल्यावर का वर्र हटकल असेल?

बाळू गोळे : आता हे आम्हाला काय माहीत? पवळयाच्यातले बरेच लोक त्या दिवशी देवळात होते म्हणून असेल किंवा त्या दिवशी मंदिरात कार्यक्रम होता म्हणून असेल किंवा गौतम गाभाऱ्याजवळ गेला म्हणूनसुद्धा असेल. मला माहीत नाही. तुम्ही गौतमलाच विचारा, नाही तर अटक होऊन सध्या सुटलेल्या पवळयापैकीच कोणाला तरी विचारा.

आम्ही : ठीक आहे. आता एकच प्रश्न विचारतो. तुमच्या गोळे-आळीतल्या मंदिरात गौतमला घेऊन तुम्ही कधी जाता का? त्याला गोळयापैकी कोणी विरोध करतो का? तो गाभाऱ्यापर्यंत जातो का?

बाळू गोळे : गौतम आमच्या मंदिरात कित्येक वेळा येतो. आम्ही तेथे दुपारी झोपतासुद्धा कधीकधी. त्याला कोणाचा विरोध नाही. म्हणजे असे आहे, आमच्यात जरा शिकलेले लोक आहेत, नोकऱ्या करणारे पण आहेत. उगाच जास्त आडदांडपणा कुणी फारसा करीत नाही. गौतम आमच्या घरी चहा–पाणी, खाणे–पिणे सगळे काही करतो. आम्ही त्याच्याकडे कधी–क्वचित् जातो; पण तोच जास्त येतो. हा, गाभाऱ्याचे विचारलेत नाही का? सहसा तो जात नाही; पण गेला तर विरोध नाही.

आम्ही : गौतमला जरा भेटता आले असते तर बरे झाले असते. तो पुण्याला असतो नाही का? तुमच्या सगळयाचा जर त्याला पाठिंबा आहे, तर त्याला गावात राहण्याची धास्ती का वाटावी? त्याला आमच्याकडे घेऊन याल का उद्या पुण्याला?

बाळू गोळे : हो, येऊ की त्याला घेऊन. तसा तो गावात राहिला तर काही धास्ती नाही; पण त्याचे वडील उगाच घाबरतात. जुन्या मताचे आहेत ते त्यांना गौतम गावात राहिला तर वस्ती पेटेल असे वाटते म्हणून त्यांनी त्याला पुण्याला पाठवून दिले आहे.

चहा संपवून आम्ही उठू लागलो, तेवढयात आमचा संवाद अधून-मधून ऐकत असलेले एक गावकरी म्हणाले, 'अहो साहेब, सगळयाचे म्हणणे तुम्ही ऐकता, तसे पवळयाचे का नाही ऐकत?'

'हो, आता आम्ही त्यांच्यापैकी एखाद्या आरोपीकडे चाललो आहोत सगळयाचे म्हणणे ऐकल्याखेरीज योग्य मत कसे बनविता येईल?'

'मग भेटा की, समोर रस्त्यावर उभ्या असलेल्या त्या बाबांना, ते एक आरोपीच आहेत!'

*आम्ही रस्त्यावर आलो.* दाढी, केस पांढरे झालेले, नुकतेच शेत-कामावरून परत आल्यामुळे अस्ताव्यस्त झालेला साधा पोषाख घातलेले एक गावकरी दिसले त्यांना नमस्कार करून आम्ही त्यांना विचारले,

आम्ही : आपण पवळे का?

करड्या आवाजात उत्तर आले, 'होय, मी निवृत्ती पवळे'

आम्ही : मंदिर–प्रवेशावरून वाद झाला असे ऐकले, म्हणून चौकशीला आलो होतो काय झाल खर? तुमच्यापैकी कोणी गौतम केदारीला बाहेर काढले का?

निवृत्ती पवळे : कायदा उभा केलात तुम्ही हरिजनाच्या बाजूने, आरोपी झालो आम्ही. 'काय व्हावयाचे असेल ते होऊ दे!'

आम्ही : अहो पवळे, असे एकेरीवर काय येता? आम्ही नुसती माहिती विचारीत आहोत. काय झाले ते तर सांगाल की नाही?

निवृत्ती पवळे : काय म्हणजे? तो गौतम दारू पिऊन त्या दिवशी मंदिरात आला आणि वाटेल तसे बहकून बोलावयास लागला. मांजरो–कुत्री तुमच्या दगडाच्या देवावर हगतात, मुततात ते तुम्हाला चालते आणि मी आलो तर काय झाल?' ही भाषा. कधी असे बोलणारा तो पोरगा नाही! तो नेहमी आपला चीप- चाप असणारा, दारू प्यायल्याशिवाय आणि कोणी तरी किल्ली फिरविल्या-शिवाय बोलला का तो? हे पहा साहेब, हे सगळे गावकीतून झाले आहे. बस्स, दुसरे काही नाही! त्याच्या बापाला विचारा की! आमचे संबंध चांगले आहेत. त्याच्या दुसऱ्या दिवशी तो मला भेटला तेव्हा त्याला काय झाल ते मी सांगितले. तेव्हा मला तो म्हणाला, 'दोन तोंडात लगावूनच त्याला बाहेर का नाही काढलात?' दारू पिऊन, चपला घालून देवळात येणाराला आम्ही बाहेर काढणारच! मग तो हरिजन असू दे, पवळे असू दे, नाही तर आणखी कोणी सुद्धा असू दे. हो, ते जमायचे नाही. हा म्हणता रात्री बाहेर काढला, अन् मग

तक्रार दुसऱ्या दिवशी का हो नोंदवली ? जे काय व्हावयाचे असेल ते होऊन दे !

पवळे दणकेबाज भाषण ठोकल्याच्या समाधानाने आमच्याकडे बघत राहिले. आमच्या भोवती आता बरीच गर्दी जमली होती. भोवतालच्या घरातील बायका दाराच्या फटीतून किंवा खिडकीतून; भेदरलेल्या नजरेने डोकावून डोकावून बघू लागल्या.

आम्ही : हे पहा पवळे. अशी वकिली करू नका. तुम्ही खरे सांगा. गौतमला तुम्ही एरवी तरी मंदिरात प्रवेश देता का ? त्याचे सगळे मित्र, वस्तीतील लोक म्हणतात तो कधी दारू पीत नाही. त्याच्या वडिलांवर तुमचा विश्वास आहे ना, ते सुद्धा म्हणतात की तो दारू कधी पीत नाही. तेव्हा ते तुम्हाला कोर्टात सिद्ध करावे लागेल. उगाच केलेला आरोप कोर्ट ऐकून घेणार नाही !

एक गावकरी : बरं का साहेब, त्यांचे म्हणणे राहू दे. त्यांना आरोपी केलं आहे, म्हणून ते तापले आहेत जरा. तुमच्या प्रयत्नांनी हे जर मिटत असेल, तर पोलिसांतले कागद परत आणता येत असतील तर बघा. गावात पिढ्यान् पिढ्या आज संबंध चांगले आहेत; उगाच बिघडायला नको !

निवृत्ती पवळे हं मी तेच म्हणतो आहे, दुसऱ्या दिवशी जर नीट तो गौतम आला असता ना तर मंदिरात त्याला प्रवेश दिला असता. कोण नाही म्हणतो ?

आम्ही : हे सगळे भेदाभेद जावयास पाहिजेत. मंदीर, विहीर, पार ही सर्वांना खुली असावयास पाहिजेत. जेवण–खाण एकमेकांनी एकमेकांकडे घ्यावयास पाहिजे. तुम्ही जेवाल का हरिजनांच्या हातचे जेवण ?

निवृत्ती पवळे : ( खाठर उच्च स्वरात ) जेवण जेवावयाचे म्हणता होय ? मान कापली, तरी हरिजनाच्या हातचे जेवण कधीही जेवणार नाही ! कोण बळजबरी करू शकतो माझ्यावर ? तुम्ही उद्या श्रीखंडपुरी केलीत नी बोलावलेत म्हणून काय आले पाहिजे काय ? कोठे जेवावयाचे ते मी ठरविणार ! माझ्यावर का सक्ती ? हरिजनांनी पाहिजे तर माझ्या घरी येऊन जेवावे. गळा कापला तरी मी जेवणार नाही ! पुन्हा सांगतो. तो येतोय् की समोरून तुमचा केदारी. विचारा की चहापाणी केलं आहे की नाही त्याने आमच्याकडे.

केदारी : होय साहेब ! समदं चांगलं आहे. हे मिटायला पाहिजे. पोरांचे करणे काय मनाला लावून धरावयाचे असते का ? नको आता जास्त हे. मिटवा ! ( केदारीचा स्वर फारच केविलवाणा होता. )

गौतमचा मोठा भाऊ बाबासाहेब तेवढ्यात तेथे आला होता. तो हलक्या आवाजात म्हणाला, ' असे नुसते मिटवा म्हणून कसे मिटेल ? पुन्हा असे होणार नाही, म्हणून खात्री नको का ? गौतम वडिलांना मानीत असला तरी तसे ऐकावयाचा नाही ! '

आम्ही : होय, तरुण पिढीतली मने तसे सहजासहजी ऐकून कसे घेतील ? पुष्कळ जुन्या, वयस्कर लोकाना समेट हवा असतो. तरुणांना न्याय हवा असतो. त्याकरिता ते आग्रही बनत चालले आहेत. काय चूक आहे त्याची ? पण, बरे का पवळेसाहेब, आम्ही काही कोणाच्या माना कापण्यासाठी आलेलो नाही. सामाजिक संबंध एकोप्याचे व्हावे ही आमची इच्छा. जुनी बंधने बाजूला सारून एकमेकांकडे जेवण–खाण करावे हा त्यावरील एक उपाय. माना कापण्याची भाषा कशाला ? हरिजनांसकट साऱ्या गावकऱ्याची एक बैठक घेऊ या आणि सारी तेढ योग्य पद्धतीने मिटविण्याचा प्रयत्न करू या ! आहे कबूल ?

एक गावकरी : साहेब, तुम्ही म्हणता ते सगळे चांगले आहे; पण हे सगळे हळूहळू होईल. जरा दमादमाने घ्या म्हणजे सगळे होईल. एकदम बरे कशी सुधारणा होणार ?

आम्ही . ज्याच्यावर अन्याय होतो त्यांना तो हळूहळू दूर करून नको असतो. त्याना लवकर सुधारणा हवी असते. अन्याय करणाराना मात्र नाइलाज होईतोपर्यंत पुष्कळदा ताणून धरावेसे वाटते. इंग्रज राज्य करीत होते, तेव्हा ते नव्हते का म्हणत ' अहो, हळूहळू तुम्ही राज्यकारभाराला लायक व्हाल तेव्हा आम्ही तुम्हाला स्वराज्य देऊ ! ' आणि आपण म्हणत होतो, ' तुम्ही आमचा देश सोडून ताबडतोब चालावयास लागा, म्हणजे आमचा राज्यकारभार आम्ही अगदी व्यवस्थित करू ! '

गावकरी : असे जरी आपण म्हटले तरी इंग्रजानी केलेच की दीड–दोनशे वर्षे राज्य आपल्यावर. तेव्हा सगळे काही हळूच होत असते.

आम्ही : अहो, पण त्या हळूहळूलाही आता शेकडो वर्षे झाली. आणखी किती काळ हरिजनांनी थांबावयाचे ?

एक आवाज : ( खड्या स्वरात ) मी जरा बोलू का ? आधी तुम्ही हरिजन शब्द सोडून द्या पाहू. गांधीजींनी ढोंगबाजी करण्यासाठी तो आणलाय्. तुमच्यासारख्या सुशिक्षितांनी तो वापरला म्हणजे गावकरीही तोच वापरतात. आम्ही बुद्धधर्म स्वीकारला आहे, आम्हाला बुद्ध म्हणा आणि तुम्ही जी बैठक घेणार आहात ती कोठे घेणार आहात ते कळू द्या की जरा.

आम्ही : कोठेही घेऊ. ग्रामपंचायत चालेल, चावडी चालेल, झाडाखाली सुद्धा बसता येईल ! हरिजन शब्दाने आपल्याला राग आला असला तर आम्ही तो मागे घेतो. तो रूढ पडला आहे म्हणून वापरला इतकेच. गांधीजींनी सारी ढोंगबाजी केली असे म्हणणे योग्य होणार नाही. अस्पृश्यतेचा कलंक दूर करण्याकरिता त्यांनी नैतिक वातावरण देशभर तयार करण्याकरिता परिश्रम घेतले हे नाकारून कसे चालेल ? आपले नाव काय ?

आवाज : मी कांबळे. नुकतेच निवडून आले त्या बी. सी. कांबळेचा मी भाऊ. ( भाऊ म्हणजे दूरचा नातेवाईक हे आम्हाला त्यानंतर कळले. ) दुसऱ्या दिवशी गौतम मंदिरात आला असता तर चालले असते असे म्हणत आहेत ना हे लोक, मग घ्या की बैठक त्या मंदिरातच आणि बोलवा बुद्धाना पण तिथेच. म्हणजे समजेल विरोध आहे का पाठिंबा आहे ते.

आम्ही : हो काहीच हरकत नाही. मंदिरात बसू. काय गावकरी मंडळी, चालेल ना ? कोणा बुद्धाला पूजा करावयाची असली तर वाटल्यास ती सुद्धा करून मग बसू.

श्री. कांबळे यानी बॉम्बगोळाच टाकले होते. निवृत्ती पवळे अवाक् होऊन बघतच राहिले. बाकीचे काही बोलेनात.

एक गावकरी : कुठेही बसले तरी सारखेच. वाद मिटवावयाचा

आहे ना ? या तर खरे तुम्ही एक दिवस रात्रीच्या टाइमाला, मग बघू !

उशीर खूपच झाला होता. गौतमला दुसऱ्या दिवशी पुण्याला येण्याची आठवण आम्ही केली आणि निरोप घेऊन घरी परतलो. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी गौतम केदारी आला. त्याला सारी पार्श्वभूमी मित्रानी सांगितलीच होती. त्याला जास्त काही प्रश्न विचारावे लागलेच नाहीत. तो सांगू लागला,

**गौतम केदारी :** मी एक एक पॉइंट घेऊन सांगतो. गोळचानी सांगितले म्हणून मी त्या दिवशी मंदिरात गेलो हे खरे नाही. प्रथम जो मित्राबरोबर आत गेलो तो सहजच आत गेलो. मी जर दारू प्यालेलो असतो तर त्याच दिवशी पोलिसचौकीवर गेलो असतो का ? मी प्यालेला आहे हे पाहूनच मला अटक झाली असती हे मला न समजण्याइतका मी अडाणी नाही. केवळ रात्रीचे अकरा वाजले होते म्हणून इन्स्पेक्टर म्हणाले, 'आता म्हणणे ऐकून घेतो. उद्या लेखी तक्रार घेतो.' म्हणून ती रात्र आम्ही सर्वांनी पोडला काढली आणि लगेच दुसऱ्या दिवशी लेखी तक्रार दिली. आता माझ्या भाषेबद्दल. प्रथम मी मंदिरात जाऊन बसलो तेव्हा पवळचानी मला बाहेर बोलावून 'आत बसता येणार नाही' असे सांगितले. मी म्हणालो की, 'मी माणूस आहे ना ? देवळात जनावरे गेलेली तुम्हाला चालतात आणि माणूस आत गेलेला चालत नाही का ?'

पवळे म्हणाले, 'हो हो माहीत आहे, जास्त दीडशहाणेपणा करू नकोस !'

मग मी ठरविले की आता पुन्हा आत जावयाचेच. ते केवळ हक्क म्हणून. पवळे मित्राना विचारले, 'तुमचा पाठिंबा आहे ना ?' ते म्हणाले 'आहे.' मग मी आत गेलो. तेव्हा पुन्हा मला बाहेर लोटून पवळे म्हणाले, 'अरे, ही काय तुला पढरी–आळंदी वाटली काय, कुणीही आत जाऊ शकेल असे सार्वजनिक ठिकाण ? हे खासगी मंदिर आहे समजलास ! मुकाट्याने बाहेर हो !'

हा अपमान मला सहन झाला नाही म्हणून मित्राबरोबर मी पोलिसचौकी गाठली खरे सांगावयाचे ना, तर असे आहे की, मी पोलिसाकडे तक्रार नोंदविण्याइतका धीट बनेन असे त्याना वाटतच नव्हते म्हणून त्याची मग्रुरीची भाषा होती. त्या भाषेला उत्तर देताना माझ्या तोंडूनही काही कडक शब्द गेले असतील ! मी कुठे नाही म्हणतो ? दुसऱ्या दिवशी पाच–सहा लोकाना अटक झाल्यावर मग सगळे बिथरले आणि माझ्याविरुद्ध काहीही उठवावयाला त्यानी सुरुवात केली.

**आम्ही :** अटक झालेले लोक लगेच सुटले कसे ? त्यानी नोटा सरकवल्या असतील असे काही जण म्हणतात हे खरे का ?

**गौतम केदारी :** हो, असे माझ्याही कानावर आले आहे, पण ते मला नक्की काही माहीत नाही. मी कायद्याप्रमाणे वागलो. आता न्याय नाहीच मिळाला तर काय करणार ?

**आम्ही :** बरे, पण हे आता मिटवावयास नको का ? तुझे वडील फार काळजीत आहेतसे दिसते. मिटविण्याबाबत तुला काय वाटते ?

**गौतम केदारी :** पवळयानी मला बाहेर काढण्यात चूक केली आणि येथून पुढे असे होणार नाही असे लेखी लिहून देऊन त्यानी क्षमा मागितली तर मला आडमुठेपणा करावयाची इच्छा नाही. सगळयाशी माणुसकीने वागा येवढेच माझे म्हणणे आहे.

गौतम आला होता त्या दिवशी होता सोमवार विषमता निर्मूलन समितीचे कार्यकर्ते दर सोमवारी नाना पेठेतील पालखी विठोबा चौकात असलेल्या म. फुले समता प्रतिष्ठानमध्ये जमतात व चर्चा करतात. ते गौतमने व त्याचे मित्र बाळू व विलास गोळे यानी येऊन पाहिले. आपली सारी हकीकतही जमलेल्या लोकाना थोडक्यात सांगितली आणि जातिनिर्मूलनाचे कामात तरुणाचे सहकार्य मिळवून काम करण्याची तयारी दाखविली.

*पिरगुटच्या गावकऱ्याची बैठक सतत पडणाऱ्या पावसामुळे लांबणीवर पडते आहे*

□


१५ ऑगस्टला प्रकाशित होत आहे.

चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

**प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे**

किमत वीस रुपये

**प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर**

**पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

[ टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील ग्राहकांनी वरील पुस्तक व 'आर् डॉक्युमेंट' ही कादंबरी कार्यालयातून घेऊन जावी. ]

मार्टिन ल्यूथर किंगचा खुनी जेम्स अर्ल रे च्या नाट्यपूर्ण पाठलागाची सौ. मेधा ताटके यांची 'पाठलाग' ही कथा माणूस ११ जून ७७ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर आठच दिवसांनी जेम्सने पुन्हा एकदा जगात खळबळ उडवून दिली.

# सुटकेचा आठवा प्रयत्न

सतीश कामत

शुक्रवारचा दिवस. संध्याकाळचे ६–६॥ वाजले असावेत. ब्रशी माउटनच्या तुरुंगातील दोनशे कैदी आळसात काळ घालवीत होते. हातामध्ये रायफली आणि शॉटगन्स् घेतलेले पहारेकरी सात ठिकाणी मोर्चे बांधून या कैद्यावर लक्ष ठेवून होते. शिवाय साध्या वेषातील दहा शिपाई या घोळक्यातच ठिकठिकाणी विखरून चाहूल घेत होते.

हळूहळू सध्याछाया पसरू लागल्या. वाऱ्याची आल्हाददायक झुळूक शरीराला सुखावून जात होती. अर्थात अजून त्या डोंगरामध्ये बांधलेल्या सर्वांत बंदिस्त तुरुंगात अंधाराचे साम्राज्य सुरू व्हायला किमान तास–दीड तासाचा तरी अवधी होता. १७–१८ फुटांच्या त्या दगडी भिंतीवरून उडी मारून जाण्याची हिंमत असली तर एवढा वेळ पुरेसा होता.

अचानक कुठे तरी दोन कैद्यामध्ये मारामारी सुरू झाली. इतरही अनेकजण धक्काबुक्की करीत भोवताली जमा झाले. पहारेकऱ्यानी या गर्दीतून मोठ्या मुश्किलीनेच वाट काढली आणि ते मारामारी करणाऱ्या कैद्यांपर्यंत पोचले. पहारेकऱ्यांनी परिस्थितीचा संपूर्ण ताबा घेऊन शांतता प्रस्थापित केली. इतक्यात एका कैद्याने घोटा दुखावल्याचा बहाणा सुरू केला. या गोंधळातच एक माणूस तुरुंगाच्या दगडी भिंतीकडे पळू लागला. ब्रशी माउंटनच्या पहारेकऱ्यांचे चटकन तिकडे लक्ष गेले. तुरुंगाच्या ईशान्येकडील कोपऱ्यात कैद्याचा एक लहानसा घोळका जमा झालेला होता.

त्या सातजणांना एवढा वेळ पुरेसा होता. हा सगळा गोंधळ चालू असतानाच सात कैदी तुरुंगाच्या पूर्वेकडील कोपऱ्यात एका लोखंडी शिडीवरून भिंतीवर चढत होते. भिंतीवर अठरा इंच अंतर ठेवून तेवीसशे व्होल्टेजचा विद्युत्प्रवाह सतत चालू असलेल्या उघड्या वायर्स नेलेल्या होत्या; पण तरीही सहाजणानी त्याखालून कुशीवर वळून मार्ग काढला.

शेवटचा माणूस शिडीच्या वरच्या टोकाशी पोचला असतानाच पहारेकऱ्यांनी त्याच्यावर दोन मोर्चांवरून रायफलीमधून गोळ्यांचा वर्षाव सुरू केला आणि बँकेवर दरोडे घालण्यातच आयुष्याची पस्तीस–चाळीस वर्षे घालविलेला जेरी वॉर्ड रक्ताच्या थारोळ्यात पडला; परंतु तोपर्यंत उरलेले सहाजण संध्याकाळच्या त्या अंधुक प्रकाशात ब्रशी माउटनच्या परिसरातील झाडा–झुडपाच्या आणि जाळ्यांच्या आश्रयाने पसार झालेले होते.

'सर्वांत जास्त सुरक्षित' अशी ख्याती असणाऱ्या ब्रशी माउटनच्या तुरुंगातूनच हे कैदी पळाले होते. कंबरलँडच्या डोंगरानी वेढलेला हा तुरुंग म्हणजे एक भक्कम तटबंदी असलेला स्वायत्त किल्लाच होता. म्हणूनच नव्याण्णव वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या सर्व खुन्याना आणि क्रूर गुन्हेगारांना या तुरुंगात ठेवले होते. या परिसरात राहणाऱ्या रहिवाशानाही तुरुंगाचा मोठा अभिमान. काही रहिवाशानी तर अशा तऱ्हेने तुरुंगातून पळून जाऊ पाहणाऱ्या कैद्यांचा शोध लावण्यासाठी आपल्या लाडक्या 'ब्लड-हाउंडस्'ना विशेष ट्रेनिंग दिले होते. शिवाय या परिसरातील वेली आणि जाळ्या म्हणजे विषारी सापाचे निवासस्थान. पहारेकऱ्यानी संप पुकारल्यामुळे हा तुरुंग १९७२ साली बंद करण्यात आला होता. १९७६ साली तो पुन्हा उघडण्यात आला. तुरुंगाची ही सगळी वैशिष्ट्ये माहीत असूनही डॉ. मार्टिन ल्यूथर किंग याचा खुनी जेम्स अर्ल रे याने आपलीही रवानगी या ठिकाणी करावी अशी अमेरिकन सरकारला विनंती केली आणि ती मान्यही करण्यात आली.

शुक्रवारी दुपारी ४–३० वाजता जेम्स् रे आणि त्याच्या 'ए' ब्लॉकमधील साथीदारानी डायनिंग हॉलमध्ये 'फिश सपर' घेतले. नंतर नेहमीप्रमाणे हजेरीसाठी त्याची बरॅकसमध्ये रवानगी करण्यात आली. यानंतर तासाभरातच आपल्या साथीदारासह त्याने हा पलायनाचा धाडसी प्रयत्न केला. म्हणूनच रक्तबंबाळ अवस्थेत हॉस्पिटलमध्ये नेला जात असतानाही जेरी वॉर्ड पुटपुटत होता– 'जेम्स् अर्ल रे सुटला आहे, जेम्स् अर्ल रे सुटला आहे!'

हे कळल्यावर सर्वत्र धावाधाव सुरू झाली; पण तुरुंगाधिकाऱ्याच्या असं लक्षात आलं की सात मैलांच्या परिसरातील सर्व टेलिफोन्स् तोडण्यात आले होते. एका तासातच ब्लड हाउंडस्चे एक पथक पळालेल्या कैद्यांचा मागोवा घेऊ लागलं. जसजशी रात्र वाढू लागली तसतसं काम कठीण होऊ लागलं. इतक्यात, कुठल्या तरी झुडपात खसखस ऐकू आली, पण पहारेकरी तिथं पोचेपर्यंत पुन्हा सारं शांत झालं. गुन्हेगाराचा शोध लावण्यासाठी विशेष शिक्षण दिलेली माणसं एव्हाना येऊन पोचली होती. ॲटर्नी जनरल बेलच्या मार्गदर्शनाखाली एफ्. बी. आय्. चे पच्यात्तर एजंटस् ब्रशी माउटनचा परिसर धुंडाळू लागले. एव्हाना रात्र बरीच झाली होती. अशा तऱ्हेने कोणी माणसं जंगलात एखाद्या ठिकाणी जर खरच लपलेलो असली तर त्यांच्या श्वासोच्छ्वासामुळे हवेच्या तपमानात होणारा बदल नोंदवू शकणारी यंत्रणा

असलेली पाच हेलीकॉप्टर्स तुरुंगाच्या भोवताली असणाऱ्या डोंगरामध्ये खोलवर सूर मारीत घिरट्या घालू लागली.

ब्रशी माउंटनच्या ईशान्येला आठ मैलावर एक माणूस भराभर पावलं उचलत चालत होता शनिवारी दुपारी दीडच्या सुमार होता. तपासाला सुरुवात होउन सोळा-अठरा तास उलटून गेले होते. एक हेलीकॉप्टर नेमकं त्याच भागावर चकरा मारू लागलं हेलीकॉप्टरमधील अधिकाऱ्याने दुर्बिणीतून हा माणूस पाहिला आणि लगेच एफ् बी आय्. कडे संदेश पाठविला. हत्यारबंद शिपायांनी खच्चून भरलेली एक जीप ताबडतोब त्या दिशेने धावू लागली. त्या माणसाला पकडलं गेलं त्यानं कोणताच प्रतिकार केला नाही. परंतु नंतर असं लक्षात आलं की हा माणूस म्हणजे सत्तावीस वर्षांचा डेव्हिड पॉवेल होता. तो जेम्स अर्ल रेच्या ब्लॉकमधलाही नव्हता. केवळ काही माणसं शिडीवरून चढताना दिसली म्हणून तोही त्यांच्यात सामील होऊन पळाला होता.

रविवारी पहाटे दोन-अडीचच्या सुमारास तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी तुरुंगाच्या पूर्वेला चार मैलावर हॅंकरला पकडलं. त्या पळून गेलेल्या सात जणांपैकी हा आणखी एक; पण अजूनही जेम्स अर्ल रे सापडला नव्हता. ब्रशी माउंटनच्या परिसरात हेलीकॉप्टर्स रागाने गुरगुरत भिरभिरतच होती.

## डॉ. किंग यांच्या खुनाचा कट शिजला होता काय ?

जेम्स् अर्ल रेच्या या नाट्यमय पलायनामुळे डॉ मार्टिन ल्यूथर किंग यांना त्याने एकट्यानेच मारलं की एखादी टोळी किंवा संघटना या खुनामागे होती याविषयीच्या वादाला नवं स्वरूप प्राप्त झालेलं आहे. मेंफिस कोर्टामध्ये त्याच्याविरुद्ध आरोप सिद्ध झाल्यामुळे न्या. डब्ल्यू प्रिस्टन बॅटल यांनी त्याला १० मार्च १९६९ रोजी नव्याण्णव वर्षे तुरुंगवासाची शिक्षा फर्मावली.

पण डॉ. किंग यांना आपण स्वतःच गोळी घातली असं या मेंफिसच्या न्यायालयासमोर सांगणाऱ्या रेने नंतर मात्र असं म्हणायला सुरुवात केली की टेनेसीचे ॲटर्नी जनरल फोरमन, U. S.चे ॲटर्नी जनरल रॅम्से क्लर्क आणि एफ. बी. आय.चे प्रमुख जे. एडगर हुव्हर या तिघांनी या खुनामागे कट नाही असा जो निष्कर्ष काढलेला आहे तो आपल्याला मुळीच योग्य वाटत नाही. अर्थात यावर अधिक काही बोलायलाही त्याने नकार दिला. रेने न्यायालयीन चौकशीची मागणी केल्यावर फोरमनने त्याला असा सल्ला दिला की, तूर्त तरी त्याने आपला गुन्हा मान्य करावा. कारण अन्यथा उपलब्ध पुरावा आणि जनतेचा रोष यामुळे त्याला फाशीचीच शिक्षा होईल तरीही आपण 'राउल' या लॅटिन माणसाबरोबर खुनाच्या कटात भाग घेतल्याचं रे बडबडू लागला. इतकच नव्हे तर ज्या ३००६ जातीच्या रेमिंग्टन बंदुकीच्या एकाच गोळीने डॉ. किंग यांना मृत्यू आला ती बंदूक आपण हाताळलीच नाही असही तो सांगू लागला. न्यायालयाच्या खास अन्वेषणविभागाने मात्र, हे कृत्य रे याने एकट्यानेच केले असल्याचा दावा केला आहे; पण त्याचबरोबर सबळ पुरावा नसला तरी या खुनामागे कट असण्याची शक्यताही नाकारता येत नाही,

---

## यापूर्वी....

१. १९४८ सालच्या ऑक्टोबरमध्ये दारू पिण्याबद्दल रेला अटक झाली होती. त्या वेळी त्यानं पलायनाचा पहिला प्रयत्न केला.

२. १५ डिसेंबर १९५९ साली सेंट लुइसमधील न्यायालयीन बिल्डिंगमधून एका अधिकाऱ्याला जोरात बाजूला ढकलून पळून जाण्याचा प्रयत्न केला; पण एका पोलिसाने त्याला बंदूक रोखून अडविले.

३. मिसोरी स्टेटच्या तुरुंगातून १९ नोव्हेंबर १९६१ साली भितीवरून उडी मारून पळून जाण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

४. याच तुरुंगातून १० मार्च १९६६ साली रेने पुन्हा एकदा प्रयत्न केला. या वेळी त्याने आपली एक 'डमी' बिछान्यामध्ये ठेवून दिली. नंतर एका पाइपाच्या आधारे त्याच्या कोठडीच्या भिंतीवरून खिडकीपर्यंत पोचला. खिडकीची लोखंडी जाळी त्याने वायर्स कापायच्या कात्रीने कापून काढली. या जाळीला लागूनच असलेल्या लोखंडी बारमधून रेने रांगत रांगत मार्ग काढला व व्हेन्टिलेटर्सपर्यंत पोचला. त्या ठिकाणी तो दुसऱ्या दिवशी रात्रीपर्यंत लपून राहिला. परंतु जेव्हा तिथून बाहेर पडून रे पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा तुरुंगाच्या पहारेकऱ्यांनी त्याला धरलं.

५. २३ एप्रिल १९६७ साली रेने असाच एक धाडसी प्रयत्न केला. तो स्वत असं म्हणतो की तो एका पाण्याच्या पाइपवरून चढून गेला आणि चोरलेल्याच लोखंडी हुकाचा वापर करून रेने स्वतःला तुरुंगाच्या भिंतीपलीकडे झोकून दिलं. तुरुंगाच्या अधिकाऱ्यांच मात्र म्हणणं असं आहे की रे अशा तऱ्हेने पळाला नाही तो एका ब्रेड नेणाऱ्या हातगाडीमध्ये लपून बसला आणि तिच्यामधूनच बाहेर गेला ती हातगाडी एका ट्रकमध्ये चढविली गेली आणि रेने एक यशस्वी पलायन केलं.

६. ३ मे १९७१ रोजी रेने ब्रशी माउंटनच्या तुरुंगातील पलायनाचा पहिला प्रयत्न केला ( या तुरुंगातून त्याने असे एकूण तीन प्रयत्न केले ) याही वेळी रेने आपली एक 'डमी' कोठडीत ठेवून दिली आणि त्याच्या एका मित्राने पुरविलेली हत्यारे वापरून एक सिमेंटचा लहानसा चौरस बाजूला सरकविला आणि रांगत रांगत एका Air chamber मध्ये शिरला. तेथून व्हेन्टिलेशन फॅनचे बार हिसका देऊन तोडले आणि रे तुरुंगाच्या आवारात उतरला. नंतर एक बाकदार बार वापरून वाफेचा पाइप उघडला. त्या पाइपमधून बाहेर जाता येत होतं; पण पाइपमधील ४००° सेंटिग्रेड उष्णतेने त्याला परत फिरविलं

७. याच ब्रशी माउंटनच्या तुरुंगातून ५ फेब्रुवारी १९७२ रोजी रेने पलायनाचा दुसरा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने एक हातोडा आणि करवत पैदा केली आणि खोलीच्या लाकडी सिलिंगला भगदाड पाडून पळून जाण्याचा तो प्रयत्न करू लागला. ही खोली तुरुंगातील सिनेमागृहाला लागूनच होती आणि रेची 'कामगिरी' संपण्याआधीच सिनेमा संपला आणि रे पुन्हा पकडला गेला.

याच तुरुंगातून आता रेनं तिसरं यशस्वी पलायन केलेलं आहे. ✱

अशीही एक पुस्ती त्यांनी जोडली. कारण त्यांच्या मते जेम्स अर्ल रेसारखा माणूस हे सर्व एकट्यानें करून, लंडनला पळून जाणे शक्यच नव्हते. त्याला नक्कीच कोणाची तरी साथ असली पाहिजे. या परस्परविरोधी विधानांमुळे गोंधळात अधिकच भर पडली. ब्रशी माउंटन या तुरुंगाचा वॉर्डन स्टोनी लेन याचंही मत या ठिकाणी लक्षात घेतलं पाहिजे. तो तर असं म्हणतो की, या पलायनाच्या योजनेत तुरुंगातील अधिकारी किंवा नोकर-वर्गापैकीच कोणी तरी सामील असावं. लेन पुढे म्हणतो, 'मला हे समजत नाही की पहारेकऱ्यांनी रेवरच गोळी का झाडली नाही? तो तर अगदी सुरुवातीलाच होता.' लेनची याबाबतीत तर अगदी खात्रीच आहे की तुरुंगापासून अवघ्या पाव मैलावर असलेल्या रूट नं. ११६ या रस्त्यावर कोणी तरी या पळून जाणाऱ्या कैद्याची वाट पहात सज्ज राहिलं असलच पाहिजे. त्याशिवाय हा असा भिंतीवरून उडी मारून जाण्याचा धाडसी प्रयत्न त्यांनी केलाच नसता.

याशिवाय आणखी एक प्रश्न निर्माण होतो तो असा की, २३ एप्रिल १९६७ साली जेफर्सन येथील मिसौरी स्टेटच्या तुरुंगातून पळाल्यापासून तो ८ जून १९६८ साली लंडनच्या हिथ्रो विमानतळावर पकडलं जाईपर्यंतच्या सुमारे वर्षभराच्या काळात विमानप्रवासाला आणि इतर खर्चाला लागणारा पैसा रेला कोणी पुरविला?

जेम्स अर्ल रेचा चरित्रकार विल्यम ब्रॅडफोर्ड हृयू याला तुरुंगातून लिहिलेल्या पत्रामध्ये तो म्हणतो की, मिसौरी तुरुंगातून पलायन केल्यानंतर मॉंट्रिअलला बारमध्ये त्याला एक माणूस भेटला व त्यानंतर सर्व काही रेने या माणसाच्याच मार्गदर्शनाखाली केले. रे पुढे असेही म्हणतो की 'राउल' या लॅटिन माणसाने त्याला कॅनडा आणि मेक्सिकोतून स्मगलिंग करून त्यामधून बर्मिंगहॅमहून एक गाडी आणि एक रायफल घ्यायला सांगितले आणि नंतर मेंफिसला जाऊन डॉ. किंग ज्या हॉटेलात उतरला होता त्या लॉरेन मोटेल या हॉटेलच्या बरोबर समोरच्या हॉटेलमध्ये तळ ठोकायला सांगितले. रेने या पत्रामध्ये एक जबरदस्त धक्का दिलाय. तो म्हणतो, 'जेव्हा मार्टिन ल्यूथर किंगवर गोळी झाडली गेली तेव्हा मी माझ्या हॉटेलमधील खोलीतसुद्धा नव्हतो. मी आपल्या मोटारीला नवीन चाक बसवीत होतो. बहुतेक राउलनेच ती गोळी झाडली असावी.'

रिचर्ड स्प्राग या फिलाडेल्फियाच्या नामांकित प्रॉसिक्युटरने रेची तुरुंगामध्ये तीनदा मुलाखत घेतली आणि नंतर तो अशा निष्कर्षाप्रत आला की– राउल नावाची कोणी व्यक्ती अस्तित्वातच नाही आणि नव्हतीही.' विल्यम हृयू या रेच्या चरित्रकारानेही 'He Slew the Dreamer' या आपल्या पुस्तकात रेने आपल्याला फसविल्याचे कबूल केले आहे.

पण तरीही हे कृत्य करण्यामागे रेचा उद्देश काय असावा याविषयी कोणीच समाधानकारक उत्तर देऊ शकलेला नाही. जॉर्ज मॅकमिलन या गुन्हेगारीच्या क्षेत्रातील वार्ताहराने मात्र रेचे तुरुंगातील साथीदार आणि नातेवाईक यांच्या सात वर्षे गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी चर्चा केल्यावर एक निराळाच मुद्दा उपस्थित केला आहे. रेच्या तुरुंगातील साथीदारानी 'रे वंशवादी होता' इतकंच नव्हे तर 'या big nigger' ला मारण्याची प्रतिज्ञाही तो वारंवार करीत होता अशी माहिती दिली. त्याचप्रमाणे तुरुंगात 'नानाविध उद्योग' करून रेने ६५०० डॉलर्स मिळविल्याचेही मॅकमिलनने धडकीला आणल आहे. हे जर खरे असेल तर रेला आर्थिक मदत कशी मिळाली याचेही उत्तर आपोआपच मिळते.

काही वार्ताहरांनी रेच्या विमानप्रवासाच्या पद्धतीबद्दल असा शोध लावला आहे की कॅनडामध्ये असताना रे तेथील टोरोन्टो लायब्ररीत जुनी वर्तमानपत्र चाळून त्यातील जन्मनोंदणीच्या कॉलममधून त्याच्या स्वत.च्या वयाशी वय जुळणाऱ्या माणसाची नावं शोधून काढीत असे आणि तेच नाव पासपोर्टवर ठोकून देत असे. अर्थात आपण ज्या नावावर पासपोर्ट घेत आहोत त्या नावे यापूर्वी पासपोर्ट दिला गेलेला नाही ना याचीही खबरदारी रे ही टोपणनावे वापरताना घेत असे.

अर्थात हे सगळे तर्क–वितर्क इतरानी लढवीत बसण्यापेक्षा जेम्स अर्ल रेने स्वतःच या सबंध प्रकरणाची सत्यत हकीकत सांगितली असती तर ते अधिक सोयीचे झाले असते; पण पुन्हा त्याच्या या सांगण्यावर तरी विश्वास कोणी ठेवावा? □

('टाईम' वरून)

---

## मनात एकच विचार

जेम्स् अर्ल रेनं हे पलायन करण्यापूर्वी दोनच आठवडे मार्श–व्हॅन्डेन बर्ग या वार्ताहराने त्याची मुलाखत घेतली होती. तो सांगतो –

His grammar was bad, but his mind was 'clever and cunning.' तुरुंगातील इतर कैद्यांपेक्षा रे स्वतःला अधिक स्मार्ट समजत असे आणि त्याचं असं म्हणणं होतं की केवळ स्वतःच्याच मूर्खपणामुळे तो अशा तऱ्हेने तुरुंगात अडकला होता. त्याला तुरुंगात मिळणाऱ्या मोकळ्या वेळापैकी बराचसा वेळ तो त्याच्या केसशी संबंधित अशी कायद्यावरील पुस्तके आणि कोर्टाची कागदपत्रे वाचण्यात घालवीत असे. हे वाचून कंटाळा आला की तो व्हॉलीबॉल खेळात असे किंवा वेट लिफ्टिंग करीत असे. त्याचं वाचनही सूक्ष्म आणि सखोल होतं. नुकतीच त्याने प्राण्यावर कंट्रोल कसा ठेवावा आणि त्यांच्याशी सधान कसे साधावे, विद्युतउपकरणं कशी हाताळावीत यासारखी पुस्तके वाचली होती. इतकच नव्हे तर हिप्नॉटिझमवरचीही दोन पुस्तके रेने पलायनापूर्वी काही दिवस आधी वाचून काढली होती. या पलायनापूर्वी काही क्षण आधीसुद्धा रे कोणत्याही प्रकारे अस्वस्थ झाला नव्हता. त्याचा वकील म्हणतो की त्या वेळी तो नवीन न्यायालयीन चौकशीसंबंधी मोठ्या आशावादीपणाने बोलत होता. एका ब्राझीलिअन टेलिव्हिजनवर त्याने मुलाखतीचाही कार्यक्रम ठरविला होता. मॅकमिलन म्हणतो–

तुरुंगाची वीट अन् वीट बारकाईने पहात राहणारा, भिंतीतील भेगा शोधत राहणारा आणि पाइपमधील कच्चे दुवे शोधीत राहणारा जेम्स अर्ल रे जरी कायदा आणि कोर्ट–कचेऱ्यांसंबंधी विचार करीत असला, तरी मनातल्या मनात, कुठे तरी तो सतत पलायनाचाच विचार करीत असावा.

*

---



# नक्षलवादाच्या शोधात

लेखांक सहा

## कायदा, न्याय आणि नक्षलवाद

शिरीष सहस्रबुद्धे । चंद्रशेखर पुरंदरे

नक्षलवादी चळवळ दडपून टाकण्याच्या यंत्रणेचे सूत्रधार मानले जाणारे आंध्रचे डी. आय. जी. (इंटेलिजन्स) विजय रामा राव यांच्या मुलाखतीतील महत्त्वाचा भाग यापूर्वीच्या लेखांकात विस्ताराने दिलेला आहेच. तथापी त्यांनी मांडलेल्या आणि मागे विशेषत्वाने न उल्लेखिलेल्या एका मुद्द्यामुळे नक्षलवादी चळवळीची कायदा व न्यायाच्या संदर्भातील बाजू तपासण्याची इच्छा व संधीही निर्माण झाली. नक्षलवाद्यांना अटक करून न्यायासनासमोर उभे करणे व त्यांचे अपराध सिद्ध करून त्यांना शिक्षा देवविणे हे अतिशय जिकिरीचे काम असल्याचे सांगून श्री. विजय रामा राव यांनी पोलिसांना या कामात येणाऱ्या अडचणींचे वर्णन केले. मुळात नक्षलवाद्यांची उठाव करण्याची पद्धती ही गनिमी काव्याची असल्याने त्यांच्या गैरकृत्यांचा परिस्थितिजन्य पुरावा व प्रत्यक्ष साक्षीदार (आयविटनेस), उपलब्ध होणे कठीण जाते. चार लोकांनी रात्री अंधारात हल्ला करून गावच्या जमीनदाराला पळवून नेलं आणि जंगलात नेऊन ठार मारलं तर त्या कृत्याचा साक्षीपुरावा किती व कसा मिळणार? त्यातून थोडाफार पुरावा किंवा एखादा आयविटनेस मिळालाच, तरी नक्षलवादी मूळ नावाखेरीज एक किंवा दोन टोपणनावांखालीही वावरत असल्याने त्यांच्यावर खटले भरणे अडचणीचे होऊन बसते. तपासाच्या काळात साक्षीदार जिवाच्या भीतीमुळे किंवा क्वचित नक्षलवाद्यांबद्दलच्या अस्थानी सहानुभूतीमुळे उलटण्याची शक्यताही नाकारता येत नाही, वगैरे वगैरे. अशाही अडथळ्यांतून वाट काढून नक्षलवाद्यांना न्यायालयात खेचण्याचे गुंतागुंतीचे ध्येय पोलिसांनी धडाक्याने साध्य केल्याची प्रौढीही विजय रामा राव व पी. रामचंद्र रेड्डी यांनी सांगितली, त्यामुळे चळवळीची त्या पैलूबद्दल अधिक काही जाणून घेण्याची उत्सुकता वाढू लागली. विशेषत: पोलिसांच्या कर्तृत्वाची निशाणी म्हणून ज्या कॉन्स्पिरसी केसेस् (कटाचे खटले)चा उल्लेख विजय रामा राव यांनी केला होता, त्यांची दुसरी बाजू जाणून घेणे जरुरीचे होते. सुदैवाने 'हैदराबादच्या इंडियन एक्स्प्रेस'च्या आवृत्तीचे वार्ताहर श्री. सोमेश्वर राव यांच्या मदतीमुळे तशी संधी मिळाली. नक्षल-

वाद्यांवरील खटले लढविणारे सिकंदराबादचे अॅडव्होकेट श्री सी. वेंकटकृष्ण याचा पत्ता श्री. सोमेश्वर राव यांनी दिला. स्वतः श्री. राव दीर्घकाळ महाराष्ट्रात राहिलेले आहेत. ' मदरलँड 'चे प्रतिनिधी म्हणून नागपूरमध्ये त्यांनी काम केलेले आहे. चाळिशीच्या या गृहस्थामध्ये पचविशीला शोभेल अशी तडफ आणि व्यक्तिमत्त्वही आहे. आजपर्यंत पुष्कळ वार्ताहर-पत्रकारांना भेटण्याचा व परिचयाचा योग आलेला आहे, पण त्यात सोमेश्वर रावसारखे तल्लख व चपळ बुद्धीचे व आर्जवी, ऋजुस्वभावी पत्रकार हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच सापडतील. आंध्रच्या (व बाहेरच्याही) राजकारणाचे अत्यंत सखोल ज्ञान, स्पष्टवक्तेपणा आणि आपल्या व्यवसायाबद्दल प्रखर निष्ठा व प्रेम हे त्यांचे विशेष सहज बोलतानाही जाणवले. नक्षलवाद व आंध्रातील अंतर्गत विचारप्रवाह, राजकारणाचे धागेदोरे यांच्या संदर्भात त्यांच्याकडून बरीच उपयुक्त माहिती मिळाली, ती लेखमालेत इतरत्र वापरली जाईलच.

श्री. राव यांनी ज्यांच्याविषयी माहिती दिली ते श्री सी. वेंकटकृष्ण सिकंदराबाद स्टेशनपासून अगदी जवळच एका जुनाट घरात राहतात. वकीलसाहेबांनी नक्षलवाद्यांचे खटले लढवायचे काम जीवननिष्ठा म्हणूनच स्वीकारल्याच्या खाणाखुणा त्यांच्या बोलण्यातच नव्हे तर घरादारावरही ठळकपणे दिसतात नक्षलवाद्यांना कायद्याचं संरक्षण उपलब्ध करून देत असल्याच्या अपराधाची बरीच झळ त्यांना आणीबाणीत बसल्याचे कळले. मात्र ते स्वतः त्याबद्दल काही सांगायला राजी नव्हते. त्यांच्या घरी त्यांच्या आधी वेणुगोपाळ नावाच्या तरुणाची ओळख झाली. आंध्र युनिव्हर्सिटीची एम. एस्सी. पदवी केमिस्ट्री विषयात पहिल्या वर्गात मिळविलेला हा काळासावळा पण स्मार्ट तरुण गेली सहा वर्षे बेकारच आहे. १९७१ मध्ये मिळालेली एक नोकरी अल्पकाळातच सुटली तेव्हापासून. कारण ? नक्षलवाद्यांचा सहप्रवासी व नक्षलवादाचा सहानुभूतिदार असल्याचा संशय आणि सी. वेंकटकृष्णाचा जावई असल्याचा पुरावा. कांग्रेसी दडपशाही जोरात होती, तेव्हा ' अशा गुन्हेगारांना ' बेकारच ठेवण्याचा बंदोबस्त झालेला होता, असे वेणुगोपाळचे म्हणणे. त्याला पुरावा म्हणून त्याने काही उदाहरणेही दिली. दोन मुले असलेला वेणुगोपाळ सध्या आपल्या सासऱ्याच्याच घरी राहून त्यांच्या ओ. पी. डी. आर च्या कार्यात (या संस्थेची ओळख याच लेखाकाच्या उत्तरार्धात होईलच. ) त्यांना हातभार लावीत असला तरी, आत्ता मात्र दिल्लीला नोकरी मिळायची शक्यता निर्माण झालेली आहे.

स्वतः श्री. वेंकट कृष्ण पन्नाशी कधीच ओलांडलेले आणि बऱ्यापैकी उजळ वर्णाचे, तरतरीत नाकाचे व मृदु व्यक्तिमत्त्वाचे साधे गृहस्थ आहेत. केस बहुसंख्येने पांढरेपणाकडे झुकलेले. हलक्या आवाजात सफाईदार इंग्लिश बोलणाऱ्या या वकिलाचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पुण्यातच झालेले आहे, हे ऐकून सानंद आश्चर्य वाटले पुणेरी नावांच्या आठवणी आता अंधुक झालेल्या असल्या तरी त्यांनी दिलेल्या माहितीवरून ते प्रथम ऑर्नेलाज हायस्कूल व नंतर पुना इंग्लिश स्कूल ( सरस्वती मंदिरचे ) विद्यार्थी असावेत असा आम्ही तर्क केला. मॅट्रिकनंतर मात्र कौटुंबिक अडचणीमुळे त्यांना हैद्राबादला स्थायिक व्हावे लागले. नक्षलवाद्यांना न्याय मिळवून देण्याच्या प्रयत्नात त्यांनी खूप काही गमावलेले आहे. आपली एरवीची प्रॅक्टिससुद्धा. वेंकटकृष्ण व वेणुगोपाळ या दोघांनीही एकीकडे खूपच आस्थेवाईकपणे तर दुसरीकडे शक्य तितकी तटस्थ सावधगिरी राखण्याचा प्रयत्न करीत नक्षलवादी चळवळीच्या legal aspect विषयी बरीच माहिती दिली. चळवळीला त्यांची सहानुभूती असल्याचे आम्हाला स्पष्ट जाणवत असले, तरी त्यांचा पवित्रा मात्र ' आम्हाला एकंदर सगळ्याच जुलमाविरुद्ध लढा द्यावयाचा आहे. आम्ही फक्त नक्षलवाद्यांनाच बांधले गेलेलो नाही ' असा होता. अर्थात तार्किक दृष्ट्या व तात्त्विक दृष्ट्या तो रास्तच म्हणावा लागेल.

' नक्षलवादी चळवळ, सशस्त्र लढा या अर्थाने पाहिले तर आता जवळजवळ संपलेलीच आहे निदान श्रीकाकुलम परिसरातली चळवळ तरी पूर्णपणे थंडावल्याची माझी खात्री आहे अर्थात सरकारने केलेली भयंकर दडपशाही हेच त्यामागचे कारण आहे ', अशी आपली भूमिका प्रारंभीच स्पष्ट करून वेंकटकृष्ण यांनी सरकारी दडपशाहीचा तपशील दिला. तो नवीन नसला तरी महत्त्वाचा होता. कारण श्री. वेंकटकृष्ण ' सरकारने न्यायाला फासलेला काळिमा ' अशा दृष्टिकोनातून हा तपशील मांडणार होते. त्यातला पहिला मुद्दा येतो तो अर्थातच बनावट चकमकींचा. दुसरा बनावट खटल्यांचा. वेंकटकृष्ण यांच्या माहितीप्रमाणे ही दोन हत्यारे वापरून सरकारने प्रथमत चळवळीच्या नेत्यांचा निकाल लावला व पर्यायाने अनुयायांना नामोहरम केले. १९६८ पासून अगदी १९७६ पर्यंत वेंकटापूसत्यम्, आदिभट कैलासम्, दुप्पल गोविंदराव, एन्ड्रू रॉय, पंचादि कृष्णमूर्ति, पंचादि निर्मला, डॉ. चागेटी भास्करराव, डॉ. मल्लिकार्जुन, पी. रामनरसय्या, सुब्बाराव पाणिग्रही आणि बत्तुल वेंकटेश्वर राव अशा प्रथमश्रेणीच्या नक्षलवादी नेत्यांना चकमकीच्या नावाखाली कंठस्नान घालण्यात आले. डी व्ही. ऊर्फ देवुलापल्ली, वेंकटेश्वर राव, चौधरी तेजेश्वर राव, सपूर्णाम्मा राव, हेमचंद्र पाणिग्रही अशा काही नेत्यांना कटाच्या खटल्यात गुंतवून दीर्घ मुदतीच्या तुरुंगवासाच्या शिक्षा देवविण्यात आल्या. चौधरी तेजेश्वर राव व त्यांची पत्नी सपूर्णाम्मा हे दोघेही सध्या अनुक्रमे विशाखापट्टणम व रामहेंद्री सेन्ट्रल जेलमध्ये चार व तीन जन्मठेपेच्या शिक्षा भोगीत आहेत. प्रमुख नेत्यापाठोपाठ उरलेल्या पुढाऱ्यांना व लढाऊ अनुयायांनाही याच प्रकारच्या दडपशाहीला बळी पडावे लागल्यामुळे साहजिकच चळवळीचा जोर ओसरत चालला. कारण संख्या व शस्त्रबळात नक्षलवादी पोलिसांना पुरून उरण्यासारखे नव्हतेच. एक कायदेतज्ज्ञ या नात्याने वेंकटकृष्णाचा मुद्दा असा की नक्षलवादी विध्वंसक व देशद्रोही आहेत की नाही अथवा त्यांचे लढा देण्याचे मार्ग समर्थनीय आहेत की नाहीत हा प्रश्न नसून सरकारने त्यांचे बेकायदेशीर मार्गांनी उच्चाटन करावे काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सरकारला या चळवळीचा बीमोड करायचा असेल तर त्यासाठी न्याय्य उपाय नक्षलवाद्यांना चकमकीच्या बुरख्याखाली गोळ्या घालणे हा नसून एकीकडे ज्या परिस्थितीमुळे ही चळवळ उभी राहिली ती परिस्थिती सुधारणे आणि दुसरीकडे गुन्हेगार नक्षलवाद्यांना त्यांच्यावरील आरोप न्यायालयात सिद्ध करून शिक्षा देवविणे हाच आहे. रामन राघवनसारख्या निष्कारण वीसबावीस हत्या करणाऱ्या पिसाट गुन्हेगारासही आपल्या बचावाच्या सर्व कायदेशीर तरतुदींचा लाभ जर देण्यात

येतो तर लोकलढे संघटित करणाऱ्या राजकीय गुन्हेगारांनाही तशी संधी का मिळू नये, हा त्याचा प्रश्न विचार करायला लावणारा आहे नक्कीच. पोलिसाना अशा चकमकीचे सोयिस्कर शस्त्र एकदा हाती मिळाल्यानतर कायदेशीर इलाजाचा अवघड मार्ग स्वीकारण्याचे कारणच उरले नाही. तेव्हा थोडक्यात सागायचे तर म्हातारी मेल्याचे दु.ख नक्कीच आहे; पण त्याचबरोबर ' काळ सोकावतो ' ही भीती त्याहीपेक्षा मोठी आहे. पोलिसाच्या हातात असे अमोघ शस्त्र देऊन ठेवणे धोक्याचे नाही काय ? कायद्याच्या रक्षकानाच त्याचे उल्लघन करण्याचा परवाना दिल्यासारखेच हे कृत्य आहे असे वकीलसाहेबांना वाटते.

पोलिसाच्या मागे एखादी अधिक ताकदवान अशी संरक्षक शक्ती उभी असल्याखेरीज त्याना अशी कृत्ये करण्याचे धाडस होणार नाही अशी वेंकटकृष्णांची खात्री आहे. या शक्तीचा नामनिर्देश त्यानी केला नसला तरी आध्रचे मुख्य मंत्री श्री. वेगल राव याचेच नाव त्याच्या मनात होते असे आम्हाला स्पष्टपणे वाटले. अर्थात ही गोष्ट कुणालाच दुराव्याने सिद्ध करता येण्यासारखी नाही हेही खरे. १९६७ मध्ये पचादि कृष्णमूर्ती यांना सोनपेट येथे अटक झाल्यानतर पोलिसांनी ' वर ' संपर्क साधला, तेव्हा त्याना ठार मारण्याची परवानगी ' वरून ' (गृहखात्याकडून ?) मिळाली. त्यानुसार त्याना जगलात नेऊन गोळी घातली गेली आणि चकमक घडल्याची बातमी प्रसृत करण्यात आली. तिथपासून हे चकमकसत्र सुरू झाले आणि म्हणून तिथपासूनच्या सर्वच चकमकीच्या सत्यासत्यतेची नि पक्षपाती न्यायालयीन चौकशी केंद्रसरकारनेच केली पाहिजे अशी वेंकट-कृष्णाची मागणी आहे. या चकमकीचा बनावटपणा न्यायालयात कसा सिद्ध करता येईल या प्रश्नाची उकल करण्याचे व त्यासाठी पुरावे गोळा करण्याचे काम सध्या ते करीत आहेत. एक-दोन आधाराचा उल्लेखही त्यानी केला उदाहरणार्थ आजपर्यंत झालेल्या चकमकीपैकी तब्बल तीस चकमकीत एकही पोलिस किंवा अधिकारी जखमी सुद्धा झाल्याची नोद नाही. व्यवहारत हे कितपत शक्य वाटते ? नक्षलवादी पोलिसावर हल्ले करतात ( असा पोलिसाचा दावा ) ते काय त्याना ओरखडाही न काढता आपली कत्तल करून घेण्यासाठीच ? दुसऱ्या एका चकमकीच्या प्रसगात ' ठार झालेल्या नक्षलवाद्याकडे सापडलेली ' म्हणून जी हत्यारे पोलिसानी न्यायालयासमोर सादर केली, त्याची तपासणी सरकारच्याच ॲम्युनिशन एक्सपर्टकडून करविली असता ती निकामी झालेली असल्याचे आढळून आले एकही बदूक चालू नसतानाही ' नक्षलवाद्यानी गोळीबार केल्याचा ' आरोप करून पोलिसानी त्याना गोळ्या घातल्या होत्या!

अर्थात गोळ्या घालणे रोजच्यारोज व यच्चयावत सर्व नक्षलवाद्याच्या बाबतीत शक्य नसल्याने पोलिसानी इतरही काही उपाय शोधून काढले आहेत. उदाहरणार्थ, नक्षलवाद्याना एखाद्या घरात, त्याच्या आश्रयस्थानी पकडले जाते, पोलिसाकडचीच काही जुनी बेनाम शस्त्रे त्याच्या अंगाखाद्यावर लटकविली जातात व धाकदपटशाने पच गोळा करून नक्षलवाद्याना आर्म्स ॲक्टखाली अडकविले जाते एखाद्या महत्त्वाच्या नक्षलवाद्याला अटक झाल्यानंतर बनावट पचनामे व खोटे साक्षीदार उभे करून त्याच्यावर अनेक खटले भरले जातात, ज्यायोगे एखाद्या तरी कलमाखाली त्याला थोडीशी तरी शिक्षा व्हावी व त्याचा चळवळीतील दुवा तुटावा अनेक वेळा असे खटले खोटे ठरवून कोर्टाने निकालात काढले आहेत. सी. वेंकटकृष्ण यानी स्वत.ही असे काही खटले चालविले आहेत. पुरावा म्हणून त्यानी काही आकडेवारीच समोर माडली. ऑगस्ट १९७० पासून जून १९७७ अखेर आध्रप्रदेशातील राजबंद्याची सख्यात्मक माहिती देणारे हे कोष्टक कोर्टाने निर्दोष म्हणून सोडलेल्या आरोपिताची सख्या प्रचड असल्याचे दर्शविते यात नक्षलवाद्याव्यतिरिक्त इतरही आरोपित असणे शक्य आहे ( ही आकडेवारी ' दिशाभूल करणारी ' म्हणून डी. आय. जी. श्री. विजयरामा राव यानी नाकारली असल्याचेही येथे नमूद केलेच पाहिजे. मात्र त्यानी सत्य आकडेवारी देण्यास सरकारी गोप्यविषयक नियमामुळे असमर्थता दर्शविली

| कालखड | पकडलेल्या संशयितांची संख्या | शिक्षा झालेल्याची सख्या | निर्दोष ठरलेल्यांची सख्या |
|---|---|---|---|
| ३० ऑगस्ट १९७० ते २१ जुलै १९७३ | ६४३ | १२७ | ५१६ |
| २८ सप्टेंबर १९७३ ते ६ मे १९७४ | ११५ | १४ | १०१ |
| ६ मे १९७४ ते २१ फेब्रुवारी १९७६ | ८५ | ९ | ७६ |
| २२ फेब्रुवारी १९७६ ते २ मे १९७७ | १४६ | २२ | १२४ |
| ३ मे १९७७ नतर | २२९ | ४६ | १८३ |
| एकूण | १२१८ | २१८ | १००० |

२ मे १९७७ पर्यंत मिळालेल्या माहितीनुसार विशाखापट्टणमला ९८ खटल्याचे कामकाज पूर्ण झाले होते. तसेच एन्विनपेटच्या खास मॅजिस्ट्रेटने ४० खटले चालविले होते व त्यामधील आरोपीची एकूण सख्या ४०० होती खटल्यानतर बहुसख्य आरोपीना जास्तीत जास्त सहा आठवड्यापर्यंतच्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. तथापि नोद घेण्यासारखी बाब म्हणजे अशी शिक्षा होण्यापूर्वी चालू खटल्यातील आरोपी म्हणून त्या सर्वांना किमान चार ते पाच वर्षे तुरुगात खितपत पडावे लागले होते !

नक्षलवाद्याचा बीमोड करण्यासाठी सरकार व पोलिसखाते यानी सगनमताने कायद्याचा गैरफायदा घेतल्याचे एक उदाहरणही श्री. वेंकटकृष्ण यानी दिले. आध्र सरकारने मुख्यत श्रीकाकुलम व इतर काही प्रदेशातील विशिष्ट टापू ( जेथे नक्षलवादी चळवळीचा जोर

## म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो....

अधिक होता.) 'disturbed areas' म्हणून जाहीर केले. आंध्र-प्रदेश असंतोषविरोधी कायदा (१९४८) (Andhra Pradesh Suppression of Disturbances Act (1948) या कायद्याचा अमल तेथे लागू आहे व त्यान्वये मिळालेल्या जादा अधिकारानुसार सरकारने या भागातील पोलिसठाण्यांची संख्या बेसुमार वाढविली व संशयित नक्षलवाद्याबरोबरच त्यांच्या संशयित सहानुभूतिदारांचाही छळ करावयास सुरुवात केली (याचा तपशील पहिल्या, तिसऱ्या व चौथ्या लेखांकात येऊन गेलाच आहे.) सामान्य पोलिसापर्यंत या कायद्याचा कोणता अर्थ व उपयोग पोचला? तर त्यातील एका तरतुदीप्रमाणे एरवी दखलपात्र असणारे गुन्हेही बिनदखलपात्र ठरतात. आता ही तरतूद काही कुणाला अत्याचाराचा परवाना देत नाही; पण तिचा फायदा घेऊन अगदी साध्या कॉन्स्टेबलसनीही संशयित नक्षलवाद्याना भररस्त्यात गोळ्या घातल्या व बिनदखलपात्रतेच्या नियमाचा स्वैर अर्थ लावून गैरफायदा घेतला. याचा गाजावाजा होतो असे दिसल्याबरोबर अशा कत्तलीना चकमकीचे लेबल लावून टाकण्यात आले. पोलिसांच्या 'हम करेसो कायदा'-वृत्तीला अभयदान देणारा हा कायदा मागे घ्यावा अशी मागणी वेंकटकृष्ण सतत मांडीत आहेत.

### कटांचे खटले

नक्षलवादी चळवळीच्या न्यायालयीन बाजूंचा विचार करताना सुप्रसिद्ध कटाच्या खटल्याची (conspiracy cases) दखल घेतलीच पाहिजे. इंडियन पीनल कोडच्या सहाव्या प्रकरणातील सेक्शन १२१ व १२१-ए यामध्ये सरकारविरुद्ध युद्धाची तयारी करणे, तसा प्रचार करणारे साहित्य जमविणे यांचे वर्णन सामुदायिक कारस्थानाच्या संदर्भात आलेले आहे या कलमाचा मनसोक्त वापर करून आंध्र पोलिसानी कटाच्या खटल्याचे एक जाळेच निर्माण केले आहे हैदराबाद कटखटला हा त्या मालिकेतला पहिलाच आणि त्यातले सर्व आरोपी आयुर्विमा महामंडळाचे कर्मचारी होते. हे सर्व निर्दोष सुटले. टी. नागि रेड्डी कटखटला हा आणखी एक महत्त्वाचा खटला. यात कै. टी. नागि रेड्डीखेरीज देवुलापल्ली वेंकटेश्वर राव, चलपल्ली श्रीनिवास राव, कृष्णमूर्ती, वज्रवेल शेट्टी, शंकर राव, जे. कृष्णय्या, सुब्बा राव वगैरे वरिष्ठ नक्षलवादी नेते गुंतले होते. यातील बहुसंख्य मंडळी प्रथम अटलाप्पारगडा व नंतर अण्णानगर (मद्रास) येथे एकत्र जमली व १९६९ च्या पावसाळ्यानंतर सशस्त्र उठाव करण्याचा कट त्यानी रचला असा पोलिसाचा दावा आहे. या सर्वांना खालच्या कोर्टाने पाच-पाच वर्षांचा तुरुंगवास दिला व हायकोर्टाने शिक्षा कायम केल्या. याशिवाय सिकंदराबाद कटखटला, तिरुपती कटखटला आणि नेल्लोर कटखटला याच्या निकालाची प्रतीक्षा अद्याप चालूच आहे. सिकंदराबाद कटखटल्याचे वैशिष्ट्य असे की, आर. डब्ल्यू. ए. (रेव्होल्यूशनरी रायटर्स असोसिएशन)चे सदस्य असणारे अनेक क्रांतिकारी लेखक त्यात गुंतलेले आहेत. पी. वर्वर राव, चरबंद राजू, टी. मधुसूदन राव, के. व्ही. रमण रेड्डी आणि कोटेश्वर राव हे यातील काही ठळक आरोपी-लेखक. त्यातलेच आणखी एक आरोपी कोंडापल्ली सीतारामय्या याना नागपुरात याच वर्षी अटक करण्यात आल्याचे वृत्त वाचकांच्या स्मरणात असेलच.

पार्वतीपुरम् कट-खटला हा या मालिकेतील सर्वांत मोठा व विक्रमी खटला म्हटला पाहिजे. इंडियन पीनल कोड अमलात आल्यानंतरचा इतका मोठा खटला हा पहिलाच असावा. १२ ऑगस्ट १९७० रोजी सुनावणीस आलेल्या या खटल्याचा निकाल तब्बल सहा वर्षांनी ३० ऑगस्ट १९७६ रोजी लागला. आरोपींची संख्या होती चक्क ७४. त्यातील १५ दोषी ठरले. पैकी १३ जणाना जन्मठेपी आणि दोघाना पाच वर्षे मुदतीच्या कारावासाची सजा फर्माविण्यात आली. हे ७४ आरोपी भारताच्या एका नव्हे तर तीन राज्याचे रहिवासी होते. त्यातले तीन पश्चिम बंगालचे, तीन ओरिसाचे व उर्वरित आंध्रप्रदेशच्या विविध जिल्ह्यातले होते. अर्थात आरोपींचा पिंजरा केवळ संख्याबळानेच वजनदार झाला होता असे नाही तर चौधरी तेजेश्वर राव, दुप्पल गोविंदराव, वेम्पटापू सत्यम्, कोला व्यंकय्या, नागभूषणम् पटनाईक, मेधावरपु रामसीता, चारू मुजुमदार, कनू सन्याल, हेमचंद्र पाणिग्रही, सपूर्णाम्मा चौधरी, शौरिन बोस, सुशीतल राय चौधरी अशी जबरदस्त नेतेमंडळीही त्यात होती. शिक्षा झालेल्याच्या यादीतही यातलीच नावे बहुसंख्य आढळतील. ५०२ साक्षीदार आणि ११४४ प्रदर्शनवस्तूंची तपासणी खटल्यात करण्यात आली. खटल्याचे निकालपत्र १६२८ पृष्ठाचे आहे. 'झोपताना उशीसारखे उपयोगी पडेल' अशा कॉमेंटसह श्री. वेंकटकृष्ण यानी आम्हाला निकालपत्राचे ते बाड दाखविले. या निकालाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयात केलेले अपील अजून अनिर्णित अवस्थेत आहे.

हे कटाचे खटले व तत्सम सरकारी कारवाईविरुद्ध श्री. वेंकटकृष्णाचा आक्षेप असा की ब्रिटिशानी आपली साम्राज्यशाही टिकविण्याकरिता व मजबूत करण्याकरिता जे उपाय योजले, जे कायदे केले तेच आपल्या राज्यकर्त्यांनीही आपली खुर्ची टिकविण्यासाठी बेगुमानपणे वापरले आहेत. उदाहरणार्थ वर उल्लेखिलेल्या सर्व कटाच्या खटल्याची कार्यवाही, ब्रिटिश अमदानीतल्या लाहोर कटखटला, मीरत कटखटला याचीच आठवण करून देणारी आहे. बहुसंख्य कटाच्या खटल्यात त्याच्याशी संबंध नसलेल्या पण पोलिसाना त्रासदायक वाटणाऱ्या अनेक व्यक्तीना खोटे साक्षीपुरावे उभे करून गुंतविण्यात येते. काही खटले तर मुळापासूनच बनावट व निराधार असतात. त्यात पोलिसच कट उत्पन्न करतात! शिवाय ब्रिटिश राज्यात ज्या कायदेशीर तरतुदीविरुद्ध काँग्रेसने लढा दिला होता, त्याचाच वापर काँग्रेस सरकारानी स्वार्थासाठी करून घेतला. १९३६ साली फेरोजपूरला झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सर्व राजबंद्याना– दहशतवाद्यानासुद्धा– विनशर्त मुक्त करण्याची मागणी झाली होती. लोकमान्य टिळकाना ज्या १२४-ए कलमाखाली शिक्षा ठोठाविण्यात आली होती, त्याविरुद्ध काँग्रेसने चळवळ केली होती. तथापि काँग्रेसच्या सरकारांनी मात्र क्रांतिकारक कम्युनिस्टाना तुरुंगात सडत ठेवण्याचे व तेथेही अत्याचार करण्याचेच धोरण स्वीकारले. १२४-ए कलमही त्यासाठी राबविण्यात आले. ज्या कायद्याने भगतसिंग व त्याच्या सहकाऱ्याना फासावर लटकाविले, त्याच कायद्याखाली किश्ता गौड व भूमय्यासारख्या क्रांतिकारकाना फासावर चढविण्यात आले. आपल्या राजकीय विरोधकाना फाशी देणे हे कोणत्या राजनीतीला धरून आहे? तसेच आपली सरकारे ब्रिटिश सरकारच्याच मार्गाने ध्येयाकडे जात असतील तर

१५ ऑगस्ट १९४७ ला काय फक्त सत्तांतर घडून आले असे समजायचे ? या दोनाबरोबरच वेंकटकृष्ण विचारतात तो तिसरा प्रश्न महत्त्वाचा आहे–'बडोदा डायनामाइटकटखटला व मागे उल्लेखिलेले कटाचे खटले हे सारख्याच कलमाखाली भरलेले आहेत व त्याचे स्वरूपही समान आहे. अशा स्थितीत बडोदा डायनामाइट-खटला जर तडकाफडकी काढून घेता येतो तर आध्रमधील कटाच्या खटल्याना तोच न्याय का देण्यात येऊ नये ?' अर्थात याचे (राजकीय) कारण तसे सोपे आहे. बडोदा डायनामाइटकेस काढून घेणाऱ्या जनतासरकारला जॉर्ज फर्नांडिसविषयी असलेली आस्था नक्षलवाद्याविषयी असणेच शक्य नाही; कारण नक्षलवादी चळवळ ही आज ना उद्या आपलीही डोकेदुखी होणार अशी खात्री असल्याने, तिचा परस्पर काटयाने काटा काढला गेला तर त्यांना हवाच आहे.

श्री. वेंकटकृष्ण याचेही सर्वच मुद्दे समर्थनीय आहेत असे नाही. उदाहरणार्थ, सरकार परकीय झाले काय किंवा स्वकीय झाले काय, आपल्याविरुद्ध सशस्त्र बडाळया उभ्या करू पाहणाऱ्या कोणत्याही विरोधकाचा बीमोड करण्याचा प्रयत्न ते करणारच व त्यासाठी वापरण्यात येणारे मार्गही समान असणारच. स्वातंत्र्य मिळाल्यानतर काँग्रेससरकारने काय अराजकाला मुक्तद्वार द्यावे अशी वेंकट-कृष्णाची अपेक्षा होती ? एवढेच, की नक्षलवादी किंवा अन्य कोणी विरोधक (उदा. आता जनतापक्ष) कोणत्याही मार्गाने क्रांती करून काँग्रेसला हुसकावून लावू शकले तर ते अराजकवादी ठरण्याऐवजी सत्पक्षाचे, न्याय्य बाजूचे प्रतिनिधी ठरतील. तथापी उद्या नक्षलवादी जरी सत्तेवर आले तरी सत्ता टिकविण्यापेक्षा ते याहून वेगळे असे काय करणार आहेत ? त्यांच्या मातृपितृभूमीतील–चीन–रशियातील 'त्यांची' सरकारे अशा उपायांचाच अवलंब करीत नाहीत काय ? शिवाय किश्ता गौड व भूमय्या याना फाशी देण्यात आले ते राजकीय विरोधक म्हणून नव्हे तर सदोष मनुष्यवधाचा आरोप (मग त्यामागचा उद्देश, motive कोणताही का असेना) सिद्ध झाल्यामुळेच. नक्षलवाद्याना न्याय मिळवून देण्याचा श्री. वेंकटकृष्ण याचा आटापिटा पाहून त्याना आम्ही असा प्रश्न विचारला की 'ज्याना न्याय मिळवून देण्यासाठी प्रचलित कायद्याचा आधार घेऊन तुम्ही सरकारशी भांडता, त्याचाच मुळात प्रचलित कायद्यावर व सरकारवर विश्वास नाही, त्याची वाट काय ?' श्री. वेंकटकृष्णाना हा प्रश्न अपरिचित किंवा अनपेक्षित नसावा. कारण त्यानी ताबडतोब व आत्मविश्वासाने उत्तर दिले की 'नक्षलवाद्याचा कायद्यावर विश्वास नसला तरीही सरकारचा असला पाहिजे. या कायद्याना सरकार जबाबदार आहे व त्यानी कायद्याचे उल्लंघन करणे वा अनादर दाखविणे हा गंभीर धोका आहे.' उत्तर विचार करण्यासारखे आहे. सरकारकडून कायद्याचा अनादर/उल्लंघन कसे जाणूनबुजून होते, याची काही उदाहरणेही त्यानी दिली. त्यातले एक असे–

सर्वोच्च न्यायालय व अनेक उच्च न्यायालयांनी केंद्र-राज्य-सरकाराना, राजकीय मतभिन्नतेच्या कारणासाठी कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास नोकरीतून कमी करू नये असे इशारे वारंवार दिले आहेत. तथापि आध्र शासनाने त्याकडे डोकेझाक करून अनेक कर्मचाऱ्याना अतिरेकी गटांशी संबंधित असल्याच्या संशयावरून काढून टाकले आहे श्री एम् एच् केशव राव ऊर्फ नागमणी हा आध्र विधानसभेत वृत्तलेखक म्हणून नोकरीस होता, त्याला क्रांति-कारी लेखक असल्याच्या आरोपावरून घटनेच्या ३११ (२) (८) कलमाचा आधार घेऊन अर्धचंद्र देण्यात आला श्री. श्यामसुंदर (इन्स्पेक्टर सहकारखाते, काकिनाडा) याच्यावर खटला चालू असतानाच त्याला पदमुक्त करण्यात आले व सेशन्स कोर्टाने निर्दोषी ठरविल्यानतरही अद्याप परत कामावर घेतलेले नाही. पी. सूर्यनारायण (इंजिनियर, हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि.) व श्रीमती के. मारुती (इंजिनियर नागार्जुनसागर-प्रकल्प) यानाही केवळ प्रतिकूल पोलिसी अहवालावर विश्वासून सेवामुक्त करण्यात आले. याशिवाय मिसा व डी. आय्. आर्. खाली अनेक खोटे खटले या काळात पोलिसानी भरले होते, त्यातील काही अजूनही रेंगाळत आहेत. या सर्वांवरील अन्याय दूर करावेत, विशेषत. निलंबित सरकारी कर्मचाऱ्याना पुन्हा त्याच्या जागी कामावर घेण्यात यावे अशी जोरदार मागणी ओपीडीआर्तर्फे त्याच्या ३१ मे–१ जून ७५ रोजी भरलेल्या पहिल्या मेळाव्यापासूनच करण्यात येत आहे.

ओपीडीआरचा उल्लेख श्री. वेंकटकृष्णाच्या बोलण्यात वारंवार येत होता. या सस्थेचे नाव आम्ही ऐकलेले असले, तरी अधिक ओळख आम्हालाही करून घ्यायची होतीच. वेंकटकृष्ण–जे त्या सस्थेचे उपाध्यक्षही आहेत–यांनी ती अशी करून दिली. (पृ. २२ पहा)

## ओपीडीआर : काय, कसे वगैरे

ओपीडीआर ऊर्फ ऑर्गनायझेशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ डेमो-क्रॅटिक राइटस् (लोकशाही हक्क रक्षण समिती) या सस्थेचा उल्लेख, नक्षलवादी चळवळीची एक 'फ्रंट विंग' म्हणून दुसऱ्या लेखाकात आलाच आहे. अर्थात ओपीडीआरचे अध्वर्यु मात्र ते मान्य करायला तयार नाहीत व ते साहजिक आहे. 'आम्ही फक्त नक्षल-वाद्याचीच बाजू घेतो असे नाही, तर एकंदरीनेच लोकशाहीतील नागरी हक्कावर गदा यऊ नये यासाठी आमची सस्था आहे. उद्या इंदिराजीना जरी हे हक्क नाकारण्यात आले तरी त्याच्या बाजूनेही आम्ही लढू,' असा सोज्ज्वळ पवित्राही ते घेतात.

ओपीडीआरची अधिकृत स्थापना होण्याची प्रक्रिया २४ जानेवारी १९७५ रोजी सुरू झाली, असे म्हणायला हरकत नाही. आध्रातील राजबद्याचे खटले लढविणाऱ्या वकिलाची एक सभा या वेळी बोला-विण्यात आली. कटाचे खटले चालविणाऱ्या वकिलानी या वेळी पर-स्परांशी सल्लामसलत केली. हैदराबाद येथे ८–९ फेब्रुवारी १९७५ रोजी भरलेल्या मेळाव्यात नागरी हक्काच्या सरक्षणासाठी सरकारच्या लोकशाहीविरोधी कृत्याचा प्रतिकार करणारी एखादी राज्यव्यापी संघटना निर्माण होण्याची निकड अनेकाना भासली. पुढील एका सभेत अशा संघटनेच्या उद्देशाचा व रचनेचा कच्चा आराखडा तयार

**बडोदा नायनामाइट खटला काढता येतो तर तोच न्याय या कटांना का नाही ?....**

करण्यात आला व एका निमंत्रकासह अस्थायी समितीही नेमण्यात आली. ३१ मे व १ जून १९७५ या दोन दिवशी राज्य-पातळीवर मोठे अधिवेशन भरवून संस्थेची औपचारिक संस्थापना पूर्ण झाल्याची घोषणा करण्यात आली. जनहितविरोधी कृत्यांचा प्रतिकार करणे, फॅसिस्ट व हुकुमशाही प्रवृत्तींना उजेडात आणून त्याविरुद्ध जनमत तयार करणे, दलित–मागासवर्गांवरील अत्याचारा-

# युवर अटेन्शन प्लीज्....

## ऑर्गनायझेशन फॉर प्रोटेक्शन ऑफ डेमोक्रॅटिक राइट्स् आंध्र प्रदेश

७–१–५७१ सुभाषपथ
सिकंदराबाद ५०० ००३
दि. २ एप्रिल १९७७

मा. श्री. बी. डी. जत्ती, राष्ट्रपती
राजभवन, नवी दिल्ली

भूतपूर्व भारतसरकारने कोणतेही कारण न देता दुर्लक्ष केलेल्या या महत्त्वाच्या बाबीकडे आपण लक्ष द्याल, अशा आशेने हे निवेदन आपणास पाठवीत आहोत. या संपूर्ण प्रकरणाचा वस्तुनिष्ठ पूर्वग्रहरहित पुनर्विचार करण्यास आपण वर्तमान सरकारला भाग पाडाल असा आमचा विश्वास आहे. लोकांचा सरकारवरील भरवसा व सरकारची नागरी स्वातंत्र्यावरील श्रद्धा या दोहोंची त्यामुळे पुनर्प्रतिष्ठापना होणार आहे. राज्यकारभार चालविताना केंद्र किंवा राज्य-सरकारला कायदा व सुव्यवस्थेच्या रक्षणाच्या नावाखाली आपल्या मर्यादा ओलांडण्याचा मोह अनेकवार होतो व अशा तऱ्हेने कायद्याचे उल्लंघन झाल्यास नागरिकांच्या मूलभूत नागरी स्वातंत्र्यावरच गदा येणे अपरिहार्य असते असा अनुभव आहे.

स्वातंत्र्यलढ्यापासून सुरुवात होऊन या देशात आजपर्यंत अनेक राजकीय आंदोलने होऊन गेली. त्यांतील काही आंदोलने काही प्रसंगी सशस्त्र लढ्यावर विश्वास ठेवणारीही होती. या आंदोलनांचे स्वागत किंवा तिरस्कार करण्यापूर्वी त्यांचा विचार तत्कालिन सामाजिक, आर्थिक व राजकीय परि-स्थितीच्या पार्श्वभूमीवर केला गेला पाहिजे. या संदर्भात आम्ही आपले लक्ष नक्षलबारीतील लढा व श्रीकाकुलम-चळवळ यांच्याकडे वेधू इच्छितो. या चळवळीच्या नेते–अनुयायी मंडळींवर अज्ञानामुळे, गैरसमजामुळे किंवा राजकीय हेतूमुळे अतिरेकी व विध्वंसक असे चुकीचे शिक्के मारण्यात आलेले आहेत. या चळवळीत काही विध्वसक कृत्ये झाली असतीलच तर ती स्थानिक स्वरूपाच्या जुलमाविरुद्ध उसळलेली सामुदायिक प्रतिक्रिया होती. जमीनदारांचे अत्याचार व त्यांना मिळणारे सरकारी संरक्षण यांच्या प्रतिकाराचा तो प्रयत्न होता. या चळवळीवर विध्वसकतेचा ठपका ठेवण्यापूर्वी त्यांना जन्म देणाऱ्या भयानक शोषणाकडे लक्ष पुरविणेही जरुरीचे आहे. या चळवळीचे नेते सुशिक्षित असून न्याय्य हक्कांसाठी जरूर ते लोकलढे संघटित करण्याचा प्रदीर्घ अनुभव त्यांना आहे. या चळवळीत सामील झालेल्या पददलित जनतेच्या शोषणासारख्या समस्या समजावून घेऊन त्या सोड-विण्याचा प्रयत्न करण्याऐवजी सरकारने दडपशाही करून आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न केला. उदाहरणार्थ, गुन्ह्याचे स्वरूप (वैयक्तिक वा सामुदायिक) कितीही भयकर असले तरी संबधित आरोपीवर वैधमार्गाने खटला चालवून न्याय दिला जावा अशी कायदेशीर तरतूद सरकारने अनेकवार धुडकावून लावली आहे. जाणूनबुजून धुडकावून लावली आहे. आंध्रप्रदेशातील नक्षलवादी चळवळीचे अनेक नेते ज्यात ठार झाले त्या तथाकथित चकमकींची चौकशी करण्यासाठी केंद्रसरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाच्या नेतृत्वा-खाली खास आयोगाची नेमणूक करावी अशी आमची विनंती आहे.

खोटे खटले भरून, बंदी घालून वा दडपशाही करून राज-कीय लोकसंघर्ष खतम करून टाकता येतील असे कुणास वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे. नागरी स्वातंत्र्याच्या पुनरु-ज्जीवनाची प्रतिज्ञा करून सत्तेवर आलेल्या सरकारने या प्रकरणात लक्ष घालणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू
(सही) के. व्ही. अय्यर
(जनरल सेक्रेटरी)
ओ. पी. डी. आर.

जनतासरकार सत्तेवर आल्यानंतरच्या पहिल्या पंधरवड्या-तच ओ. पी. डी. आर ने तत्कालीन कार्यवाहक राष्ट्रपती व इतर प्रमुख नेत्यांना पाठविलेल्या निवेदनाचा हा स्वैर व संक्षिप्त अनुवाद. या निवेदनासोबतच ओ. पी. डी. आर. ने आपल्या दहा प्रमुख मागण्या मांडल्या असून परिशिष्टात, आंध्रप्रदेशात १९६९ ते १९७६ अखेर चकमकींच्या नावाखाली ठार मारण्यात आलेल्या एकशेपस्तीस नागरिकांची यादी त्यांच्या हत्येच्या तपशिलासह दिली आहे. अर्थात ही यादी संपूर्ण नसून आंशिक असल्याचा दावाही केलेला आहेच. जयप्रकाशजींनी केलेल्या तारकुंडे चौकशीआयोगाच्या नियुक्तीचे मोठे श्रेय या निवेदनाचे व पर्यायाने ओ. पी. डी. आर. चे असल्याचा दावा केला जातो व ते एक कारण म्हणून खरे मानण्यास कोणतीच हरकत दिसत नाही. मात्र त्यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही ओ. पी. डी आर. च्या वरील निवेदनाची दखल घेतलेली नाही.

*

वर प्रसिद्धिद्वारे प्रकाशझोत टाकणे आणि नागरी हक्कभंगाविरुद्ध लढा देणे ही संघटनेची प्रधान उद्दिष्टे ठरविण्यात आली. ही स्थापनेची पूर्वतयारी जोरात असतानाच किश्ता गौड व भूमय्या यांना धाईने फाशी देण्यात येणार असल्याची स्फोटक बातमी हैदराबादेत वाऱ्याच्या वेगाने पसरली. दिवस होता ११ मे १९७५. वातावरण तापले. काही तासातच ओपीडीआरच्या नावाखाली एक पत्रक प्रसिद्ध करून शहरात वितरित करण्यात आले. सुदैवाने ही फाशी आंध्र उच्च न्यायालयाने स्टे-ऑर्डर देऊन तात्पुरती रोखली. या संधीचा फायदा उठवून ओपीडीआरने देशव्यापी आंदोलनाचा पुकारा केला. 'ही फाशीची शिक्षा रद्द करावी' अशा आशयाच्या निवेदनावर हजारो नागरिकांच्या सह्या घेऊन ते सरकारकडे पाठविण्यात आले. मात्र राज्यव्यापी मेळाव्यानंतर अल्पावधीतच आणीबाणी जारी झाली आणि ओपीडीआरला जबरदस्त तडाखा बसला. तत्कालीन उपाध्यक्ष श्री. टी. रामदास रेड्डी, जनरल सेक्रेटरी श्री. के. व्ही. अय्यर व अॅड. श्री. के. रामकृष्ण रेड्डी गजाआड गेले. दहशतीचा अमल सुरू झाल्याने कामकाज थंडावले. ज्यांच्यासाठी ओपीडीआरने आपली पहिली बचाव-मोहीम काढली त्या किश्ता गौड व भूमय्या यांनाही १ डिसेंबर १९७५ रोजी मुशिराबाद जेलमध्ये फासावर लटकविण्यात आले. त्यांचे प्राण वाचविण्यासाठी बातमी कळल्यानंतर अखेरच्या काही तासातही ओपीडीआरचे प्रतिनिधी मुख्य मंत्री व राज्यपालांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेटले, तथापि उभयतांनीही हस्तक्षेप करण्याचे नाकारले. आणीबाणी उठल्यानंतर आता ओपीडीआरची चळवळ पुन्हा सुरू होत आहे. अलीकडेच बनावट चकमकींद्वारे बळी गेलेल्या २७४ नागरिकांची यादी चकमकींच्या तपशिलासह ओपीडीआरने प्रसिद्ध केली आहे. या संदर्भात राष्ट्रपतींना पाठविलेल्या निवेदनाचा सारांश याच लेखाकात इतरत्र दिलेला आहेच. सध्या न्या. भार्गव चौकशीआयोगासमोर आपली बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी मोर्चेबंदी चालू आहे. आयोगापुढे संबंधित अधिकाऱ्यांच्या नावासकट माहिती व पुरावे मांडण्याची तयारी सुरू आहे. टी. रामदास रेड्डी हे आता अध्यक्ष आहेत तर श्री. सी. वेंकटकृष्ण व श्री. के. रामकृष्ण रेड्डी हे उपाध्यक्ष आहेत. श्री. वेंकटकृष्ण यांचा सविस्तर परिचय मागे आला आहेच. श्री. के. रामकृष्ण रेड्डी हे प्रसिद्ध अॅडव्होकेट, पार्वतीपुरम कटखटल्यात आरोपींचा बचाव मांडणारे. सतत दोन वर्षे विशाखापट्टणमध्ये राहून त्यांनी ही लढत दिली आहे. अध्यक्ष श्री. टी. रामदास रेड्डी हे सुप्रसिद्ध नक्षलवादी नेता टी. नागि रेड्डी यांचे धाकटे बंधू. पन्नाशीला आलेल्या या गृहस्थाने आयुष्यच नव्हे तर आपले कुटुंबही लोकसंघर्षात खर्ची घातले आहे. श्री. वेंकटकृष्ण यांनी उत्साही तत्परतेने श्री रेड्डीशी आमची भेट घडवून आणली. नक्षलवादी चळवळीची सध्या झालेली वाताहत पाहून श्री. रेड्डी व्यथित झाले असणे साहजिक होते. कदाचित त्याच मन:स्थितीत, 'नक्षलवाद (as a political ideology) कधीच मेला आहे,' अशी विधाने त्यांनी केली असावीत. त्यांचे हे मत वस्तुस्थितिनिदर्शक आहे की नाही याचा निर्णय, त्या मताचा अन्वयार्थ याची चर्चा पुढील लेखाकात करता येईल; पण political ideology—राजकीय तत्त्वप्रणाली—म्हणून नक्षलवाद का आणि कसा, कुठे, केव्हा संपला या आमच्या प्रश्नाचे उत्तर रामदास रेड्डी यांनी revolutionaries adventurists च्या पेटंट परिभाषेत दिले. म्हणजे असे की, चळवळीतून खरे क्रांतिकारी spirit कमी होऊन साहसवादी किंवा दहशतवादी प्रवृत्ती बळावल्या, त्यामुळे आणि तेव्हा नक्षलवाद संपला. आता हा फरक कसा करावयाचा? तर तो पुन्हा व्यक्तिनिष्ठ. रामदास रेड्डींचा विश्वास असा होता की, नागि रेड्डी गट हा खरा क्रांतिकारी मनोवृत्तीचा घडत गेलेला होता. तो निव्वळ साहसवादी/दशहतवादी नसून लोकशिक्षणावर भर देणारा व सशस्त्र क्रांतीचा उपाय हा अखेरचा उपाय असल्याची जाणीव ठेवणारा होता. मात्र नागी रेड्डींच्या निधनानंतर या गटाचा प्रभाव थोडासा कमी झाला असावा. चंद्रपुला रेड्डी-सत्यनारायण सिन्हा गटाच्या चालू हालचालीविषयी रेड्डी यांनी विशेष उल्लेख केलेला नसला तरी त्या मंडळींना नक्षलवादी म्हणायला ते तयार नव्हते.

श्री रेड्डी यांची मते/मुद्दे मांडण्याची धाटणी अतिशय अभिनिवेशयुक्त, स्पष्ट, ठाशीव आहे. ते स्वत: डबल ग्रॅज्युएट असून त्यांचे बरेचसे- प्रथम पदवीपर्यंतचे- शिक्षण मुंबईतच झाले आहे. आपल्या मुलाखतीच्या अखेरीस ते पुन्हा ओपीडीआरकडे आले.

---

## ओपीडीआरच्या दहा मागण्या

श्री रामदास रेड्डी व श्री. वेंकट कृष्ण यांनी बोलताबोलतानाच ओपीडीआरने सध्या ज्याचा आग्रह धरलेला आहे त्या मागण्या मांडल्या

१. बनावट चकमकींची न्यायालयीन चौकशी.

२. आणीबाणीच्या काळात पोलिसांनी घेतलेल्या बळीस प्रसिद्धी.

३. कोर्टात रेंगाळणारे कटखटले काढून घेण्यात यावेत.

४. सर्व राजबंद्यांची बिनशर्त मुक्तता.

५. भारतीय राज्यघटनेच्या Article 311 (2) (c) अन्वये काढून टाकलेल्या सरकारी नोकरांना पुन्हा कामावर घ्यावे.

६. सत्ताधारी पक्षाला सरकारी नोकरांना छळण्याची तरतूद देणारे घटनेतील हे कलम रद्दच करून टाकावे.

७. क्रिमिनल प्रोसीजर कोड (१९७२) चा सेक्शन ५७ व घटनेतील Article 22 (2) यांचे कठोरपणे पालन करण्यात आले पाहिजे. अधिकाऱ्याकडून त्याचे उल्लंघन झाल्यास तो गुन्हा समजावा.

८. जन्मठेपेचा कालावधी कमी करण्यात यावा. १४ वर्षांपेक्षा अधिक मुदतीची जन्मठेप असू नये

९. फाशीची शिक्षाच रद्द करून टाकावी

१०. १९६७ पासून आतापर्यंत भारतातील राजकीय गुन्हेगार कैद्यांची यादी तपशिलासह प्रसिद्ध करावी.

*

---

ओपीडीआरचे नाव तरी अगदी सोज्ज्वळ आहे व 'आम्ही नक्षलवाद्यांनाच फक्त बांधलेलो आहोत असं नाही' अशी खात्री देऊन आपले बाह्यरूपही निर्मळ दाखविण्याचा संघटनेचा प्रयत्न आहे. असे असले तरीही काही शंका शिल्लक उरतातच. त्यातली एक महत्त्वाची व वेंकटकृष्ण रेड्डींना विचारलेली शंका अशी की नक्षलवाद्यांच्या लोकशाही हक्कांचे संरक्षण करणारी संघटना हा 'वदतो व्याघात' वाटत नाही काय ? नक्षलवाद्यांचा या राज्यपद्धतीवर, या सरकारवर, या राजकीय–सामाजिक यंत्रणेवर काडीमात्र विश्वास नाही आणि प्रस्थापिताला उलथून, नष्ट करून टाकणे हा त्याच्या चळवळीचा एक उद्देश आहे. त्यांच्या लोकराज्याच्या कल्पनेत आपली संसदीय लोकशाही बसत नाही. अशा परिस्थितीत त्यांनी या प्रस्थापित यंत्रणेकडून नागरी स्वातंत्र्याची, लोकशाहीवादी हक्काची अपेक्षा का करावी ? जे सरकार त्याना बंदुकीच्या नळीच्या मार्गाने जमीनदोस्त करावयाचे आहे, त्या सरकारने त्याच्याविरुद्धही तीच कृती केली तर त्याना तक्रार करायचा हक्क कितपत पोहोचतो ?

रामदास रेड्डींनी या शंकेला उत्तर दिले नाही, परंतु वेंकटकृष्ण यानी मात्र 'नक्षलवाद्याना कायद्याबद्दल आदर असेल किंवा नसेल, पण सरकारने मात्र तो राखलाच पाहिजे. कारण कायदा व तदनुषंगिक न्याय हेच सरकारचे अधिष्ठान आहे.' असे कामचलाऊ उत्तर दिले. ते अर्थातच समाधानकारक नाही. अर्थात खरं उत्तर, तर्क लढविल्यास फार कठीण मुळीच नाही. हा नक्षलवाद्यांच्या धूर्त डावपेचाचाच एक भाग असावा याबद्दल आम्हाला शंका वाटत नाही. नक्षलवादी हे काही साधनशुचितावाले नव्हेत, की स्वत: कायदा पाळूनच त्यानी इतराकडून न्यायाची अपेक्षा करावी ! तेव्हा एकीकडे ते त्याच्या वर्गशत्रूना आणि पोलिसाना गोळ्या घालणार असले तरी दुसरीकडे पोलिसानी त्याच मार्गाने प्रतिकार केला तर ओपीडीआरसारख्या त्याच्या फ्रन्ट विंग्ज त्याविरुद्ध कांगावा करणारच. त्याचे दोन फायदे होतात : एक तर सरकारी कारवाईची धार बोथट करून आपल्या कॉम्रेड्सचा बचाव करण्याचा प्रयत्न करता येतो आणि दोन : जनमत तापवून सरकारला बदनाम करता येते. डी. आय. जी. विजय रामा रावची तक्रार नेमकी हीच आहे. अर्थात चकमकीच्या मिषाने गोळ्या घातल्या हे ते मान्य करीत नाहीत, तथापि एवढे जरूर सांगतात की पोलिसांचे सख्याबळ तर नक्षलवाद्यापेक्षा सरस असतेच; पण शस्त्रेही उत्तम प्रतीची असतात. अशाही परिस्थितीत पोलिसावर हल्ले चढवून ठासणीच्या बंदुकानी स्टेनगन्सशी लढत द्यायची खुमखुमी नक्षलवाद्यानी दाखविली तर त्याचा संहार मोठ्या संख्येने होणारच. त्या वेळी तक्रार कशासाठी करायची ? ओपीडीआरचे सूत्रधार आज तरी 'आपण नक्षलवाद्याव्यतिरिक्त इतराच्याही लोकशाही हक्कांसाठी लढा देऊ,' असे आश्वासन देत आहेत, त्याचा खरेखोटेपणा काळच ठरवील; पण सध्या तरी नक्षलवाद्यांचा ज्या कायदाव्यवस्थेवर काडीइतकाही विश्वास नाही, उलट वैर आहे, त्याच कायद्यातील तरतुदींचा फायदा (न्यायसंस्थेद्वारे व न्यायाच्या मागणीद्वारे) त्याना मिळवून देण्याचे कार्य बिनबोभाट चालले आहे. अर्थात अशा प्रकारचे राजकीय डावपेच कम्युनिस्ट चळवळीला काही नवीन नाहीत. सी. पी. आय्. व सी. पी. एम्. (तथाकथित उजवे व डावे कम्युनिस्ट) तरी दुसरे काय करीत आहेत ? त्याचे मार्ग (उदा. कॅपचर फ्रॉम विदिन टेक्निक) घटनात्मक आहेत एवढेच; पण नक्षलवाद्यानी (सी. पी. आय्. एम्. एल्.) मात्र प्रस्थापिताविरुद्ध युद्धच पुकारले आहे आणि युद्धात म्हणे सारे काही क्षम्य असते !

कायदा, न्याय आणि नक्षलवाद यांच्यातला तेढा आजमितोस तरी हा असा आहे.

[ क्रमश: ]

---

## तरुण कार्यकर्त्यांसाठी

ग्रामीण भागात परिवर्तनाचे कार्य करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी एक योजना सह्याद्री विकास मंडळ, खानापूर ( पुणे जिल्हा ) या संस्थेमार्फत आखण्यात आली आहे. दलितवर्गात मिसळून त्याच्या जाणिवा जागृत करण्याची ही योजना आहे. शैक्षणिक क्षेत्रात एका नवीन संकल्पनेच्या ( conscientisation च्या ) आधाराने ही योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेचे प्रमुख सूत्रधार श्री. गी. पोतव्हें हे मराठी जाणणारे एक फ्रेंच गृहस्थ असून, ते स्वतःच या कामात मार्गदर्शन करणार आहेत.

या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यानी खालील पत्त्यावर संपर्क साधावा. किमान तीन वर्षे ग्रामीण भागात काम करण्याची अट आहे. मानधन म्हणून द. म. रु. ३००,०० मिळतील.

संपर्क :
श्री. गी. पोतव्हें
द्वारा : श्री. घोटिंग
१०११/३ मित्रनगर, मॉडेल कॉलनी, पुणे १६.
भेटण्याची वेळ : बु. ३ ते ५.

---

सर्वोत्तम लेखक (' टाईम 'वरून)

# युजीन ओ'नील

(१८८८-१९५३)

परिचय : जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी, पुणे

' Born in a goddam hotel room and dying in a hotel room!' मृत्युशय्येवर असताना प्रसिद्ध अमेरिकन नाटककार युजीन ओ'नीलने हे उद्‌गार बोस्टनमधील एका हॉटेलात काढले. थोड्या थोड्या वेळाने तो भान विसरत होता व अधूनमधून त्याला भोवतालच्या परिस्थितीची जाणीव होत होती. त्याच्या वडिलांचेही मृत्युशय्येवरील शब्द युजीनसारखेच होते. युजीनचे वडील मरताना ओरडले होते, ' Everything is rotten! Froth!' पुढे आयुष्यभर त्याच्या चिरंजिवानी (युजीनने) हे पालुपद चालू ठेवले! Like father, like son!

या युजीन ओ'नीलला खरेच एक sick genius म्हणता येईल; पण सिक जीनियसने ओरडत–ओरडत, रडत–रडत, कण्हत–कण्हत (त्याचे रुदन व कण्हणे मूक होते, आत्मिक होते) व जगावर मोरचूद ओकून बारेमाप पैसा मिळविला! १९३६ मध्ये नोबेल पारितोषिक पण मिळविले! त्याची महानता जाणू त्याच्या महान होण्याच्या निर्धारातच समाविली होती.

मानवजातीच्या अस्तित्वाला एकदा युजीन ओ'नील ' The great sickness ' असे म्हणाला होता. या जगात दोन प्रकारचे जीनियस असतात. एक पॉझिटिव्ह दुसरा व निगेटिव्ह प्रकार असतो. अर्थात् पॉझिटिव्ह जीनियस हा आशावादी असतो, त्याला जगाचे दोष दिसतात; पण ते दोष सुधारण्यासाठी तो धडपडत असतो व शेवटी सर्व काही ठीक होईल असे त्याला वाटते. मोठा दांडगा असतो त्याचा आत्मविश्वास! निगेटिव्ह जीनियस म्हणजे जगावर मोरचूद ओकणारे! त्यातले काही ओ'नीलसारखे असे म्हणणारे की मनुष्यजात अस्तित्वात आली हीच जशी काही एक काळाची व वेळाची चूक ( anachronism ) होऊन बसली. या निगेटिव्ह जीनिअसच्या पक्तीत इतर कैक उत्तमोत्तम लेखक व प्रख्यात व्यक्ती बसविता येतील. फ्रान्स काफ्का, ऑगस्ट स्ट्रीडबर्ग, (याने तीनदा लग्न केले, पण तीन्ही वेळा ते अननुरूप झाले व तिन्ही वेळा त्याच्या वैवाहिक जीवनाची शोकातिका झाली) मॉपासा, (व्यक्ती–त्याचे साहित्य नव्हे!) व्हर्जिनिया वुल्फ, हिटलर, चित्रकार व्हिन्सेंट व्हन गोक (त्याने स्वतःला अक्षरशः पीडून कलाकृती केल्या.) पॉझिटिव्ह जीनियसच्या पक्तीत टागोर, बर्नार्ड शॉ, नेहरू, सुभाषचंद्र बोस, टॉलस्टॉय, आइनस्टाइन, स्वायत्झर, पीकासो व इतर प्रख्यात व्यक्ती बसू शकतील.

न्यूयॉर्क शहर हे कलेचे सॉडोम गॉमॉरा आहे असेही हाच प्रख्यात लेखक म्हणाला होता. (सॉडॉम व गॉमॉरा या दोन प्राचीन शहरात भ्रष्टाचार व अनीती इतक्या फोफावल्या होत्या की स्वर्गातून या दोन शहरावर आग ओकली गेली व त्यातच त्या दोन शहराचा अंत झाला) पण कलेच्या या सॉडॉम व गॉमॉरानी (म्हणजे न्यूयॉर्क रंगभूमीनी) त्याला रु २,७५,००० डॉलर्स मिळवून दिले ओ'नीलकडे तीन राजमहालासारखे बगले होते त्यातला एक तर ३५ खोल्याचा शॅटॉ ( chateau म्हणजे किल्ल्यासारखा राजमहाल होता!) त्याच्याकडे एका वेळी ७०–७५ बुटाच्या जोड्या असत!

युजीन ओ'नीलसारख्या निगेटिव्ह जिनियसच्या बायोकेमिस्ट्रीत नियती काही विचित्र मिश्रण करून ठेवते व एक प्रकारचा negative cosmic force आयुष्यभर त्याचा पाठपुरावा करीत रहाते! या लोकाची सुटका फक्त एकाच गोष्टीने होते. या लोकाना फक्त एकच आशेचा किरण दिसतो आणि तो म्हणजे मृत्यू!

असे म्हटले जाते की युजीन ओ'नीलची बाल्यावस्था व कौटुंबिक जीवन चारचौघासारखे गेले असते तर तो एक महान नाटककार झाला नसता. त्याला सतत कुणी तरी पीडित होते कोण होते त्याचे हे पीडक? अर्थात् निगेटिव्ह कॉस्मिक फोर्स तर एक पीडक होताच; दुसरा पीडक म्हणजे त्याचे कुटुंब; पण एकदा हा निगेटिव्ह फोर्स पीडक


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

| | |
|---|---|
| १. जरीला (कादंबरी) –भालचंद्र नेमाडे. | रु. २०/– |
| २. स्पर्शपालवी (कादंबरी)–राजा राजवाडे. | रु. ११/– |
| ३. मृणालपाश (कथासंग्रह)–सौ. स्नेहलता दसनूरकर. | रु. १६/– |

**ENGLISH**

| | |
|---|---|
| 1) Powers of Mind–(Bestseller–on biofeed back, left–brain, right brain, & Ching, Zen, TM, Etc.)–Adam Smith | Rs. 18·90 |
| 2) Humphrey Bogart–(Bestseller–A. Perceptive biography of the tough actor) – Nathaniel Benchley | Rs. 15/– |
| 3) The Intercom Conspiracy–( Bestseller–Espionage novel) –Eric Ambler | Rs. 15/– |
| 4) Hitler's Letters & Notes– ( Compiled & with Comentary by Werner Maser ) | Rs. 21·15 |
| 5) The Tortured And The Damned – ( A first hand fictionalised account of Bangla Desh atrocities ) Robeert Payne. | Rs. 62/- |

* दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून अल्प दरात उत्कृष्ट पुस्तके वाचा.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ–पोस्टासमोर, पुणे ३०.

झाला कीं स्वत.चे कुटुंब काय पण सबंध मानवजातच पीडक होते ! कौटुंबिक सुख युजीनला अजिबात नव्हते. त्याची आई मनोरुग्ण होती. तिला मॉर्फीनचे व्यसन होते. तिला ओ 'नीलच्या जन्माच्या वेळी मुलगी हवी होती; पण झाला ओ 'नील ! त्यामुळे त्याचा थोरला भाऊ याने ऑनीलला आईच्या व्यसनाबद्दल जबाबदार धरले. त्याचा मुलगा पण फार हुषार होता; पण त्याने आत्महत्या केली. दुसरी एक मुलगी औषधाकडे वळली. आणखीन एका मुलीचे ( Oona ) लग्न चार्ली चॅप्लीनशी झाले. जणू त्याच्या लिखाणात तो काहीच चूक करू शकत शकत नव्हता ! तर त्याच्या कौटुंबिक जीवनात तो काहीच अचूक करू शकत नव्हता ! भग्न कौटुंबिक जीवनाच्या वेदना विसरायला त्याला घवघवीत यशाची धुंदी हवी होती का ? का हलाहल विषासारखे लिहून मनातील सर्व यातना बाहेर काढून त्याला catharsis हवा होता ? म्हणून तर त्याने अशी नाटके लिहिली नाहीत ना ? युजीन ओ'नीलने एक आत्मचरित्रात्मक नाटक लिहिले आहे. त्याचे नाव तसेच विलक्षण आहे 'A Long Day's Journey Into Night' अर्थात् साहित्यिक जे जे लिहितो ते बरेचसे आत्मचरित्रात्मक असते. युजीन ओ 'नीलच्या नाटकात सुद्धा त्याच्या जीवनाचे पडसाद उमटलेले दिसतात. बरेच वेळा त्याच्या नाटकाचा केंद्रबिंदू व्यापक नसतो. तो स्थानिक असतो; परतु त्यातली मूल्ये, त्यातले निकष साऱ्या जगाला लागू पडतात.

युजीन ओ'नीलने लहानपणी खलशाचे, शिवणमशीन दुरुस्त करण्याचे व इतर अशी कितीतरी कामे केली होती आणि तीसुद्धा वेगवेगळ्या देशांत. त्याने वार्ताहर बनण्याचा सुद्धा प्रयत्न केला. त्याचे वडील नट होते. त्याच्या वडिलांनी 'मॉंटे ख्रिस्टो' या नाटकात १४०० भूमिका केल्या होत्या ! युजीनचा थोडा काळ झोपडपट्टीत गेला होता. त्याला वाटली आणि बाईचं अजिबात वावडं नव्हतं. एकदा तर त्याला क्षयरोगाने पीडले होते. बऱ्याच नाटकांत युजीन ओ, नीलनी वास्तववता व द्योतक-गमक याचा संगम केला आहे. The Hairy Ape या नाटकात आपल्याला याची प्रचिती येते. खरंच युजीन ओ' नील हा यशाच्या देशात (USA) अपयशाचा गमक होता-नव्हे अपयशाचा पुजारी होता ! स्वर्ग त्याला नेहमी दोन बोटे लाब असे; पण ती दोन बोटं त्याला वामनाच्या तीन पावलासारखी वाटली !

त्याच्या Beyond The Horizon या नाटकातील पात्राची दशा पाहिली की आपल्या मनस्थितीची कालवाकालव होते. नियती जणू या पात्रावर उपहासाचा वर्षाव करायला टपलेली असते. पात्र म्हणतात, 'मला हे पाहिजे. ह्याचा मला ध्यास आहे.' नीयती म्हणते, 'ते तू घेऊ नकोस. हेच घे.' पण इतक्या प्रतिकूल परिस्थितीत ती पात्रे त्यांचा 'मी 'पणा सोडीत नाहीत. तडजोड करीत नाहीत.

युजीन ओ'नील च्या नाटकात जॉर्ज बर्नार्ड शॉंच्या नाटकासारखे विचाराला आव्हान नसते; परंतु ज्वालामुखीसारखा भावनांचा उद्रेक असतो. या भावनेच्या उद्रेकामध्ये मोरचूद ओकलेले असते.

*लिहिण्यासंबंधी एकदा युजीन ओ'नील* म्हणाला होता. 'Writing for me is a vacation from living !' ओ'नील एखाद्या निर्दय आदिमानवासारखी प्रेक्षकांच्या भावनांना मुसंडी मारून त्यांन त्याच्या खुर्चीत खिळवून ठेवीत असे. नाटक संपल्यावर प्रेक्षकाना एक विलक्षण थकवा वाटत असे. इतका हा Thrust जबरदस्त असे. ओ'नीलच्या पात्रांबरोबर प्रेक्षकाच्या भावनांची आदळ-आपट होत असे. ओ'नीलने त्याच्या आत्मचरित्रात्मक नाटकात पुढील वाक्य लिहिले आहे. 'I will always be a stranger who never feels at home, who does not really want and is not really wanted, who cean never belong, who must always be a little in love with death' काही उत्तमोत्तम कलाकारात Creative upsurge व death-wish यांचा नगाऱ्याच एकाच वेळेला कसा चालतो याची परत एकदा प्रचीती युजीन ओ'नीलच्या व्यक्तिमत्त्वात येते; पण ओ'नीलच्या नाटकात एक विचित्र प्रकारची शक्ति आहे. ती शक्ति ओ'नीलच्या डेथ-विशच्या पलीकडे गेली आहे.

स्त्रियांनी युजीन ओ'नीलच्या ओल्या हिरव्या द्राक्षासारख्या डोळ्यात पाहिले की त्यांना काहीतरीच होत असे, पण त्याची किंचित पुढे आलेली जिवणी त्यांना थोडीशी हलकट वाटे; पण एकदरीत त्याच्या प्रसिद्धीमुळे भरपूर स्त्रिया त्याच्याकडे आकर्षित होत असत. दिसायला ओ'नील बँक अकाउंटन्ट सारखा वाटे.

हे पुस्तक वाचून झाल्यावर मी स्वत.ला दोन प्रश्न विचारले, 'आपल्या कुटुंबामुळे शेवटी *युजीन ओ'नीलने मानवतेला क्षमा* केली का ? त्याला स्वत.ला तरी त्याने क्षमा केली का ?'

☐


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे।

मूल्य । सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चक्रमचक्री : पृष्ठ ६ वरून

आणीबाणीमुळे कित्येक प्रिन्सिपॉल्सना मात्र हायसे वाटत होते. विद्यार्थ्यांचा त्रास बंद झाला होता, फिया वाढविता येत होत्या, हाताखालच्या शिक्षकाच्या कटकटी बंद झाल्या होता. कित्येक प्राचार्यांनी तर स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताकदिन या दिवशी करावयाच्या भाषणात इंदिराबाईंची आरती ओवाळण्यात बायकानाही मागे टाकले होते. ही भाषणे सुदैवाने लिखित स्वरूपात नसतात; पण नौरोसजी वाडियात मात्र लिखित भाषण वाचण्याची पद्धत आहे ती व्याख्याने अजूनही वाचायला मिळतील. करमणूक होईल.

एरवी शिक्षक आणीबाणी या प्रकाराविषयी पूर्ण उदासीन होते. आणीबाणीत नानासाहेब गोरे किंवा एस् एम्. जोशी 'साधना' कार्यालयात सभा घेत. मी सर्व सभाना हजर होतो; पण सत्य-समाचार कळावा या कुतूहलानेसुद्धा कोणी प्राध्यापक या सभाना येताना दिसला नाही. मूळच्याच राजकीय-निष्ठा असलेले शिक्षक सोडा! राज्यशास्त्र-इतिहास शिकविणाऱ्या शिक्षकावर पोलिसाची नजर आहे असे ऐकून होतो. एस्. पी. तील प्रा. देव याना पोलिसानी चौकीवर बोलावले असेही ऐकले. तेव्हा मी दुसऱ्या एका राज्यशास्त्र-शिक्षकाला याबाबत विचारले असता मिष्किल हसत त्याने उत्तर दिले, मला त्रास होणार नाही. संजयच पतप्रधान झाला पाहिजे, असे सांगायलाही माझी तयारी आहे' अँटि-फॅसिस्ट परिपदा भरविणारे प्राध्यापकही काही कमी निघाले नाहीत.

मग तुमचे म्हणणे काय की, झाडून साऱ्या कॉलेज-शिक्षकानी सत्याग्रहात भाग घ्यायला हवा होता आणि आणीबाणीविरुद्ध विद्यार्थ्यांना चिथवायला हवे होते! बिचारा पोट-पूजक कॉलेज-शिक्षक! जे कडव्या संघटनांच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनीही केले नाही त्याची उगा अपेक्षा शिक्षकाकडून कशाला? स्वातंत्र्यासाठी लायक ठरण्याची हीच कसोटी असेल, तर तिला कोणीच उतरणार नाही.

## साक्षेपी स्वहितदक्षता

असे अजिबात नाही. मोक्षसाधनेसाठी संसारत्याग जसा आवश्यक मानला जात नाही त्याचप्रमाणे स्वतंत्र राहण्याची पात्रता सिद्ध करण्यासाठी स्वार्थाची आणि स्वहिताची आहुती द्यायला सिद्ध असले पाहिजे असे नाही. शिक्षकानी त्या बिकट काळात जर साक्षेपी स्वहितदक्षता दाखविली असती, वरिष्ठाच्या मर्जी सांभाळण्यापेक्षा संघटनेच्या शक्तीवर विश्वास ठेवला असता, वैयक्तिक स्वार्थ लांगूलचालनाने साधण्यापेक्षा समव्यावसायिकांच्या हितातून स्वहित सिद्ध केले असते तर स्वातंत्र्यासाठीची किमान लायकी त्यांच्या ठिकाणी आहे, असे म्हणता आले असते दुर्दैवाने या विवेकाचा सपूर्ण अभाव कॉलेज-शिक्षकांनी दाखविला.

जरा खुलासेवार सागा ना!

उदाहरणांनीच सागतो. ७५ सालच्या मार्च-एप्रिलमध्ये नवी वेतनश्रेणी मिळावी या मागणीसाठी शिक्षकानी परीक्षावर बहिष्कार टाकला. त्याचा परिणाम म्हणून नवी वेतनश्रेणी देण्याचे शंकरराव चव्हाणांच्या सरकारने मान्य केले. यासबधीचा सरकारी ठराव ऑक्टोबर ७५ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यात शिक्षकाना नवी वेतनश्रेणी स्वीकारण्याची किंवा जुन्याच वेतनश्रेणीत राहण्याची मुभा दिली होती मात्र नवीन वेतनश्रेणी हवी असल्यास काही अटी स्वतःवर लादून घ्याव्या लागणार होत्या आणि त्या अटी मान्य असल्याचा करार लिहून द्यावा लागणार होता. त्या अटी इतक्या जाचक होत्या की शिक्षकसंघटनेने 'आम्हाला वेठीचे गुलाम बनविण्याचा डाव' असे सरकारी ठरावाचे वर्णन केले. पुढे 'गुलामगिरीचा जाहीरनामा' म्हणून जिला प्रसिद्धी मिळाली ती प्राध्यापकाची आचारसंहिता बीजरूपाने या सरकारी ठरावात होती.

तेव्हा यावर एकच उपाय होता, तो म्हणजे करारावर सही न करणे. त्याचा अर्थ त्या शिक्षकाने जुनी वेतनश्रेणीच स्वीकारली असा झाला असता; पण जर सर्व शिक्षकानी करारावर सही करण्याचे नाकारले असते तर सरकारच्या दृष्टीने परिस्थिती अडचणीची झाली असती. यात बेकायदेशीर काहीच नव्हते. सरकारी जुलमाशी लढण्याची ही उत्तम सधी शिक्षकाना मिळाली होती.

अहो, आणीबाणीच्या काळात सरकारशी असे लढणे शक्य होते का? बरं, बिचारे शिक्षक नव्या भरघोस वेतनश्रेणीसाठी इतके आसुसलेले असणार की कोणत्या का अटी असेनात पैसे पदरात पडोत म्हणजे झाले, असे त्याना वाटत असेल. खेरोज, नवी वेतनश्रेणी नाकारल्याने सरकार कसे अडचणीत आले असते?

पहिले असे की हा वेतनश्रेणीचा लढा लढविणे फारसे अवघड नव्हते. त्यात कोणत्याही कायद्याचा भग झाला नसता. अहो, पन्नास वर्षांपूर्वी बार्डोलीसारख्या ग्रामीण भागात अज्ञानी शेतकऱ्यानी साराबंदीचे लढे लढविले आणि पुणे शहरातल्या सुशिक्षित कॉलेज-शिक्षकाना वेतनश्रेणी नाकारल्याचा लढा करता येत नाही? दुसरे, सरकार अडचणीत आले असते ते या अर्थाने की, विद्यापीठ अनुदान मडळाने सरकारकडे चौकशी केली असती. चौकशीत महाराष्ट्रसरकारच्या अटीचा जुलमीपणा बाहेर आला असता. विधानसभेत प्रश्न विचारता आले असते. नव्या वेतनश्रेणीसबधीची उत्सुकता कळू शकते; पण म्हणून त्यासाठी गुलामगिरी पत्कारायची? म्हणूनच शिक्षकसघटनेने शिक्षकानी करारावर सही करू नये असे पत्रक काढले होते.

पण झाले असे की, कुलगुरु दाभोळकर यानी काही प्राचार्यांच्या मदतीने शिक्षकावर दडपण आणले आणि (बहुतेक) शिक्षक त्याला बळी पडले. पुण्यातील प्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रा. मेहता हे शिक्षकांनी करारावर सही करू नये म्हणून प्रचार करीत होते. त्याना त्यांच्या कित्येक सहकाऱ्यानी कसे फसविले ते पाहण्यासारखे आहे एक ज्येष्ठ प्राध्यापक मेहतांना म्हणाले, 'मेहता, मी तुझ्या सांगण्याबाहेर नाही! हे बघ, मी करारावर सही करून तुला देतो. तू पाहिजे तेव्हा तो करार प्रिन्सिपॉलना दे. मला कटकट नको!' नतर लगेच प्रिन्सिपॉलकडे जाऊन त्यानी कराराच्या दुसऱ्या प्रतीवर सही केली! ज्या ज्या कॉलेजात प्राचार्यांनी थोडीफार हालचाल केली त्या त्या कॉलेजातील ९०% शिक्षकानी जाचक अटी लाद-

णारा तो करार लिहून दिला ही वस्तुस्थिती आहे,

### फाळणीचे प्रकरण

म्हणजे २९–३० साली अशिक्षितात जी अन्यायाची चीड होती आणि त्यासाठी लढण्याची धिटाई होती त्याचा अंशसुद्धा ७५ सालच्या सुशिक्षितांत उरला नाही म्हणायाचा !

मी आपली वस्तुस्थिती सांगतो. त्यानंतर १९७६ च्या मार्च ते ऑक्टोबरपर्यंत शिक्षकवर्गाच्या फाळणीचे प्रकरण झाले.

हे काय प्रकरण आहे, ते जरा समजावून सांगा ना !

काय झाले की, १९७६ साली नवा आकृतिबंध कॉलेजच्या प्रांगणात अवतरला. त्यामुळे पुण्यातील कॉलेजातील प्रीडिग्रीचे वर्ग बंद झाले. त्याऐवजी बारावीचे वर्ग सुरू करण्यात आले. प्रीडिग्री बंद झाल्याने काही शिक्षकांचे काम कमी झाले. अशा शिक्षकांना 'जादा शिक्षक' असे नाव देऊन बारावीकडे टाकण्यात आले. यात गोम अशी होती की, बारावीकडे जाणाऱ्या शिक्षकांना नवी वेतनश्रेणी मिळणार नव्हती ! त्यामुळे सीनियर कॉलेजात कोणी राहायचे व ज्युनियर कॉलेजात कोणी जायचे हे ठरविण्याची पाळी आली. सरकारने या बाबतीत काटेकोर नियम तयार केले; पण तरी भांजा-भतिजा न्यायाने ज्येष्ठ प्राध्यापक व संस्थाचालक यांनी खेकटी निर्माण केलीच.

सांगा बरे एक-दोन चुटके !

एक कॉमर्स कॉलेज आहे. त्यात एक पुढे-पुढे करणाऱ्या, विशाल महिलातही उठून दिसतील अशा शिक्षिका आहेत. त्यांची नेमणूक मुळात कॉमर्स डिपार्टमेंटमध्ये होती. त्या शाखेत त्या कनिष्ठ असल्याने नियमानुसार जादा ठरत होत्या. म्हणून ऐन वेळी त्यांना अकौंटन्सी डिपार्टमेंटमध्ये घालण्यात आले. त्यांच्यापेक्षा वर असलेला तरुण प्राध्यापक जरा चळवळ्या आणि म्हणून प्राचार्यांचा नावडता होता. तेव्हा त्याला १२ वीकडे घालविण्यासाठी नाना घालमेली करण्यात आल्या. याच कॉलेजात ज्याच्या प्रबंधाला सुवर्णपदक मिळाले होते असे मराठीचे प्राध्यापक होते. त्यांना सीनियर कॉलेजात काम राहू नये म्हणून असेच कामाचे खोटे हिशेब दाखविले गेले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे प्राचार्यांच्या या कारस्थानात त्यांच्या पुढ्यातील दोघा शिक्षकांचा सहभाग होता ! अशा अनेक भानगडी सांगता येतील.

पण आपले स्थान टिकविण्यासाठी धडपड कोणीही करणारच !

गुरुजी, ही आपले स्थान टिकविण्याची धडपड नसून दुसऱ्याला खड्डयात घालण्याची कारस्थाने आहेत. खरे पाहता, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे, नवी वेतनश्रेणी सर्व शिक्षकांनी नाकारली असती तर हा प्रश्नच आला नसता. बरे, प्रश्न आल्यावर सर्वांनी शक्यतो एकत्र राहण्याचा प्रयत्न करायचा की, आपल्यातल्याच काही लोकांना खच्ची करायचे ? मध्यंतरी सरकारने असे सुचवले होते की, १२ वीला गेलेल्या आणि वर राहिलेल्या सर्वच लोकांना एक वेतनश्रेणी आम्ही देऊ, पण ती पूर्वी देऊ केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा कमी असेल. या सूचनेचा विचार देखील शिक्षकांनी केला नाही, यावरून काय ते समजा.

हं, मनाला शीण आणणाऱ्याच आहेत सगळ्या गोष्टी.

### उदासीनता

या सगळ्याचे कारण आपल्या देशाबद्दलची, व्यावसायिक हक्काबद्दलची तीव्र उदासीनता हे आहे. पुण्यातील कॉलेजात कित्येक नामवंत प्राध्यापक आहेत; ते साहित्यिक आहेत, सार्वजनिक संस्थांतून काम करणारे आहेत, राजकीय संघटनांतून भाग घेणारे आहेत; पण आपल्या व्यवसायाविषयी एक तुच्छता, कमीत कमी उदासीनता त्यांचे ठिकाणी आहे. आपण एका सायडिंगला पडलेल्या, प्रतिष्ठाहीन धंद्यात आहोत, असे त्यांना वाटते. त्यामुळे असे होते की, साहित्यपरिषदेत हे लोक काम नसता चकाट्या पिटतील, इतिहास-संशोधक मंडळात डोके घालतील, मौंटेनिअरिंगच्या संस्थेच्या उठाठेवी करतील; पण शिक्षकसंघटनेच्या सभेला येणार नाहीत, आपल्या सहकाऱ्यावर झालेल्या अन्यायाची दाद घेणार नाहीत. गोष्टी अगदी साध्या आणि इतरत्र प्रतिष्ठा असलेल्या मंडळींनी लक्ष घातल्यास नीट होण्यासारख्या असतात. पण 'लक्ष घालणे' हे लोक कमीपणाचे समजतात किंवा अशा बाबतीत लक्ष न घातल्यानेच त्यांची तथाकथित प्रतिष्ठा राहते.

असे उडत बोलू नका. स्पष्ट उदाहरणांनी सांगा.

पुण्यातील नामवंत कॉलेजच्या विज्ञानशाखेत एक दादा प्राध्यापक आहेत. यांच्या नात्यांतील एक स्त्री-शिक्षिका त्याच विभागात आहे. दादांची खटपट अशी होती की एका दुसऱ्या शिक्षकाला बारावीकडे टाकून बाईंना सीनियर कॉलेजात ठेवावे. हा अन्याय दूर करण्यासाठी प्राध्यापकसंघटनेच्या एका कार्यकर्त्याने यशस्वी प्रयत्न केले. त्यामुळे दादांचा संघटनेवर राग झाला आणि त्यांनी आपल्या विभागातील शिक्षकांना संघटनेचे सभासद व्हायची बंदी केली. आता कॉलेजातील प्रतिष्ठित प्राध्यापकांनी थोडे लक्ष घातले असते तर दादांच्या कनिष्ठांना धीर आला असता आणि ते संघटनेला मिळाले असते.

एका कॉलेजचे प्राचार्य संघटनेचे कोणतेही कार्य कॉलेजात चालवायला बंदी करतात, धमक्या देतात, अरेरावीने कार्यकर्त्यांशी वागतात. याच कॉलेजात एक साहित्यशौंडही आहेत त्यांनी थोडे लक्ष घातले तर प्राचार्यांच्या गुंडगिरीला आळा बसेल; पण ते होणे नाही.

सामान्य प्राध्यापकांत तर उदासीनता इतक्या पराकोटीला पोचली आहे की तिला मुर्दाडपणा हे नाव शोभेल ७६ च्या अखेरीस एका कॉलेजने प्राध्यापकाच्या पगारातून २५ रु. कापून घेण्याला सुरुवात केली–ओव्हरड्राफ्टच्या व्याजासाठी. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी- संघटनेची सभा बोलाविली. त्याला पुण्यातील सात-आठशे प्राध्यापकांपैकी फक्त चोवीसजण हजर होते. शेवटी या उपस्थितांनी गैरहजर लोकांच्या निषेधाचा ठराव केला !

कीव करण्यापलीकडे ही माणसे पोचलेली दिसतात –

तेव्हा आणीबाणीशी लढण्याचे सोडाच पण साधे संस्थाचालक किंवा विभागप्रमुख यांच्याविरुद्ध न्यायासाठी उभे राहण्याची या बोलघेवड्या मंडळींची हिंमत नाही. आपसात भांडणे, एकमेकांवर कुरघोडी करणे, आजीव लेखकाची मर्जी संपादण्यासाठी त्याची हांजी हांजी करणे यात बहुतेकांची कालक्रमणा होत असते. त्यामुळे यांची संघटना बळकट होत नाही. आपल्या नशिबी हा व्यवसाय आला, हे आपले पाप आहे अशा जाणिवेमुळे आपल्या व्यावसायिक हक्काविषयी यांना पराकोटीची उदासीनता वाटते. अशा स्थितीत हे महाविद्यालयीन शिक्षक स्वतंत्र असण्यास लायक आहेत का ? आणि ही जर आमच्यातल्या शंभर टक्के सुशिक्षित, बोलघेवड्या, मोकळा वेळ असणाऱ्या वर्गाची स्थिती असेल, तर आपण स्वातंत्र्याला लायक आहोत असे म्हणता येईल का ? □

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# वादळ

## नावातच सर्व काही आहे !

'वादळ' हे नाट्यवैभवनं रंगभूमीवर आणलेलं मधुसूदन कालेलकरांचं नवं नाटक. त्याला 'नवं' म्हणताना खरं म्हणजे मला (तरी) अपराध्यासारखं वाटायला हवं; कारण त्यात तसं नवीन काही नाही. छत्तीस घंटे, फरार हे हिंदी सिनेमे (किंवा ते ज्यावरून चोरले ते मूळ विदेशी चित्रपट) आणि कालेलकरांची पूर्वीची नाटकं ज्यांनी पाहिलेली असतील, त्यांना तरी हे वादळ चांगलंच ओळखीचं वाटायला हवं. हिंदी सिनेमाच्याच मॉडेलवर पद्धशीरपणे आणि धंदेवाईकपणे बेतून काढलेल्या या नाटकात ज्या अतिनाटकी घडामोडी घडतात, त्यांना वादळ म्हणणं म्हणजे त्या हिंदी सिनेमाला (किंवा त्याच्यावरच्या नाटकाला) कलाकृती म्हणण्यासारखं आहे. हे तीन अंकी नाटक संपल्यानंतरही अजून एखादा अंक बाकी असेल आणि त्यात तरी हे वादळ होणार असेल अशो आशा मला बराच वेळ लागून राहिली होती.

हे वादळ उल्का (अरुंधती राव) नावाच्या एका सुंदर, सुशील, सुस्वभावी आणि श्रीमंत वगैरे तरुणीच्या आयुष्यात मिलिद (विक्रम गोखले) नावाच्या एका चित्रकारामुळं निर्माण होतं. म्हणजे निदान माझा तसा तर्क आहे. गुंडांपासून वाचण्यासाठी पळत सुटलेली उल्का मिलिद पेंटरांच्या अंगणात येऊन पडते. काही मिनिटांमध्येच दोघेही 'आय् लव्ह यू'वर येऊनही दौलतकी जालिम दीवारे बीचमें खडी राहिल्यामुळं उल्काचं लग्न असिस्टंट पोलिसकमिशनर संजय (सुधीर दळवी) यांच्याशी लागतं. त्यानंतर परागंदा झालेला मिलिद सातआठ वर्षांनंतर तिच्या जीवनात (व घरात) घुसतो तो आश्रयाला आलेला एक खुनी म्हणून. त्यामुळे मिलिद–उल्का ऊर्फ सौ. आशा–संजय यांच्यात अनुक्रमे भावनिक व पोलिसी झगडे सुरू होतात वगैरे. शेवट काय व्हायचा तोच होतो. यावर उल्लेखिलेल्या संघर्षालाच लेखकानं वादळ असं म्हटलंय असं वाटतं; पण त्यात संघर्ष बेतास बात असून वादळानंतरचाच भाग म्हणजे (भावनांचा वगैरे) पाऊस भरपूर दिसतो. असि. पो. क. संजयसुद्धा नुकताच सानेगुरुजींच्या गोष्टीतनं उडी मारून बाहेर आलेला असावा इतका मऊ सूत आहे. नाटकाच्या नावातच सर्व काही आहे असं मी प्रारंभी म्हटलं ते त्यामुळंच.

नाटकात लेखनदृष्टया नवीन काही करायला कालेलकरांना फारसा वावच राहिलेला नाही. त्यामुळे तुळशीवृंदावनापासून सुरुवात करून सगळा जुनाच हिट मालमसाला त्यांनी बेमालूम दडपला आहे. 'मी जास्त बडबड करणार नाही' अशा प्रस्तावनेसह (प्रेक्षकांचे) कान किटेपर्यंत बडबड करणारी रेखा (शीला वालावलकर) हे मिलिदच्या बहिणीचं 'पात्र' हे अशा मसाल्याचं एक उदाहरण. (अशीच एक व्यक्तिरेखा शोलेमध्ये पाहिल्याचं मला आठवतंय्; पण तो अर्थातच केवळ योगायोग असणार.) नाटकाच्या पहिल्या अंकाचा काव्यवेदीवर बळी देण्यात आलेला आहे. दोघेही प्रेमिक तर काव्यात बोलत असतातच, पण तेवढ्यानं पुरं होणार नाही म्हणून चक्रधर (?) नावाचा एक मिलिदमित्रमजनू काही भग्नकाव्यं माथी मारून जातो. नेहमीच्या कोटयातली चंद्रचांदण्यानक्षत्रंरातराणी पुरी पडणार नाहीत म्हणून 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात' अशी कुसुमाग्रजांची एक कविता संदर्भ सोडून घुसडली आहे. वर 'सूर्यप्रकाशात फुलं उमलत असली तरी स्वप्नं कोमेजतात,' अशा चमकदार काव्यमय वचनांचा आणि सुभाषितांचा चिगूर मध्येमध्ये सफाईनं पेरला आहे. रुचिपालट म्हणून 'Kiss a miss but never miss a kiss' अशी पिढिजात शाब्दिक कसरतींची साखरपेरणी केली आहे. मॉडर्न आर्टबद्दलचे जुनेच जोक्स नवं पाणी देऊन खपवले आहेत. पुढचे दोन अंक त्यामानानं सुसह्य होतात. कारण बडबड कमी होऊन, तेच तेच का होईना पण रंगमंचावर काही ना काही घडत राहतं.

अरविंद देशपांडे यांचं ठाकठीक, व्यावसायिक झिलई आणून देणारं दिग्दर्शन व विक्रम गोखले यांचा सहज, बराचसा अकृत्रिम अभिनय या दोनच गोष्टी वादळाच्या जमेच्या बाजू म्हणून उल्लेखिता येतील. नाटक सुसह्य करण्यात या दोघांचा हातभार खूप मोठा आहे. अरुंधती राव यांनी दुसऱ्या व तिसऱ्या अंकातली सौ. संजयची भूमिका ठीक वठवली आहे. पहिल्या अंकातला त्यांचा अल्लडपणा हा अल्लडपणा न वाटता अधंवटपणा वाटतो. राघवेंद्र चौहान अर्देसर पारश्याच्या भूमिकेत शोभून दिसतात. इतर कशाचाच उल्लेख करीत नाही. कारण ते संयम सोडण्याचं निमंत्रणच ठरेल ! □




# अवती-भवती : पृष्ठ ३ वरून

पूर्ण ओळखली असून अत्यंत जबाबदारीने तो काम करीत आहे. उद्योग-मंत्रालयाची सूत्रे हाती घेतल्यावर त्याने जे धोरणविषयक भाषण लोकसभेमध्ये केले त्याला भरपूर दाद मिळाली. आणि अगदी विरोधी पक्षानीही जॉर्जची तारीफ केली. जॉर्जबरोबर त्यांची तुलना होऊच शकत नाही. कारण दोघा भोवतीही एक प्रकारचे कौतुकाचे वलय असले तरी जॉर्जची तळमळ, व्यासंग यांचे आणि राजनारायणजीचे वावडे आहे. त्याचे भाषण ऐसपैस पसरलेले असते आणि नेमक्या मुद्द्याचाच ठावठिकाणा नसतो. हरिजनावरील अत्याचाराचे भांडवल करून गृहमंत्र्याविरुद्ध मोहोळ उठविण्यात आले तेव्हा राजनारायणजींनी गृहमंत्र्यांच्या समर्थनार्थ चांगले तासभर भाषण केले. त्यांच्या भाषणाने सभासद विलक्षण 'बोअर' झाले. आम्ही टीका आवरतो पण तुम्ही भाषण आवरा असे म्हणण्याची वेळ त्यानी आणली. तासभर भाषण केल्यावर कॉंग्रेसच्या वसंत साठे यांनी त्यांना विचारले की, 'तुम्हाला नेमके म्हणायचे तरी काय होते?' आणि त्यांनी उत्तर दिले-'मला तरी नक्की कुठे माहीत आहे ? खूप मोठे भाषण केले तरच अपेक्षित परिणाम होतील असे वाटल्याने मी बोलत राहिलो इतकेच.'

राजनारायणजीचा विक्षिप्त पोशाख किंवा त्यांची भाषण करण्याची अनोखी पद्धत यावरून कोणी त्याचे मूल्यमापन किंवा राजकीय स्थान निश्चित करू नये. कारण तसे केले तर फसगत झालीच असे खुशाल समजावे. उत्तरेकडील राजकारणाचे एक बळस्थान चौधरी चरणसिंग याचा त्यानी विश्वास संपादन केला आहे. आणि त्याच्या पाठिंब्याचे पाठबळ घेऊन ते राजकारण करीत असतात. अगदी अलीकडेच उत्तर प्रदेशामध्ये मुख्य मंत्रीनिवडीसाठी जे राजकारण चालू होते त्या वेळी राजनारायणजीनी एक अजब नाटक केले. आपले प्रतिस्पर्धी जुन्या कॉंग्रेसचे नेते चंद्रभान गुप्ता याच्या घरी जाऊन त्यानी त्यांच्या पायांवर लोटांगण घातले. गुप्ताजी गोंधळले; पण राजकीय चर्चा करण्याचे नाकारून त्यांनी राजनारायणजीना आपले घर सोडण्याचा आदेश दिला. आता असे सांगितले जाते की त्याना चंद्रभान गुप्तांची गाठ घेणे तर अपरिहार्य होते; परंतु त्यांच्याशी कोणतीही चर्चा करण्याची तर इच्छा नव्हती. कारण चर्चेमुळे काही राजकीय देवाण-घेवाण करणे भाग पडले असते. या प्रसंगातून सुटका व्हावी म्हणून मग त्यानी नमस्काराचे नाटक केले आणि गाठ घेऊनही चंद्रभान गुप्ता याच्याबरोबर चर्चा न करण्याचा आपला कार्यभाग साधला. लोकसभेच्या रायबरेली मतदारसंघामधील सर्व उमेदवार त्यांनीच ठरवले आणि विधानसभा निवडणुकामध्ये त्याच्या उमेदवाराचा पराभव करून कॉंग्रेसचे उमेदवार विजयी झाले. राजनारायण यानी राजिनामा द्यावा अशी मागणी विशेषतः विरोधीपक्षाने केली; परंतु ही मागणी मूळ धरू शकली नाही. राजकारणामध्ये दर्शनी हाल-चालीमध्ये त्याचा वाटा नसला तरी पडद्यामागे राहून सूत्रे हल-वण्याची जबाबदारी त्याच्यावर अनेक वेळा सोपविण्यात येते आणि ही जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतात. असे असले तरी लोकसभा-निवडणुका झाल्याबरोबर राजनारायण याना जनता-पक्षामध्ये जे स्थान होते ते स्थान आज नाही ही वस्तुस्थिती आहे. माजी पतप्रधानांचा पराभव करून लोकसभेमध्ये आलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेटदर्जाचे मंत्रिपद भूषविणाऱ्या राज-नारायणजीच्या विदुषकी चाळ्यानी पक्षप्रतिमेला छेद जातो असे अनेकांना वाटते आणि असले दरबारी विदूषक जनतापक्षाला परवडण्यासारखे नाहीत असेही अनेकांना वाटते. त्यामुळेच राज-नारायणजीनी योग्य तो बोध घेतला नाही तर मंत्रिमंडळविस्ताराचे वेळी आरोग्यखात्याची धुरा अन्य कोणाकडे तरी सोपविलेली असेल आणि खासदारकीची झूल मिरवीत काम करण्यास राजनारायणजी मोकळे राहतील.-अशी परिस्थिती येऊ नये यासाठी चरणसिंग विशेष जागरूक आहेत. स्वतः राजानारायण मात्र मंत्रिपदाला फारशी भीक घालीत नाहीत. ◻

## ◻ काश्मीरमधील जनतापक्ष

विधानसभा-निवडणुकांच्या वेळी जनतापक्षाने शेख अब्दुल्ला यांच्याबरोबर सहकार्य टाळले. त्या वेळी जनतापक्ष स्वतःच्या ताकदीवर तेथे उभा राहील असा अनेकाचा अंदाज होता. जनता-पक्षाचे अनेक नेते काश्मीरमध्ये गेले; परंतु त्या वेळी हृदयविकाराने अंथरूण पकडलेल्या शेखची गाठ घेण्याची गरजही त्याना भासली नाही. जनतापक्ष सत्तेवर आला नाही तरी घवघवीत यश मिळवील असे जे अंदाज जनतापक्षाच्या नेत्यांनी बांधले होते ते धुळीला मिळाले. जनतापक्ष फेकला गेला, कॉंग्रेसची धुळधाण उडाली आणि रुग्णशय्येवर पडलेल्या शेखसाहेबांनी बाजी जिंकली. त्यांच्या हया-तीत त्यांना टाळून काश्मीरचे राजकारण करणे कोणालाही शक्य नाही याची त्यानी प्रचीति आणून दिली. आता निवडणुकांचे कवित्व संपल्यावर जी पक्षसंघटना पहावयास मिळते आणि जनतापक्षाचे जे नेतृत्व उभे करण्यात आले होते त्याचा तपशील पहावयाचा झाल्यास काही प्रमुख नेतेमंडळीची दखल घेणे अपरिहार्य ठरते. या नेतेमंडळींची पार्श्वभूमी, त्यांचा राजकीय विचार याची दिशा जोखली म्हणजे जनतापक्षाची काश्मीरमध्ये का वाताहत झाली ते लक्षात येते.

### शमीम अहमद शमीम :

शमीमसाहेबाचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे जो सत्तास्थानी असेल त्याच्या मागेमागे राहणे. त्याच्या या धोरणाप्रमाणे त्यानी बक्षी गुलाम अहमद, मीर कासीम, शेख अब्दुल्ला यांची साथ निभावली आहे. शेखसाहेबांशी तर त्याची इतकी जवळीक की त्याच्या आशी-र्वादाने काश्मीरचे उद्याचे पंतप्रधान अशी त्यानी स्वतःची प्रतिमा

निर्माण केली. लोकसभा–निवडणुकीच्या वेळी त्यांना नॅशनल कॉन्फरन्सचे तिकिट हवे होते ते शेखसाहेबानी नाकारल्यावर स्वारी जनतापक्षाच्या तबूमध्ये येऊन दाखल झाली. आणीबाणीविरुद्ध शमीम यानी कडवट टीका केली असली तरी याच काळामध्ये ते आणीबाणी उत्साहाने राबविणाऱ्या नामदार विद्याचरण शुक्ला यांचे विशेष स्नेही होते इतकेच नव्हे तर परदेशामध्ये जाऊन त्यानी आणीबाणीची तारीफच केली होती.

## पी. एन. बझाझ

काश्मिरी पंडित म्हणून बझाझ याना जनतापक्षाच्या अस्थायी समितीमध्ये स्थान देण्यात आले; पण काश्मिरी हिंदूमध्ये या गृहस्थाना जराही स्थान नाही. ब्राह्मणविरोधी, हिंदुविरोधी आणि भारतविरोधी उदंड लिखाण त्यानी केले आहे. गीतेवर टीका करणारे एक पुस्तक त्यानी लिहिले असून, या पुस्तकावर असंख्य हिंदु नाराज आहेत. शेखसाहेबाच्या मागेमागे करून आपल्या पोळीवर तूप ओढणाऱ्या या नेत्याच्या एका नातेवाइकाला शेखसाहेबानी सहकार्य करण्याचे नाकारल्यावर ते जनतापक्षामध्ये आले आणि अस्थायी समितीचे सदस्य झाले.

## मौलाना मसुदी

जनतापक्षाच्या अस्थायी समितीचे अध्यक्षपद भूषविणारे हे मौलाना मसुदी शेख अब्दुल्ला यांचा पाठपुरावा करणाऱ्या गुजरसमाजामधील आहेत. त्याना हिंदु आणि मुस्लिम समाजामध्ये अनुयायी नाहीत. अनेक घातपाती कृत्याशी त्याचा संबंध होता. पाकिस्तानबरोबर त्यांचे आतून सूत असल्याचे बोलले जाते. शेख अब्दुल्लाचे आणि त्यांचे मात्र फारसे जमत नाही आणि नेमक्या याच गोष्टीमुळे त्याना जनतापक्षामध्ये स्थान आणि महत्त्वपूर्ण खुर्चीही मिळाली.

## मौलाना इफ्तकार हुसेन अन्सारी

ज्याला सर्वसाधारण जनतेचा पाठिंबा आहे असा काश्मीरमधील जनतापक्षाचा हा एकमेव नेता. या मौलानासाहेबाचे निवडणुकीमधील यश ही जवळजवळ निश्चित गोष्ट होती आणि तरीही त्याचा पराभव झाला ही कडवट वस्तुस्थिती आहे त्याबाबत असे सांगितले जाते की, त्याच्याबद्दल लोकाना आदर असला तरी लोकसभा निवडणुकाच्या निकालानंतर त्यानी काँग्रेसपक्षाचा त्याग केला ही गोष्ट अनेकाना आवडली नाही. त्याच्या लोकप्रियतेवर या गोष्टीचा विपरीत परिणाम झाला आणि निवडणुकीमधील फटका त्याना सहन करावा लागला. शिवाय असेही म्हटले जाते की वातावरण बदलले तर ते सरळ पुन्हा काँग्रेसमध्ये येऊन दाखल होतील.

## अब्दुल ग्यानी लोन

आपल्या मतदारसंघाची काळजी वाहणाऱ्या या नेत्याने विधानसभा-निवडणुकीमध्ये विजय मिळविला आहे. झपाट्याने पक्षबदल हे काश्मिरी राजकारणाचे वैशिष्ट्य त्यानीही जोपासले आहे. प्रथम काँग्रेस, मग शेख अब्दुल्ला आणि आता जनता असा त्यांचा प्रवास आहे. काँग्रेस मंत्रिमंडळामध्ये काही काळ त्यांनी मंत्री म्हणून काम केले आहे. जनतापक्षाच्या निवडणुकीनंतरच्या प्रमुख नेत्यांमध्ये त्याचा समावेश होतो.

## मौलवी फरुक

जवळजवळ साठ हजार कार्यकर्त्यांचे पाठबळ असलेले तरुण मौलवी फरुक जनतापक्षामध्ये सामील झाले नव्हते तरं त्यानी बाहेरून जनतापक्षाला पाठिंबा दिला होता. अवामी अॅक्शन कमिटी या संस्थेची सूत्रे त्याच्या हाती आहेत. या संस्थेने काश्मीर व पाकिस्तान यांचे विलिनीकरण व्हावे असा सतत पुरस्कार केला होता. 'बकरा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या काश्मिरी मुसलमानगटाचे मौलवी फरुक नेतृत्व करतात. शेख अब्दुल्ला याच्या नेतृत्वाखालील शेरगटाबरोबर त्यांचा सतत संघर्ष चालू असतो.

व्यक्तिगत स्वार्थ आणि जातीय राजकारण या दोन हेतूनी एकत्र आलेल्या मंडळींनी जनतापक्षाची सूत्रे सांभाळली आणि काश्मीरमधील शेख अब्दुल्लाची वाट सोपी करून दिली. वास्तविक काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे हे सत्तास्थान स्वीकारताना शेखसाहेबांनी मान्य केल्यामुळे, तसेच अन्नधान्यासाठी दिलेले सहकार्य नाकारल्यामुळे काश्मिरी जनता शेख अब्दुल्ला याच्यावर नाराज होती. काही भारतीय उद्योगपतीना काश्मीरमध्ये व्यवसायासाठी ९० वर्षांच्या कराराने जमीन उपलब्ध करून देण्याची त्याची योजनाही काश्मिरी जनतेला आवडली नाही; पण या गोष्टीचा राजकीय लाभ मिळविणे जनतापक्षाला जमले नाही. तिकिटवाटपाच्या वेळी ज्यानी भारतीय लोकशाहीचा सतत पुरस्कार केला ते लोक नाकारले गेले. जनसंघ आण भारतीय लोकदलाच्या संभाव्य विजेत्याना तिकिटे नाकारली गेली. जम्मूविभागामधील ३२ जागापैकी जनतापक्षाला २५ जागा जिंकणे सहज शक्य होते, परंतु तिकिटवाटपाच्या वेळी अस्थायी समितीने भरपूर गोंधळ घातले आणि जनतापक्षाची केंद्रीय कचेरी प्रचारसभासाठी मोठमोठे नेते पाठविण्यापलीकडे काही करू शकली नाही. काश्मीरच्या बाबतीतील हा निष्काळजीपणा निश्चितपणे महागात पडणारा आहे. □

---

# □ आसामच्या मुख्य मंत्र्यांचे प्रकरण

आपले राजकीय स्थान बळकट करण्यासाठी प्रचंड आर्थिक साम्राज्य निर्माण करण्याची वृत्ती केंद्रस्थानी सत्ता सांभाळणाऱ्या नेत्यानी दाखविल्यावर बघता बघता प्रांतोप्रांती हे लोण पोचले. तिकडे दूरवर असलेल्या आसामच्या शरदचंद्र सिन्हा यानीही मग आपल्या मान्यवर नेत्यानी हीच वाट यशस्वीपणे तुडविली. असे सांगतात की, सिन्हाबाबूनी गौहत्ती येथे झालेल्या काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनाच्या वेळी कोटयवधी रुपये गोळा केले. याबाबत चौकशी करावी अशी मागणी अनेक आमदारानी केंद्रसरकारकडे केली असून विविध आरोप असलेले एक शभर पानी निवेदनही सादर केले आहे.

या निवेदनामध्ये व्यक्तिगत स्वार्थासाठी राजकीय सत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप करण्यात आला असून काही उदाहरणे देण्यात आली आहेत. बांगला देशाच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळी मोठा निधी जमविण्यात आला आणि त्याचे हिशेब कधीही देण्यात आले नाहीत. श्री. सिन्हा हे या समितीचे अध्यक्ष होते. हा निधी उभारला गेल्यानंतर त्यांची आर्थिक स्थिती एकदम सुधारल्याचे नमूद करण्यात आले आहे या संपूर्ण निवेदनाचा तपशील ऑर्गनायझरने दिला असून त्यावरून गेल्या काही वर्षांमध्ये आसामच्या मुख्य मंत्र्यांनी किती अफाट सपत्ती जमविली याची झलक पाहावयास मिळते.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी श्री. सिन्हा हे मिलिटरीला अंडी, कोंबड्या, शेळ्या पुरविण्याचा व्यवसाय करीत असत. १९७१ मध्ये ते मुख्य मंत्री झाले. त्यापूर्वी सुमारे १५ वर्षे त्यानी गोहत्ती बँकेकडून ४० हजार रुपयाची रक्कम कर्जाऊ घेतलेली होती. १९७१ पर्यंत ते या रकमेपैकी केवळ ३६ हजार रुपये परत करू शकले; परतु त्यांनी मुख्य मंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर केवळ तीनच महिन्यानी त्यांचे चिरंजीव अपूर्व यानी व्याजासुद्धा सर्व रकमेचा भरणा करून वडिलाना कर्जमुक्त केले. श्री. सिन्हा याचे अनेक व्यापारीमंडळीशी संबंध आहेत. यांपैकी कित्येक व्यापाऱ्यांना राज्यसरकारने अवाजवी सवलती दिलेल्या आहेत. श्री. घै नावाच्या कॉन्ट्रॅक्टरला अनेक सरकारी कामे देण्यात आली. आसाम राज्य वाहतूकमंडळाची जोरहट येथील इमारत अर्धीमुर्धी सोडल्यावरही त्याला रकमेची उचल घेण्याची सवलत देण्यात आली. कारण मुख्य मंत्री सिन्हा यांची तशी इच्छा होती. श्री. सिन्हा यानी श्री. घै याना राज्यसरकारच्या अनेक बांधकामाचे कॉन्ट्रॅक्ट नियम मोडून दिले. श्री. महादेव खाकालिया नावाचे दुसरे एक उद्योगपती आहेत. सरकारदरबारी कोणा उद्योगपतीचे काही काम असले की, त्याने ते या महादेवभाईंना सांगावे. योग्य त्या दक्षिणेची व्यवस्था करावी आणि चार–आठ दिवसातच त्याचे काम मार्गी लागावे असेही अनेक वेळा झाले आहे. सरकारदरबारी कोणतेही काम करून घेण्याच्या हातोटीमुळे महादेवभाईंनी चांगलीच लोकप्रियता संपादन केली आहे.

## मुख्य मंत्र्यांचा खाना

निवेदनामध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, महादेवभाई मुख्य मंत्र्याना खाना देण्याची व्यवस्थाही सांभाळतात. गोहत्तीच्या फॅन्सी बजारमधील उत्तम खाना तेथून १२ किलोमीटर लाब असलेल्या दिसपूर येथील मुख्य मंत्र्याच्या निवासस्थानी पोचविण्याची कामगिरी महादेवभाई जातीने करतात. महादेवभाईंचा प्लायवूडचा व्यवसाय असून त्यांनी सुमारे १·५० कोटी रुपयांचा कर बुडविला असल्याची दप्तरी नोद आहे आणि तरीही मुख्य मंत्र्याच्या आशीर्वादाने हे महादेवभाई सन्मानाने सर्वत्र मिरवीत असतात. दुगळ नावाच्या एका प्राध्यापकाना दरमहा तीन हजार रुपये वेतन देऊन सरकारी सेवेमध्ये घेण्यात आले. मुख्य मंत्र्याचे जामात रिपुंजय बोरा यांना शासकीय मदतीची द्वारे खुली करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविण्यात आली. कोणतीही विशेष गुणवत्ता नसताना मुख्य मंत्र्यांचे जामात शासकीय खर्चाने इंग्लंडचा दौरा करून आले. इकडे जावई परदेशदौऱ्यावर असताना मुख्य मंत्र्याचे चिरंजीव नाना प्रकारे द्रव्य गोळा करण्याचे कार्य नेटाने करीतच होते. स्वत:ला आसामचा संजय गांधी म्हणवून घेणाऱ्या या अपूर्व सिन्हाचा कोणताही म्हणण्यासारखा व्यवसाय नसताना त्यांच्या नावे बँकेमध्ये १५ लक्ष रुपयाची रक्कम जमा आहे. मोठा व्यापार नाही, महत्त्वपूर्ण राजकीय स्थान नाही आणि तरीही या अपूर्वबाबूंनी गेल्या एक वर्षामध्ये गोहत्ती–दिल्ली अशा ५४ हवाईवाऱ्या केलेल्या आहेत. शासकीय काम अडले असले आणि महादेवभाईंमार्फत ते होऊ शकले नाही तर त्याला अजून एक मार्ग आहे आणि तो म्हणजे अपूर्व सिन्हा यांची मर्जी संपादन करणे. एकदा त्याचा वरदहस्त लाभला की, न होण्यासारखे काम आसाममध्ये नाही इतका या अपूर्वबाबूंचा दरारा आहे. आरोपपत्रामध्ये अन्य भरपूर आरोप आहेत. व्यक्तिगत मर्जीमुळे भरभराट झालेली, तसेच प्रामाणिकपणे एखादे प्रकरण धसाला लावल्यामुळे ससेहोलपट पदरी आलेली अनेक प्रकरणे नावनिशीवार आहेत. केंद्रसरकारच्या गृहखात्याने हा अहवाल अभ्यासासाठी हाती घेतला असून प्रथम दर्शनी चौकशी करण्याइतका पुरावा हाती आल्यास चौकशीची चक्रे फिरू लागणार आहेत. □




**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १३।८।७७ ते १९।८।७७

### इंदिरा गांधींना ग्रहांची अनुकूलता नाही

भारताच्या भूतपूर्व पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा प्रकाशात येण्याची धडपड करीत आहेत, कर्क लग्न व मकर रास या दोन्ही राशींना राजकारणाच्या दृष्टीने कोणतीच अनुकूलता नाही. दि. १६ ला सिंह राशीतील रवीप्रवेश इंदिराजींना फारसा अनुकूल नाही. अपयश, निराशा, शारीरिक अस्वस्थता हे आठव्या रवीचे फळ आहे. पंतप्रधान मोरारजी देसाई व श्री. यशवंतराव चव्हाण यांना हा रवी अनुकूल तर आहेच; पण परराष्ट्रमंत्री श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना तो भाग्यस्थानी येत आहे. त्यामुळे हे नेते अधिक जवळ येण्याची शक्यता आहे. जनतापक्षातील अतर्गत तंटेबखेडे या रविबदलानंतर बरेच आटोक्यात येतील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला राजकीय अलिप्ततेचा फेरविचार करावा लागेल व जनतापक्षाबरोबर सहकार्याच्या बोलण्याला अधिक चालना मिळेल. केंद्रसरकारच्या कारभारात आशादायक बदल जाणवेल चरणसिंगाचे नाव पुन्हा भारताच्या राजकारणात गाजेल त्याचे व्यक्तिमत्त्व वादग्रस्त ठरले तरी त्याचा विरोधकांना वचक निर्माण होणार आहे व्यापारी-उद्योगपतींवर अधिक दडपण निर्माण होणार आहे. महाराष्ट्रात राजकीय खळबळ निर्माण होईल.

---

### मेष : अनुकूल बदल

तुम्हाला बाराव्या केतूची झळ थोडीफार लागतच असेल; पण तेवढ्यामुळे तुम्ही डळमळून जाण्याचे मुळीच कारण नाही. दिनांक १६ रोजी रवि शनीपासून दूर जाणार असून तो तुम्हाला पाचवा होणार आहे. या बदलापासूनच तुमचे सारे तंत्र बदलू लागणार आहे. तुमच्या कोणत्याही प्रयत्नाला प्रतिसाद मिळणार आहे. व्यावसायिक क्षेत्रात अनुकूल बदल होऊ लागणार आहेत. ज्याच्याबरोबर तुमचे संबंध आजवर कटुतेचे राहिले होते, त्यांच्याबरोबर स्नेहाचे संबंध जुळून येणार आहेत आर्थिक परिस्थितीचा ताण खूपच कमी होणार आहे. नोकरीत आस्था निर्माण होईल शुभ ८–१०.

महिलांना : कोणताही व्यावसायिक कोर्स सुरू करा.

विद्यार्थ्यांना : नवीन अभ्यासक्रमात यश येईल.

### वृषभ : समाधान कमी

तसे या वेळी तुम्हाला कोणतेच ग्रह वाईट नाहीत; पण सुखस्थानी दि. १६ ला रवी पदार्पण करीत आहे तो काहीही कारण नसताना तुमचे मानसिक समाधान हिरावून घेणार आहे. अर्थातच असे असले तरी या वेळी तुम्हाला कोणताही ग्रह माघारी येऊ देणार नाही हे लक्षात ठेवा. थोडी अडचण झाली, कामाला विलंब झाला तरी कोणत्याही क्षेत्रात तुमचे पाऊल पुढेच पडणार आहे. व्यवसायाच्या क्षेत्रात भरीव प्रगती होणार आहे. राजकारणात तुमची सरशी होईल. नोकरीत समाधानकारक प्रगती. पगारवाढ, वरिष्ठांची मर्जी यांचा प्रत्यय येणार आहे. शुभ ६–१०

महिलांना नृत्यसंगीत व नोकरीत यश.

विद्यार्थ्यांना : अनेक लोकांकडून स्तुती होईल.

### मिथुन : त्रास संपला

या आठवड्यापासून तुमच्या कर्तृत्वाला नवे क्षेत्र लाभणार आहे बौद्धिक कर्तृत्वाला संधी मिळेल अल्प बदल या वेळी संभवतो, बाराव्या मंगळाची उग्रता या वेळेपासून कमी होऊ लागणार आहे अर्थातच खर्च अजून तरी आटोक्यात ठेवणे जड जाणार असले तरी तोडमिळवणी होईल उद्योगाच्या वाढीच्या योजना कार्यान्वित होतील. दिनांक १६ चा रविबदल खूपच उपकारक ठरावा हाती घेतलेल्या कामात मित्रांचे सहकार्य मिळेल उद्योगधंद्याचे क्षेत्र विस्तारेल. चालू धंद्यात आजवर झालेल्या नुकसानीची भरपाई करून घेता येईल. नोकरीत कामाचा ताण राहील; पण कार्यक्षमताही राहील. शुभ ९–१०

महिलांना : संसारात स्नेहपूर्ण वातावरण राहील.

विद्यार्थ्यांना : अभ्यासात दोन पावले पुढे राहाल.

### कर्क : अडचणीवर मात

तुमच्या राशीतून आता रवि बाहेर पडत आहे. राशीत भिन्न दोन शत्रूंची आता फाटाफूट होत आहे ही उपकारक ठरावी. गुरु बारावा तो आर्थिक बाजू सावरणार नसला तरी तो कमकुवत देखील करणार नाही. फक्त आळस, नैराश्य असे काही तरी अधूनमधून घडत राहील; पण ते तात्पुरते असेल. त्याचा दीर्घकाळ परिणाम राहणार नाही. अडचणी आल्या तरी त्या दूर होतील. रेस व लॉटरीच्या मार्गाने पैसे हाती येतील. तुमचे जन्मवेळेचे ग्रह चांगले असले तर नशीब उदयाला येईल. नोकरीत अनुकूलता आहे. वरिष्ठांच्या मर्जीचा अनुभव येईल. दूरच्या ठिकाणी झालेली बदली तहकूब करून घेता येईल. शुभ. ११–१२

महिलांना : आरोग्याची काळजी घ्या.

विद्यार्थ्यांना . कलाविषयाचे आकर्षण राहील.

### सिंह : प्रकाश दिसेल

शनीच्या त्रासातून अजून काही दिवस तरी तुमची मुक्तता होणार नसली तरी तुमच्या भोवतीचे अडचणीचे धुके मात्र आता विरू लागले आहे दि. १६ च्या सिंहरविपासून याचा प्रत्यय येऊ लागणार आहे. सार्वजनिक जीवनात तुमचे घसरलेले स्थान पुन्हा प्रस्थापित करण्याची संधी तुम्हाला मिळणार आहे. हाती पैसा टिकला नाही तरी पैसा मिळण्यास अडचणी नाहीत. परिश्रमाचे फळ पदरात पाडून घेणे हे तुमच्या वृत्तीवर अवलंबून राहील. सहकार्याची भावना ठेवल्यास बराच लाभ होईल. नोकरीत बढतीबदलीची शक्यता वाटते. आरोग्याची काळजी मात्र घेणे आवश्यक आहे. सर्वसामान्य आठवडा अनुकूल आहे. शुभ. १५–१६.

महिलांना . सन्मानाचे प्रसंग येतील.

विद्यार्थ्यांना : मनोकामना पूर्ण होतील.

### कन्या : खर्च वाढेल

भाग्यस्थानी मंगळ, दशमात गुरु, अकरावा शनी अशी मोठी गमतीशीर ग्रहपरिस्थिती आहे. कोणत्याच बाबतीत पाऊल मागे घ्यावे लागणार नाही. राशीतील राहू तब्येत किरकोळ ठेवणार आहे; पण कार्यक्षमता वाढविणार आहे. हातून कामाचा

उरक चागला होईल कुणाकडून फारसे सहकार्य अपेक्षू नका. कारण ते मिळणे नाही; पण स्वत:च्या कर्तबगारीने इतरांना चकित कराल धद्याची परिस्थिती सुधारेल. दुय्यम धंद्याला चालना मिळेल नोकरीत वरिष्ठाची सर्वसाधारण मर्जी राहील. तुमची खूप दवसाची मागणी सफल होण्याची शक्यता निर्माण होईल. दि. १६ च्या सिंहराशीतील रविप्रवेश खर्च वाढवील. शुभ १४-१७

**महिलांना :** कौटुबिक वातावरण बरेच अनुकूल राहील.

**विद्यार्थ्यांना :** यशाची चढती कमान

**तूळ : नोकरीत लाभ**

शनी दहावा ही एकच गोष्ट तुमच्या बाबतीत एवढी अनुकूल आहे की, इतर कोणत्याच ग्रहांनी सहकार्य दिले नाही तरी त्याची पर्वा तुम्ही करू नका. नोकरीत लाभदायक घटना घडणार नाहीत कामात अनुकूल बदल, तसेच प्रमोशन-बढती अधिकारवाढ असे काही तरी घडेल. दि १६ पासून रवी सिंहराशीत स्वगृही प्रवेश करीत आहे. तो अकरावा होत आहे. तो आर्थिक बाजू बरीच समाधानकारक ठेवणार आहे. व्यापारात लाभ होईल खते, औषधे, कापड, सोने-चादी या वस्तु-व्यापाऱ्याना लाभदायक ठरतील रेसमध्ये लाभ होईल. कौटुबिक आनद मिळेल शुभ १६-१८.

**महिलांना :** ससारात आनंददायक घटना घडतील

**विद्यार्थ्यांना :** सिनेमा-नाटकांचे आकर्षण निर्माण होईल.

**वृश्चिक : प्रवास घडेल**

राशिस्वामी मगळ चद्रासमोर आहे. त्यामुळे तुमचे स्थान उंचावले आहे सामर्थ्य वाढले आहे. व्यक्तिमत्त्व प्रभावी झाले आहे. या वेळी दिनाक १६ ला रवी सिंहराशीत जात आहे. त्याची कृपा बरेच काही घडवून आणणार आहे. चालू नोकरीत आशादायक वातावरण राहील. वरिष्ठाची मर्जी वाढून अनेक दिवस लाबणीवर पडलेली एखादी गोष्ट चटकन जमून जाईल. धद्यात नवे स्थित्यंतर घडवून आणता येईल. कर्ज वा इतर मदत मिळण्यात अडचण पडणार नाही. नव्या योजना पुऱ्या करता येतील. नोकरीत अनेकाचे सहकार्य लाभेल प्रतिष्ठा वाढेल. कार्यक्षमतेने अगावर पडलेली जबाबदारी पार पाडता येईल. उत्पन्नात वाढ होईल. उद्योगात त्रास नाही बेकाराना लाभ. शुभ १६-१७.

**महिलांना :** संसारात प्रेम निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना ·** मनाची अस्वस्थता बरीच कमी होईल

**धनु : स्थित्यंतराची चाहूल**

तुमचे *समाधान होत नाही त्याला दैव* जबाबदार नाही तुम्ही आलेली संधी दवडली तर मागाहून पश्चात्ताप होणारच. म्हणून भाग्यचक्र तुमच्या दिशेने वेगाने फिरत आहे त्याचे स्वागत करा अंग झटकून नवे घडविण्यास तयार राहा चद्रासमोर गुरू आहे तो राशिस्वामी असल्यामुळे सामान्यत: अनेकाचे सहकार्य मिळणार आहे. पत्नीचे सहकार्य व मदत मिळेल तुमच्यापैकी एखादा भाग्यवान, प्रेमिक बनण्याचा संभव आहे *संसारात आनद राहील. धद्यात तेजीच* राहील. व्यापार आतबट्ट्याचा होणार नाही. एखादी महत्त्वाची घटना घडून तुमची प्रतिष्ठा उंचावेल. नोकरीत वरिष्ठाची प्रवृत्ति तुमच्या गुणाचे चीज करण्याकडे राहील. नवी एखादी जबाबदारी सोपविण्यात येईल शुभ-दि-१३-१६.

**महिलांना :** कौटुबिक वातावरण मजेदार राहील

**विद्यार्थ्यांना ·** अभ्यासात प्रगती होईल.

**मकर : धाडस नको**

सध्या तरी तुमच्या हिताची सारी सूत्रे मगळाच्या हाती आहेत. मगळ पाचवा आहे. ही एक सामर्थ्यशाली ग्रहपरिस्थिती होय. तरी पण राजकारणाचा कारक ग्रह रवि लवकरच सहकार्य देण्याचे नाकारणार आहे. दि. १६ पासून त्याचे सहकार्य तुम्हाला कमी होणार आहे. त्यामुळे तुम्ही कोणत्याच क्षेत्रात धाडसी पावले उचलणे सध्या तरी थाबवावे. कारण यशाची खात्री नाही शनी अजून प्रतिष्ठा टिकवील. कुणावरही टीका न करता आपले काम करा. गुप्त शत्रू व विरोधक कारवाया चालूच ठेवणार आहेत. त्यामुळे सावधगिरीने वागा. नोकरीत फारशी प्रतिकूलता नाही. पैसा कमी पडणार नाही. शुभ-दि-१३-१६

**महिलांना :** तब्येतीची काळजी घ्यावी.

**विद्यार्थ्यांना :** स्मरणशक्ती तल्लख बनेल.

**कुंभ : अडचणीवर मात**

या वेळी तुम्हाला गुरूची उत्तम कृपा लाभली आहे पाचवा गुरु आत्मबळ वाढवितो व बौद्धिक क्षेत्रात कीर्ती मिळवून देतो. आध्यात्मिक बाजू बळकट करतो. या वेळी तुम्हाला या गुरूचा लाभ होणार आहे रवि प्रवासाच्या अडचणीवर मात करण्यास यश देईल. धार्मिक क्षेत्रातील उच्च व्यक्ती तुमच्या परिचयात येईल. तिचा आशीर्वाद देईल. प्रवास होईल खूप दिवसाचा आजार दूर होईल. मानसिक अस्वास्थ्य सपेल काही तरी नवे घडविण्याची महत्त्वाकाक्षा जागृत होईल नोकरीव्यवसायातील प्रतिकूलता नाहीशी होईल. धद्यासाठी जर योजना हाती असतील तर त्या प्रत्यक्षात आणू शकाल नोकरीत वरिष्ठाचा गैरसमज दूर होऊन विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. बेकाराना नोकरी मिळेल. शुभ-दि. १७-१८

**महिलांना :** धार्मिक कार्ये यथासाग पार पडतील.

**विद्यार्थ्यांना .** अभ्यासात विलक्षण प्रगती होईल.

**मीन : विरोधकांचें सहकार्य**

मीन ही गुरूची रास आहे. गुरु हा सध्या सुखस्थानी विराजमान झाला आहे मिथुन या बौद्धिक पण चंचल राशीतील गुरूचे भ्रमण तुम्हाला तसे प्रतिकूल नाही. तरी पण म्हणावे तेवढे ते लाभदायकही नाही. मन सतत व्यग्र राहील. असमाधानी राहील. मात्र जागेचा, स्थावराचा प्रश्न समाधानकारक सुटेल. नोकरीच्या क्षेत्रात कर्तबगारीचे चीज होईल. गुणाना वरिष्ठाकडून उत्तम प्रतिसाद मिळेल. एखादा दुय्यम धदा सुरू करायला हरकत नाही दि. १६ चे रविराश्यातर खूपच अनुकूल ठरणार आहे आजवर जे विरोधक होते ते सहकारी बनतील. ज शत्रू होते ते मित्र बनतील शुभ १५-१८

**महिलांना .** ससार व नोकरी यात अडचणी नाहीत

**विद्यार्थ्यांना :** शिक्षकांचे सहकार्य उपकारक ठरेल. ☐